साहित्यातील अंगार : अमर शेख । योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे
तळपती तलवार... : नारायण सुर्वे । सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा...
बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक । ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर
साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर । वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव
विदुषी : दुर्गा भागवत । ग्रेस : गूढ इथले संपत नाही...
नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ । विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार
एक दुःखार्त झाड : दया पवार । मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.


परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

*साहित्यिक सांस्कृतिक असे कुठल्याही प्रकारचे वातावरण घरी नाही- एवढेच काय तर दारिद्र्य आणि दैन्यच वाट्याला आलेले. या पार्श्वभूमीवर **अमर शेखांनी** आपले स्वतःचे साहित्य निर्माण केले आणि इतिहास घडवला... साहित्य क्षेत्रात आणि सामाजिक-राजकीय क्षेत्रातही...*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# साहित्यातील अंगार
# अमर शेख

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

साहित्य-सरिता
महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

# साहित्यातील अंगार
# अमर शेख

**माधव जोशी**

सहलेखिका : रूपाली शिंदे

साहित्य-सरिता

महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य-सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
साहित्यातील अंगार : अमर शेख

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-८६-५

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७२/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. ‘मराठीच्या दुधाची साय’ खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

समस्त शाहिरांना आणि महाराष्ट्राच्या शाहिरी परंपरेला

# मनोगत

संयुक्त महाराष्ट्र चळवळ... त्यावेळचे दिवस, त्या सभा, मराठा दैनिकातील ती चळवळीची पानभर वृत्तं... वगैरे गोष्टी पुढे मोठेपणी इतिहास म्हणूनच वाचल्या, ऐकल्या. परंतु आज आपण महाराष्ट्र म्हणून जे काही सामूहिक जगतो आहोत त्यास या संयुक्त महाराष्ट्र चळवळीचाच भक्कम आधार आहे आणि या चळवळीचा आधारस्तंभ म्हणजे अमर शेख. आणि अमर शेख म्हटले म्हणजे 'शाहीर' अमर शेखच होय.

अमर शेखांच्या साहित्यावर इथल्या मातीचा- मराठी मनाचा संस्कार झाला होता. येथील संतपरंपरा, आपली स्वतःची आई, इथली माती हे सगळे त्यांच्या साहित्याचे मर्म होते, त्याचबरोबर मार्क्सवादी विचारसरणीही त्यांच्या साहित्याचा अविभाज्य असा भाग होती. त्यांनी चित्रपटांत काम देखील केले. आचार्य अत्र्यांनी महात्मा फुले यांच्यावर चित्रपट काढला होता. त्यात फुले यांची भूमिका अमर शेखांनी साकारली होती. त्या चित्रपटास केंद्रशासनाचे रौप्यपदक मिळाले होते. त्यामुळे साहित्य, सिनेमा, वक्तृत्व आणि असंख्य जनसमुदायासमोर आपल्या आवाजात शाहिरी जलसे... अशा बहुविध बहुआयामी, इतिहास घडवणाऱ्या अमर शेखांची धावती ओळख पुढील काही पानांत...

अशा अमर शेखांसारख्या साहित्यिकांची ओळख तीसुद्धा थोडक्यात व्हावी असा प्रस्ताव घेऊन मी साहित्य संस्कृती मंडळाकडे गेलो. त्यांनी ह्या प्रस्तावाचे स्वागत केले. मंडळाने ह्या प्रकल्पास होकार दिला. ह्या लेखनकामात रत्ना मगरे, रूपाली शिंदे आणि कोमल दवणे यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. अभिजित देशपांडे ह्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. मित्रवर्य प्रदीप गुजर आणि दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली, ऑलरिचचे अतुल जोशी ह्यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार!

ह्या पुस्तकातील लेखनाला अमर शेखांच्या साहित्याचा आणि त्यांवरील प्रकाशित झालेल्या साहित्याचा मोठा आधार आहे. त्या सर्व लेखकांचे, प्रकाशकांचे अत्यंत ऋणी आहोत.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव मीनाक्षी पाटील आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार.

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

'शिवछत्रपती आज जर का असते तर त्यांनी अमर शेखांना अक्षरशः आपल्या छातीवर उचलून धरले असते आणि म्हणाले असते, 'शाबास शाहीर' - असे वर्णन आचार्य अत्रे यांनी शाहिरांचे केले आहे.

साहित्यिक सांस्कृतिक असे कुठल्याही प्रकारचे वातावरण घरी नाही- एवढेच काय तर दारिद्र्य आणि दैन्यच वाट्याला आलेले. या पार्श्वभूमीवर त्यांनी आपले स्वतःचे साहित्य निर्माण केले आणि इतिहास घडवला... साहित्य क्षेत्रात आणि सामाजिक-राजकीय क्षेत्रातही...

जरी तर ते कम्युनिस्ट पार्टीशी संबंधित होते- डाव्या विचारसरणीशी बांधिलकी जपणारे होते तरी ते आपल्या आईला पूज्य-देवासमान मानीत- आई ह्या मूल्याला आणि कुटुंबसंस्थेला महत्त्वाचे मानीत. त्यांचा आंतरजातीय प्रेमविवाह होता. त्यावेळी तो खूप गाजला, तसेच त्याला सर्व बाजूंनी विरोधही झाला.

त्यांचे सर्व साहित्य - डायऱ्या, पोवाडे, मनोगते, साहित्य संमेलनातील भाषणे हे सर्व म्हणजे ऐतिहासिक दस्तऐवज आहे. एका उंच, कलावंत मनाचा एक संघर्षमयी प्रवास आहे... आत्मपरीक्षण आणि मनाचे कंगोरे आणि क्रांतिकारी लढ्याच्या मधून झळझळून उठणाऱ्या विचारांचे यांत जसे चित्रण होते तसेच तत्कालीन सामाजिक चळवळी, त्यांतले अंतर्विरोध, त्यांतले ताणतणाव यांचा सगळा आलेख यांत आला आहे.

१९३२ च्या सुमारास ते कम्युनिस्ट चळवळीत हिरिरीने भाग घेते झाले आणि त्यांचे काव्य क्रांतिकारी शब्दांतून व्यक्त होऊ लागले. -

*''ज्यांनी आम्हा गरिबास्नी नाडलं हो*
*त्यांच्या तिजोरीला भोक पाडलं''*

१९४२ च्या गांधीजींच्या 'चलेजाव' घोषणेमुळे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे संपूर्ण भारत स्वातंत्र्याच्या ऊर्मीने पेटून उठला होता.

संवेदनशील मनाचे अमर शेख याही लढ्यात उतरलेत आणि ही घोषणा त्यांनी जन सामान्यांपर्यंत पोहचवली.

*चले जावऽ चले जावऽ चले जावऽऽऽ*
*चले जाव माजोरी ऐतखाऊ उन्मत्त पशूंनो जाव ।।*
*गोरे काळे सगळे बगळे जाव जाव, चले जाव-*

अमर शेखांच्या बहुतेक रचना ह्या सादरीकरणाच्याच आहेत. हे त्यांच्या असंख्य रचनांतून दिसून येते. ते हजारोंच्या जनसमुदायासमोर आपल्या कणखर न भरदार आवाजात हातात डफ घेऊन त्या रचना गाऊन म्हणत.

*''होय, मीच आहे अंगार । आग ओकणे मजला प्यार ।*
*बाग आगिची फुलवावी । सर्व चांगले ठेवावे*
*सर्व वाईट जाळावे । आता नाही हा मरणार*
*जीवन प्यालेला अंगार । येईल काळ कराया वार*
*वारावरती करीत वार''*

मराठी संस्कृतीबद्दल, शिवाजीमहाराजांवर शाहिरांची श्रद्धा होती... इथल्या भारतीय समाजाचे समाजकारणाचे त्यांना चांगले भान होते. परिपक्व अशी समज त्यांची होती. डाव्या विचारसरणीचा, मुस्लीम म्हणून त्यावेळच्या त्यांच्या समाजाचा - त्या समाजातील चालीरीतींचा साकल्याने त्यांनी विचार केला होता. ते एके ठिकाणी म्हणतात -

'पण माझ्या पूजनीय पूर्वजांनो, या देशात इंग्रज आले आणि त्यांनी हिंदू-मुसलमान समाजासमाजांतच आग लावून दिली. असा हिंदू-मुस्लीम समाजात पहिला दंगा, गाय मिरवीत नेऊन कापायला लावून, रायबरेलीत १८४१ मध्ये घडवून आणला आणि आता पाकिस्तान झाल्यामुळे धर्माधर्मातील संशयपिशाचाने भयानक उचल खाल्ली आहे. आता तर त्याने धर्माधिष्ठित राज्यसत्तेला वरदानाची ग्वाही दिली आहे. लोकशाहीच्या नावाखाली अभय दिले आहे. आज मूर्ती फुटत आहेत, मशिदी जळत आहेत, दंग्याला कारणाचीही जरुरी लागत नाही, संशयपिशाच विजयानंदाने बेहोश होत आहे.

माझ्या पूर्वजांनो, तुम्ही शौर्य-पराक्रमाने, इमानाने मराठेशाही, पेशवाई राखण्याचा प्रयत्न केला, ती तुमची पुण्याई आज मातीमोल ठरली...

बा महाराष्ट्रा, खरेच का मी, एक मुसलमान आणि मुसलमान म्हणून

जन्माला आलेला प्रत्येक जण फितूरच आहे का? सांग, खरे काय ते तूच सांग!'

अस्सल मराठी मातीतल्या ह्या कविश्रेष्ठाने महाराष्ट्रातल्या तमाम जनतेला हलवून सोडले होते. आज हा आपल्याला इतिहास झाला असे वाटत असले तरी त्यांचे साहित्य वाचल्यावर तसेच त्या साहित्याचा अभ्यास केल्यावर त्यांचे विचार आजही प्रस्तुत आहेत याचे आकलन होते.

आजच्या तरुणवर्गाने ह्या साहित्याचे समग्रतेने आणि साक्षेपाने अभ्यास करणे आवश्यक आहे असे वाटते.

पुढील पानांत या सगळ्याचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न आहे.

❖❖❖



अमर शाहीर आणि आचार्य अत्रे



संयुक्त महाराष्ट्र समितीने एकोणीसशे छप्पन्न सालच्या जुलै महिन्यात लोकसभेच्या महाद्वारावर दोन हजार स्त्री-पुरुष सत्याग्रहींचा जो मोर्चा नेला त्या मोर्चाच्या आघाडीवर शाहीर अमर शेख होते. आषाढामधल्या मेघाप्रमाणे गडगडत होते आणि त्यांच्या गळ्यातून उचंबळणारे काव्य साक्षात् विद्युल्लतेप्रमाणे कडकडत होते. अमर शेख यांच्या अंगात त्या वेळी जणू काही साक्षात् महाराष्ट्रच संचारला होता. त्यावेळचा त्यांचा तो दैवी अवतार कालत्रयी विसरला नाही. सतत दोन दिवस दिल्लीच्या रस्त्यांमधून 'जागा मराठा आम' हा अमर यांच्या आवाजावाचून दुसरा आवाज ऐकू येत नव्हता. तो आवाज कानी पडला की, दिल्लीच्या रस्त्यातले स्त्री-पुरुष मंत्रमुग्ध होऊन अनिमिष लोचनांनी अमर शेख यांच्याकडे पाहत राहायचे. सतत चारचार तास, पाचपाच तास अन् दोनदोन दिवस त्याच त्या तार सप्तकात चढत्या आवाजाने गात राहायचे हा शाहिरी सामर्थ्याचा अभूतपूर्व विक्रम आहे. त्या दिवशीचा त्यांचा पराक्रम संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे. गेल्या तीनशे वर्षांतले सारे मराठी शाहीर जणू त्यांच्या गळ्यांत आणि डोळ्यांत येऊन बसले होते.

◆ *संयुक्त महाराष्ट्र चळवळीची मुलूख मैदान तोफ म्हणून ज्यांचा गौरव केला जातो ते आचार्य अत्रे शाहीर अमर शेख यांचे मुक्तकंठाने कौतुक करतात.* ◆

''श्री शिवछत्रपती जर त्यावेळी असते तर त्यांनी अमर शेखना अक्षरशः आपल्या छातीवर उचलून धरले असते आणि 'शाबास शाहीर' अशी त्यांच्या पाठीवर थाप मारली असती.''

हे उद्‌गार आहेत आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची मुलूख मैदान तोफ म्हणून ज्यांचा गौरव केला जातो ते आचार्य अत्रे शाहीर अमर शेख यांचे मुक्तकंठाने कौतुक करतात. कारण केवळ संयुक्त महाराष्ट्र चळवळच नव्हे तर एकूणच सामाजिक-राजकीय चळवळ आणि शाहिरीचे क्षेत्र यांमधील शाहीर अमर शेख यांचे काम खरोखरच हिमालयाएवढे होते.

अमर शेख यांचा जन्म २० ऑक्टोबर १९१६ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी या गावी झाला. त्यांचे मूळ नाव मेहबूब शेख. घरची परिस्थिती अगदी बेताचीच होती. कुटुंबाला दोन वेळचे जेवण मिळणेही कठीण होते. वडील हुसेन पटेल रेल्वेमध्ये कामाला होते. मात्र त्यांनी घराकडे लक्ष दिले नाही. वडिलांचे प्रेम अमरच्या वाट्याला कधीच आले नाही. त्यांच्या आईचे नाव मुन्नेरबी. आईनेच अमर शेख यांच्यावर संस्कार केले. या संस्कारातून त्यांच्या मनाची जडणघडण झाली. मुन्नेरबी जातीने मुसलमान असली तरी मराठमोळ्या संस्कृतीचे संस्कार तिच्यावर झालेले होते. घरी दखनी उर्दू बोलणारी आणि व्यवहारात मराठी बोलणारी त्यांची आई होती. ती दुसऱ्याच्या शेतावर मोलमजुरी करायची. आईकडून अमर शेखना आध्यात्मिक संस्कार मिळाले. तिने आयुष्यात अनेक संकटांचे चटके अनुभवले होते. दारिद्र्य पाचवीला पूजलेले. या परिस्थितीचा अनुभव अमरने घेतला होता. आई हे त्यांचे दैवत आणि प्रेरणास्थान होते. या आईने त्यांना स्वाभिमान शिकवला, धाडसी बनवले. आईविषयी आपल्या भावना व्यक्त करताना अमर शेख यांनी लिहिले आहे, ''जगात आई हेच एकमेव सत्य आहे व बाप ही केवळ कल्पना आहे. जगात पैसे देऊन सर्व मिळतं पण आई मिळत नाही, आपल्या प्राणाचं मोल

◆ *सामाजिक, राजकीय चळवळ आणि शाहिरीचे क्षेत्र यामधील शाहीर अमर शेख यांचे काम खरोखरच हिमालयाएवढे होते.* ◆

दिलं तरीही. आणि म्हणून माझ्या दृष्टीने जगातील सर्वश्रेष्ठ दैवत म्हणजे 'आई' हेच होय. मी मार्क्सवाद मानीत असलो तरी 'आई' हासुद्धा केवळ मनुष्यप्राणी मी मानत नाही, तर तीमध्ये मला सत्याचा साक्षात्कार होतो. या जगातलं ते मी पहिलं सत्य मानतो.'' आपल्या आईबद्दल इतक्या उदात्त शब्दात मांडणी करणारे अमर शेख हे आपल्या जडणघडणीत आईचे अनन्य-साधारण महत्त्व शब्दांतून, कवितेतून अधोरेखित करतात.

अमरचे वय पंधरा-सोळा वर्षांचे असेल. संपूर्ण भारतात इंग्रजांविरोधी चळवळी सुरू होत्या. १९३२च्या आसपासचा तो काळ होता. अनेक तरुण मुले या आंदोलनात सहभागी झाली होती. मराठवाड्यात बीड या गावावरून जाणाऱ्या ट्रकसाठी एक क्लीनर हवा होता. मेहबूब त्या गाडीवर क्लीनर झाला. त्या अगोदर त्यांनी 'दत्त गायन समाज' या संस्थेत गाणे शिकण्याचा प्रयत्न केला होता. देशात चाललेल्या आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे त्याला वाटू लागले. परंतु परिस्थिती तशा प्रकारची आली नव्हती. हा जागतिक मंदीचा कालखंड होता. त्यांनी क्लीनरची नोकरी सोडली, थोड्या दिवसांत एका कापड गिरणीत नोकरी मिळवली. पण मंदीचा तडाखा बसून नोकरी गेली. संप सुरू झाले. अमर शेख यांचे बंडखोर मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. त्यांनी संपाचे नेतृत्व केले. सरकारने त्यांना पकडले आणि त्यांची रवानगी विसापूर (ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर) कारागृहात केली. हा कारावासही अमर शेख यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला.

या कारागृहामध्येच त्यांची भेट कॉ. रघुनाथ कऱ्हाडकरांशी झाली. अमरने गरिबी जवळून अनुभवली होती. गरीब-श्रीमंत यांच्यातील फरक त्यांना समजत होता. रशियात १९१७मध्ये बोल्शेव्हिक क्रांती झाली होती. बोल्शेव्हिक राज्य याचा अर्थ लोकांचे राज्य. श्रमजीवी, गरिबांचे राज्य. अन्याय, जुलूम, शोषण यांना विरोध करणारे राज्य त्याचा परिणाम भारतातील काही सुधारकांवर झाला. साम्यवादाच्या विचारसरणीने हे

◆ *आई हे त्यांचे दैवत आणि प्रेरणास्थान होते. या आईने त्याला स्वाभिमान शिकवला, धाडसी बनविले.* ◆

लोक भारावले गेले. १९२०च्या आसपास भारतात साम्यवादी चळवळीचा प्रारंभ झाला. कॉ. रघुनाथ कऱ्हाडकर या साम्यवादी विचाराने भारावलेल्या व्यक्तीशी अमर शेख यांची भेट झाली आणि अमर शेख अंतर्बाह्य बदलून गेले. कम्युनिस्ट चळवळीचे संस्कार त्यांच्यावर झाले. भांडवलशाहीस विरोध, शोषणमुक्त, अन्यायमुक्त समाज. मानवतावादाचा पुरस्कार आणि गुलामगिरीस विरोध या तत्त्वांनी ते भारावून गेले. त्यातूनच ब्रिटिशांविरुद्ध क्रांतीचा जयजयकार त्यांनी सुरू केला. बालपणापासून गायनाची आवड, आईचा संस्कार आणि आसपासचे वातावरण यामुळे अमर शेख काव्य, शाहिरी करू लागले होते. विसापूर कारागृहात साम्यवादाचा संस्कार मिळाला आणि अमर शेख यांच्या काव्याला, शाहिरीला धार आली. तुरुंगातून सुटका होताच अमर शेख यांनी ब्रिटिशांविरुद्ध वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली. परिणामी पुन्हा अमर शेख यांच्या पाठीमागे पोलिसी ससेमिरा लागला आणि त्यांची परिणती अमर शेख भूमिगत होण्यात झाली.

याच काळात अमर शेख यांच्या सांसारिक जीवनात मोठी घटना घडली. विसापूर कारागृहातून सुटका झाल्यावर काही दिवसांतच त्यांनी आपली पत्नी राबिया हिस सोडचिठ्ठी दिली आणि ते सर्वार्थाने पाशमुक्त झाले. क्रांतीचे गाणी म्हणणे हेच त्यांचे जीवित कार्य झाले. अमर शेख गरीब, शोषितांचे दुःख आपल्या क्रांतिकारी शब्दांतून मांडू लागले.

*''ज्यांनी आम्हा गरिबास्नी नाडलं हो*
*त्यांच्या तिजोरीला भोक पाडलं''*

अशी नवी मांडणी करणारा, गाणी गाणारा हा शाहीर खेड्यापाड्यात जाग आणतो आहे, सरकारविरुद्ध जनमत निर्माण करतो आहे, हे पाहिल्यावर सरकार काय मेहेरनजर होणार होती? पोलिसांचा ससेमिरा मागे लागला आणि मेहबूब शेख भूमिगत होऊन कोल्हापूरला पोहचले आणि त्यांचा 'नवयुगात' प्रवेश झाला. कोल्हापूरमधील मास्टर विनायकांचा नवयुग स्टुडिओ हे कलाकार देशभक्तांचे मोठे आश्रयस्थान

◆ *माझ्या दृष्टीने जगातील सर्वश्रेष्ठ दैवत म्हणजे 'आई' हेच होय. मी मार्क्सवाद मानीत असलो तरी 'आई' हासुद्धा केवळ मनुष्यप्राणी मी मानत नाही, तर तीमध्ये मला सत्याचा साक्षात्कार होतो. या जगातलं ते मी पहिलं सत्य मानतो.* ◆

होते. मेहबूब शेख यांना तिथे काम मिळाले. नव्या जाणिवेचे व प्रेमाचे सहकारी मिळाले. २० रुपये पगाराची नोकरी मिळाली. मात्र खऱ्या नावाने वावरणे धोक्याचे आहे हे लक्षात घेऊन मेहबूब शेखचे नामकरण 'अमर भैया' असे झाले होते. हेच नाव पुढे जीवनाच्या अंतापर्यंत लागले. बार्शीच्या जवळ एका छोट्या गावात जन्मलेला मेहबूब शेख 'नवयुग' स्टुडिओत अमर शेख झाला; पण अमर शेख यांचे मन चित्रपटसृष्टीत रमणारे नव्हते. त्यांच्यावरचे संस्कार या क्षेत्रात त्यांना बेचैन करीत होते. इथे दीर्घकालीन जीवनावर ठसा उमटवणारे काही वातावरण मिळण्याची शक्यता त्यांना वाटली नाही. किंबहुना त्यांना जे सत्य अनुभवायास मिळत गेले ते चित्रपटसृष्टीतही त्यांना विचित्र वाटत राहिले. अमर शेख यांनी या संबंधात नमूद केले आहे ते असे- ''मला कुणी विचारील, 'आज काय होते तुमच्या स्टुडिओत?' मी चटकन म्हणेन, 'दारू! समाजाला पाजण्यासाठी' याला जर कला म्हणायचे असेल तर ती एका विशिष्ट वर्गापुरतीच. बहुजन समाजाची खास नाही.''

या कलेच्या मायावी क्षेत्रात अमर शेख यांनी कुठलाही संस्कार घेतला नाही की, व्यक्तिमत्त्वाला आकार मिळावा असे त्यांना काहीही प्राप्त झाले नाही. त्यांचे जगणे होते लोकांसाठी, लोकसेवेसाठी. ही लोकसेवा होती बहुजन समाजाची. तेथे सत्याची पूजा होती. पण या मायावी जगात फक्त सत्याचे नाटक होते हा अनुभव त्यांना आला व या खोट्या जगात ते गुदमरून जाऊ लागले. यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधू लागले. अभिनयाची फार मोठी शक्ती व पहाडी स्वराची निसर्गदत्त देणगी जवळ असूनही या मायावी क्षेत्रात त्यांचे व्यक्तिमत्त्व गुदमरून जाऊ लागले.

१९४२च्या काळात अमर शेख मोठ्या संघर्षातून जात होते. हा संघर्ष दोन पातळींवरचा होता. परिस्थितिजन्य आणि मानसिक संघर्षाचा

◆ ***१९२०च्या आसपास भारतात साम्यवादी चळवळीचा प्रारंभ झाला. कॉ. रघुनाथ कऱ्हाडकर या साम्यवादी विचाराने भारावलेल्या व्यक्तीशी अमर शेख यांची भेट झाली आणि अमर शेख अंतर्बाह्य बदलून गेले.*** ◆

सामना करण्याचा तो काळ होता. अमर शेख यांची राष्ट्रीयवृत्ती १९४२च्या आंदोलन काळात अधिक उफाळून आली. जनतेची चळवळ त्यांची चळवळ झाली. त्या चळवळीत झोकून देत ती चळवळ तापवण्यात, तरुण मने ज्वालाग्राही बनवण्यात अमर शेख अग्रेसर झाले. त्यांचे शब्द आणि स्वर या दोघांनाही धार आली होती. आईला दास्यातून सोडवण्यासाठी सारे सर्वस्व देण्याची उमेद त्यांच्या मनात झंकारत होती. त्यावेळचे वातावरण राजकीय जागृतीचे होते. याच वातावरणाचे संस्कार त्यांना जन्मतःच मिळाले होते. त्यामुळे जनक्रांती हेच त्यांचे ब्रीद बनले.

९ ऑगस्ट १९४२चे रणयुद्ध पेटले होते. सारे वातावरण क्रांतीच्या स्वातंत्र्य विचाराच्या आगीने भारलेले होते अशा वातावरणाचा अमर शेखावर परिणाम झाला नाही तर नवलच. देशविषयक भावनांचे स्फुल्लिंग पेटून उठता, त्यातच ब्रिटिशांनी केलेल्या पाशवी बळाची व पाशवी गोळीबाराची भर पडली. अमर शेख यांनी हे बळ, ही पशुता 'याचि डोळा याचि देही' अनुभवली. त्यातून संस्कारित मनात एकप्रकारची आग भडकली. चीड, संताप यांनी मनाचा कोपरान्‌कोपरा धगधगून गेला. ते लिहितात, ''चीड आणण्यासारखे वर्तन सरकारकडून होऊ लागले असून काय होणार हे समजू शकत नाही. मला खूप चीड येते हे सारे प्रकार पाहून. एस. पी. कॉलेज, ससून हॉस्पिटल गोळीबार, शीख तरुणांची झेंड्याबद्दल बाचाबाची झाली. त्यांच्या छातीत गोळी गेल्यावरच तो झेंडा त्याच्या हातून सुटला. चालू लढ्याला कुणालाही विरोध करता येणार नाही. लढ्याचा विरोध करणे म्हणजे जनतेपासून दूर जाणे. दडपशाहीमुळे लोकांना जास्त चेव येतो आहे.''

एकीकडे 'चले जाव'ची घोषणा होताच अमर शेखनी आपली घोषणा सामान्यातील सामान्यांपर्यंत पोहचवली ती ही अशी-

*चले जावऽ चले जावऽ चले जावऽऽऽ*

◆ *खऱ्या नावाने वावरणे धोक्याचे आहे हे लक्षात घेऊन मेहबूब शेखचे नामकरण ‘अमर भैया’ असे झाले होते. हेच नाव पुढे जीवनाच्या अंतापर्यंत लागले.* ◆

*चले जाव माजोरी ऐतखाऊ उन्मत्त पशूंनो जाव ।*
*गोरे काळे सगळे बगळे जाव जाव, चले जाव ।।*

सर्व थरांतील सामान्य माणसांना पेटवून उठविणारी ही ललकारी होती. केवळ ब्रिटिश सत्ता अस्तंगत होऊन चालणारी नव्हती तर सर्वत्र निर्माण झालेली पाशवी वृत्तीच नष्ट होण्याची गरज होती. म्हणूनच त्यासाठी अमर शेख यांनी ही ललकारी दिली होती. ती सर्वसामान्यांसाठी हाक होती. चेतना होती. याच काळात अमर शेख, अण्णा भाऊ साठे आणि दत्ता गव्हाणकर यांचा त्रिवेणी संगम झाला. ते एकमेकांचे साथी बनले आणि तिघांच्या शाहिरीने अवघा जनसमुदाय न्हाऊन निघाला. साम्यवादी विचारावर प्रचार-प्रसार करणाऱ्या लाल बावटा कलापथकाची निर्मिती झाली आणि हे तिघेही त्यात सामील झाले. अमर शेख यांच्या पहाडी आवाजाने शोषित, वंचित, उपेक्षित, पीडित जनतेला जागे केले. जनजागृती करणाऱ्या आपल्या कवितेबद्दल अमर शेख यांनी लिहून ठेवले आहे —

‘‘लिहिल्याशिवाय मोकळेमोकळे वाटत नाही. त्या माझ्या या निर्मितीला, तळमळीला, वेदनेला, कुणी कसलाही रंग दिला, तरी मला त्याचे काही वाटत नाही. पुन्हा लिहून ती केवळ दप्तरात ठेवून दिली किंवा एखाद्या देवळात, क्लबात, पार्टीत जाऊन चार दोस्तांबरोबर भेळ-कॉफीबरोबर ठेवली की पुरे असेही मला कधी वाटत नाही; तर ती हजारो, लाखो लोकांच्या भावनांशी ताडून पाहावी असे मला वाटते. मी तसे करतो आणि तिथे प्रतिसाद मिळतो, कदर होते. न्याय मिळतो. हे सांगायला मला अभिमान वाटतो. माझी कविता याच पायावर उभी आहे.’’

अमर शेख यांच्या दृष्टीने कॉ. कऱ्हाडकर हे एक विद्यापीठ होते. त्याच विद्यापीठात त्यांचे बरेच शिक्षण झाले. या विद्यापीठाने त्यांच्यातील विचारवंत साकारल्याशिवाय व्यक्तिगत जीवनात काहीशा पराभूत वृत्तीने वागणाऱ्या, हताश झालेल्या अमर शेख यांना याच विद्यापीठाने वीरत्वाची

◆ *अमर शेख यांची राष्ट्रीयवृत्ती १९४२च्या आंदोलन काळात अधिक उफाळून आली. जनतेची चळवळ त्यांची चळवळ झाली.* ◆

जाणीव करून दिली. ''दु:खितांना तुझी तान ऐकवून त्यांची हिंमत राखण्यासाठी तरी तुला आनंदी बनले पाहिजे'' हा गुरूंचा उपदेश अमर शेखांनी अखेरच्या क्षणापर्यंत आचरणात आणला. अमर शेख यांचा बुद्धिवाद जागा झाला. १९४२ साली कम्युनिस्ट पार्टीवर घातलेली बंदी उठली आणि मुंबईत 'लाल बावटा' पथकाने आपला जम बसवला. कॉम्रेड डांगेंनी या कलापथकाचा गौरव केला. डांगे कुटुंबीय आणि कलापथकातील शाहीर यांचे घरोब्याचे संबंध निर्माण झाले. सौ. उषा डांगे अमर शेखांना मुलाप्रमाणे वागवत. अमर शेखही त्यांना आई मानत असत. अशा वातावरणात एकाकी जीवन जगणाऱ्या पण कलेची, पक्षाची सेवा करणाऱ्या अमर शेख यांच्या जीवनात कुसुम जयकर नावाचे वादळ आले आणि या वादळाने अमर शेख यांचे सारे जीवनच भारून टाकले.

कम्युनिस्ट चळवळीतील कॉ. कुसुम जयकर यांच्याशी अमर शेख यांचा प्रेमविवाह झाला. तीही फार मोठी संघर्षकहाणी. त्याकाळी हा विवाह प्रचंड वादग्रस्त ठरला. कुसुम जयकर पाठारे प्रभू व अमर शेख मुसलमान. त्यामुळे त्यांच्या घरात प्रचंड मोठे वादळ निर्माण झाले. ''आम्हांला विष दे आणि मग आमच्या प्रेतांना ओलांडून जा'' अशी घरातून धमकी मिळाली. तर काही जणांनी थेट शामराव जयकर यांना गाठून, ''आम्हांला इतके पैसे दिले तर आम्ही अमर शेखला ठार मारू'' असे सांगितले. इकडे खुद्द कम्युनिस्ट पार्टीचाच या दोघांच्या लग्नाला विरोध होता. पक्षाने कार्यकर्त्यांच्या लग्नात अधिकार दाखवून 'लग्न करू नका' असा पार्टी मेसेज दिला. कारण कॉ. कुसुम या बी.ए. पास अन् अमर शेख व्हर्नाक्युलर फायनल (त्यावेळची सातवी). त्यामुळे हे दोघं भांडतील न् पार्टीचे काम बाजूला राहील अशा अडचणीच्या परिस्थितीत दादासाहेब रूपवते व रजनी पटेल यांनी मध्यस्थी केली. पार्टीच्या लोकांना समजावले आणि दोघांचे बहुचर्चित लग्न पार पडले आणि एकाकी भटकणाऱ्या अमर शेखांच्या जीवनाचा वारू स्थिर झाला.

◆ ***याच काळात अमर शेख, अण्णा भाऊ साठे आणि दत्ता गव्हाणकर यांचा त्रिवेणी संगम झाला. ते एकमेकांचे साथी बनले आणि तिघांच्या शाहिरीने अवघा जनसमुदाय न्हाऊन निघाला.*** ◆

कलावंताच्या पाठीमागे नेहमीच भक्कम आधार लागतो. तो आधार कुसुम जयकर यांनी उभा केला.

अमर शेख कवी होते. शाहीर होते. त्यांच्या काव्यावर ठळकपणे दोन प्रकारचे संस्कार झाल्याचे लक्षात येते. एक होता मातीचा आणि दुसरा मराठी मानाचा. माता मुन्नेरबी ही उत्कृष्ट कवयित्री होती. मराठी संस्कृतीच्या अभिमानाने तिचे मन फुललेले होते. तिच्यावर संतवाङ्मयाचा फार मोठा प्रभाव होता. त्याचे पडसाद तिच्या कवितेतूनही उमटलेले होते. 'टाळ मृदुंगाचा आवाज। येतो माझ्या कानी। चला गं सयांनो दिंडी आली गावरानी' असे म्हणणारी ही माता, तिचे मराठी संस्कृतीचे संस्कार अमर शेख यांच्या बालमनावर झाले होते. पुढे अभ्यासातून अमर शेखावर जे संस्कार झाले ते मराठी संतांचे, संतजीवनाचे आणि संतवाङ्मयाचे. तुकोबा, ज्ञानोबा, एकनाथ, रामदास यांच्या उत्तमोत्तम काव्याचे त्यांनी बारकाईने परिशीलन केलेले होते. त्याच्या अनेक खुणा त्यांच्या कवितेतून जागोजागी दिसून येतात. आपल्या 'माझे चरित्र' या कवितेत त्यांनी म्हटलेच आहे. ''तुक्याची ही आहे गाथा, अक्षय आहे, अक्षय राहील, प्रचिती, अमरत्वाची देईल.''

एका बाजूला आई आणि संतसाहित्याचा प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला साम्यवादी विचार अशा मुशीत अमर शेख यांची घडण होत राहिली. १ डिसेंबर १९४३ला त्यांनी निश्चय केला; सन १९४८ किंवा १९४९ पर्यंत आपण खूप खपायचे. किसान संघटना उभी करायची. अन् ती एवढी प्रचंड करायची की ४९ साली तरी ऑल इंडिया किसान सभा महाराष्ट्रात भरवली जाईल. त्या सभेत एक लाख किसान आपण जमवू या आणि या निर्णयानंतर त्यांनी कामास सुरुवात केली. कार्यक्रमामागून कार्यक्रम सुरू झाले. आणि अमर शेख माणसांची मने जिंकू लागले. तिकडे रशियात क्रांती होत होती आणि हा इकडे पेटून उठला होता आणि

◆ *कम्युनिस्ट चळवळीतील कॉ. कुसुम जयकर यांच्याशी अमर शेख यांचा प्रेमविवाह झाला. तीही फार मोठी संघर्षकहाणी.* ◆

कष्टकऱ्याला न्यायासाठी पेटवीत होता. १ जानेवारी १९४७ला धुळ्यात कार्यक्रम झाला. १२ ते १५ हजार लोक उपस्थित होते. त्यांच्या गाण्याच्या पद्धतीने माणसाच्या रक्तातील कण नि कण पेटून उठत होता. एक म्हातारी बाई म्हणाली, ''बाबा गाताना असा दिसतो जसा आत्ताच्या आता गातागाताच कुण्या दुश्मनाचं नरडं फोडणार.''

अमर शेखाचे कार्यक्रम जसेजसे सुरू झाले तसा एक झंझावातच जन्माला आला. अमर शेखाच्या रूपाने एक प्रचंड वादळच लोकजीवनात नुसते थैमान घालू लागले. उपस्थितांची संख्या काही हजारोंने वाढली. १५ ऑगस्टला चौपाटीवर अमर शेख यांनी राष्ट्रगीत म्हटले. देश स्वतंत्र झाल्याच्या अभिमानाने त्यांची छाती फुलली होती. त्या आनंदात ते गात राहिले. त्यावेळी ३० हजार लोक त्यांच्या गाण्याने मंत्रमुग्ध झाले होते.

१४ ऑगस्ट १९४७ रोजी अमर शेख यांना आकाशवाणीवर राष्ट्रगीत गाण्यासाठी बोलावले होते. बा. सी. मर्ढेकर त्यावेळी नभोवाणीवर डायरेक्टर होते. अमर शेखांचे गायन ऐकून त्यांनी अमर शेखांना अक्षरशः मिठी मारली. अमर शेख स्वरांचे जादूगार होते. अमर शेखांनी आपल्या स्वरांनी मराठी माणसावर, मराठी मनावर, मराठी संस्कृतीवर गारूड केले होते. अमर शेखांनी रान पेटवले आणि किसान कामगारांना खडबडून जागे केले.

१ एप्रिल १९५२ रोजी कलकत्ता येथे झालेल्या सांस्कृतिक परिषदेवर अमर शेख यांनी हजेरी लावली. तेथील कार्यक्रमात त्यांनी जेव्हा आपला पहाडी आवाज सादर केला तेव्हा हजारो लोक वेडे झाले. लोकांना वेडे करण्याची ताकद त्यांच्या स्वरात होती. इतका पहाडी आणि उंच स्वर तेथील श्रोत्यांनी पहिल्यांदाच ऐकला होता. या कार्यक्रमानंतर त्यांची 'इप्टा'शी जवळीक वाढली आणि ते इप्टाचे सदस्य झाले. निवडणूक प्रचारासाठी नवीन कविता लिहिली आणि मुंबईच्या नाक्यानाक्यावर ती गाऊन प्रचार केला. स्वातंत्र्यानंतरची ही पहिली निवडणूक असल्यामुळे

◆ *कलावंताच्या पाठीमागे नेहमीच भक्कम आधार लागतो. तो आधार कुसुम जयकर यांनी उभा केला.* ◆

सर्वसामान्य माणसाला त्यांचा अधिकार समजून सांगणे आणि आपले हक्क बजावण्यास प्रवृत्त करणे हाच उद्देश होता.

अमर शेख यांना 'अमर' हे नाव नवयुग स्टुडिओमध्ये मिळाले पण त्यावेळी चित्रपटसृष्टीत ते रमले नव्हते. त्यांच्यातील कार्यकर्ता कलावंतापेक्षा वरचढ ठरला होता. कलावंत म्हणून रूपेरी पडद्यावर दिसण्याची संधी पुन्हा एकदा अमर शेख यांच्या जीवनात आली. आचार्य अत्र्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर चित्रपट काढण्याचे काम हाती घेतले होते आणि महात्मा फुलेंच्या प्रमुख भूमिकेसाठी अमर शेख यांची निवड केली. ३१ जानेवारी १९५४ रोजी चित्रपटाचा मुहूर्त झाला. २४ डिसेंबर १९५४ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला खूप चांगले यश लाभले आणि केंद्र शासनाचे रौप्यपदकही जाहीर झाले. राष्ट्रपतींच्या हस्ते २१ डिसेंबर १९५५ला हे पदक देण्यात आले. दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमात पंतप्रधान नेहरूही उपस्थित होते.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हे महाराष्ट्राच्या जीवनातील एक रोमांचकारी असे पर्व होते. या पर्वात महत्त्वाचा होता विचार. हा लढा विचारांचा होता. मराठी अस्मितेचा होता. स्वाभिमानाचा होता. मराठी भाषेच्या अस्तित्वाचा आणि प्राणप्रिय ठरलेल्या मुंबईच्या अस्तित्वाचा होता. केंद्राने भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व सर्वत्र लागू केले होते. त्या दृष्टीने प्रत्येक प्रांताला न्याय दिला गेला होता. परंतु महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र अन्याय आला होता. त्यामागे एक प्रकारचे राजकीय षड्यंत्र होते. नेहरूंनी महाराष्ट्राबाबत काहीशी विचित्र आणि अन्यायकारक ठरणारी वेगळी भूमिका घेतली होती. त्यांच्या मनात महाराष्ट्राबद्दलचा आकस निर्माण होईल अशी परिस्थिती त्यांच्याभोवतीच्या प्रभावळीने निर्माण केली होती. त्यात भर पडली होती. त्यांनी वाचलेल्या इतिहासाची. हा इतिहास इंग्रजांनी त्यांच्या सोयीनुसार लिहिला होता व त्यात महाराष्ट्राबद्दल प्रेम तर नव्हतेच पण द्वेषच तुडुंब होता. हा इतिहास पूर्णतः चुकीचा होता. पण तोच नेहरूंच्या मनात घर करून बसला होता. त्यामुळे महाराष्ट्र

◆ *त्यांच्या काव्यावर ठळकपणे दोन प्रकारचे संस्कार झाल्याचे लक्षात येते. एक होता मातीचा आणि दुसरा मराठी मानाचा.* ◆

म्हणजे पुंडाईचा देश, बंडखोरीचा देश, दरोडेखोरीचा देश अशी काहीशी विचित्र कल्पना इंग्रजी इतिहासवाचनाने त्यांच्या मनात घर करून बसली होती. खुद्द महाराष्ट्राचे जे दैवत श्री शिवाजी महाराज त्यांच्याबद्दलच नेहरूंच्या मनात एक प्रकारची अढी होती. ते त्याच दृष्टिकोनातून शिवप्रेमी महाराष्ट्राकडे पाहत होते.

त्यात आणखी भर पडली होती ती मुंबई संबंधातली. मुंबई ही भांडवलदारी वर्गाला पूर्णतः आपली व्हावी असे वाटत होते. त्यामागे या वर्गाचा मोठाच स्वार्थ होता. मराठी माणूस मुंबईवर जिवापाड प्रेम करीत होता व त्याने आपल्या रक्तानेच महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास लिहिला होता. रक्त आणि घाम गाळून मुंबईची जडणघडण केली होती. पण ही गोष्ट पूर्णतः दुर्लक्षून, महाराष्ट्राविषयी नेहरूंच्या गैरसमजाचा फायदा घेऊन भांडवलदारी वर्गाने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा विचार नेहरूपर्यंत मोठ्या कौशल्याने पोहचवला होता. या भांडवलदारी वर्गात गुजराती मंडळींचा भरणा अधिक होता. त्यांनी या भाषिक योजनेप्रमाणे महाराष्ट्रात मुंबईचे अस्तित्व न ठेवता वेगळे ठेवावे असा आग्रह नेहरूंजवळ धरला आणि नेहरूंनी तो मानलाही होता. या गोष्टीवर झणझणीत प्रकाश टाकण्याचे चिंतामणराव देशमुख यांना करावे लागले. पं. नेहरू, त्यांचे निष्ठावंत आणि भांडवलदार एकीकडे, तर महाराष्ट्रातील प्रखर विचाराची, प्रबोधनाची परंपरा कायम ठेवून मराठी अस्मिता टिकवून धरणारी जनता दुसरीकडे असा हा संघर्ष दिवसादिवसाने पेटत गेला. १९४८ पासूनच या लढ्याला एक प्रकारची वेगळी धार येत गेली. त्यामुळे महाराष्ट्राच्या दृष्टीने दिल्ली ही त्याकाळात शत्रूस्थानी ठरली. याचा अर्थ असा की, स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर म्हणजे १९४८ पासून मुंबई महाराष्ट्रापासून कायमची तोडण्याचा कुटिल डाव दिल्लीत खेळला जात होता आणि कळतनकळत त्यासाठी नेहरूंचा आशीर्वाद मिळवला जात होता. महाराष्ट्रातील जनता सावध होऊ लागली. या जनतेला सावध करण्याचे काम महाराष्ट्रातले

◆ ***‘टाळ मृदुंगाचा आवाज। येतो माझ्या कानी । चला गं सयांनो दिंडी आली गावरानी’ असे म्हणणारी ही माता, तिचे मराठी संस्कृतीचे संस्कार अमर शेख यांच्या बालमनावर झाले होते.*** ◆

नेते, पत्रकार व शाहीर यांनी केले. त्यामुळे हा त्रिवेणी संगम दिल्लीच्या जिव्हारी घाव बसवण्यास कारण ठरला.

साहित्यिक मंडळी मराठी प्रेमातून मराठी भाषिक राज्याची मागणी करीत होता. साहित्य संमेलनातून ठरावही होत होते पण त्याचा परिणाम व्हावा तसा होत नव्हता. दिल्लीच्या मनातच मुळी वेगळा विचार होता. मग ती दिल्ली नुसत्या ठरावांना काय किंमत देणार? म्हणून राजकीय नेते, साहित्यिक, पत्रकार, कामगार पुढारी, शाहीर ही सर्व मंडळी लढ्यासाठी एकत्र झाली. त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. या समितीच्या पहिल्या परिषदेत महाराष्ट्र शाहीर अमर शेख यांनी १८ ऑक्टोबर १९४८ रोजी महाराष्ट्र प्रेमाने ओथंबलेले पहिले गीत म्हटले. आणि या लढ्याच्या नाटकाची पहिली नांदी म्हटली गेली. इथूनच महाराष्ट्र प्रेमाचा महापूर आला व मराठी माणसाच्या नसानसात अन्यायाविरुद्ध चिडून उठण्याची नवी शक्ती आली. महाराष्ट्र प्रेमाची भक्ती ओसंडून वाहू लागली व दिल्लीचा अविचार कायमचा ठेचून टाकायचा हा वज्रनिर्धार केला गेला.

तो पाहताच दिल्ली खडबडून उठली आणि तिने एक एक नवे पाऊल टाकण्यास सुरुवात केली. महाराष्ट्राचे स्वतंत्र भाषिक राज्य तर निर्माण करायचे नाहीच पण उलट मुंबईच केंद्रशासित करण्याचा विचार पुढे आणला. महाराष्ट्र कायमचा बंदिस्त व्हावा व त्याची रग पूर्णपणे जिरवून टाकावी या हेतूनेच की काय, भाषावार राज्य पुनर्रचना समितीने नियुक्त केलेल्या फाजल अली कमिशनचा मराठी भाषिकांवर लघुद्विभाषिक वाहणारा अन्यायकारक अहवाल प्रकट झाला. पण यातला दुष्ट हेतू व कारस्थान मराठी माणसाने पुरते ओळखताच मराठी मन संतापाने बेभान झाले. सर्वत्र वातावरण तापून गेले. शिवाजी पार्क, कामगार मैदान, गिरगाव चौपाटी अशा मोठमोठ्या स्थळांना मोठमोठ्या सभा होऊ

*आपल्या ‘माझे चरित्र’ या कवितेत त्यांनी म्हटलेच आहे. ‘‘तुक्याची ही आहे गाथा, अक्षय आहे, अक्षय राहील, प्रचिती, अमरत्वाची देईल.’’*

लागल्या. कामगारांचे मोर्चे निघू लागले आणि न्याय्य हक्काची मागणी तारस्वरात मांडली जाऊ लागली. मुंबईचे वातावरण पूर्णपणे बदलून गेले. लढ्याला धार आली. पत्रकारांनी लेखण्या सरसावल्या, शाहिरांनी आपले डफ सज्ज केले. आता नुसत्या तुणतुण्याची गरज नाही तर डफच कडकडायला हवा ही शाहिरांना जाणीव झाली. आणि जनमत पेटवण्यासाठी, ते स्वाभिमानाने उजळवून टाकण्यासाठी शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, द. ना. गव्हाणकर, आत्माराम पाटील, चंदू भरडकर, सिकंदर शेख असे असंख्य शाहीर आपल्या अस्तन्या सरसावून लोकजागृतीच्या मैदानात शड्डू ठोकून उतरले. त्यामुळे स्वाभिमानी पत्रकार, कामगार नेते, विविध पक्षातील नेते, व्याख्याते, साहित्यिक सर्व जण एकत्र आले आणि अन्यायकारक विचाराचा मुकाबला सर्व ताकदीनिशी करायचा हा सर्वांनीच निर्धार केला.

महाराष्ट्रातील पत्रकारांची, लोकनेत्यांची, शाहिरांची, कामगारांची एकीची वज्रमूठ तयार झाली. त्यातूनच एक अमरत्वाला पोचावी अशी घोषणा तयार झाली. ती घोषणा होती, ‘मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.’ ही घोषणाच न ठरता अल्पावधीत तिला मराठी मनाच्या गर्जनेचे बळ प्राप्त झाले. महाराष्ट्रव्यापी अशी ही एक गर्जना दऱ्याखोऱ्यांतून, कडेकपारींतून एकसारखी दुमदुमू लागली आणि त्यामुळे इथूनतिथून मराठी मन खडबडून जागे झाले. याच वेळी मराठी शाहिरांनी मुंबईची जडणघडण कशी झाली याचा इतिहास जनतेपर्यंत पोहचवण्यास सुरुवात करून मुंबईबद्दलचे प्रेम प्रत्येक हृदयात एकवटून दिले. शाहिरांच्या वाणीतून मुंबई माहात्म्य ऐकताना मराठी मनात मुंबईबद्दल एक अतूट असा भावबंध निर्माण झाला. मराठी मनाला अगदी खेड्यापाड्यातही कळून चुकले की, मुंबईशी आपले नाते केवळ भौतिक स्वरूपाचे नाही, तर ते कायमचे रक्ताचे आहे. यामुळे आम मराठी जनतेने मुंबईसाठी प्राणाची बाजी लावण्याचा निर्धार केला. याच काळात अमर शेखांनी

◆ *एका बाजूला आई आणि संतसाहित्याचा प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला साम्यवादी विचार अशा मुशीत अमर शेख यांची घडण होत राहिली.* ◆

सह्याद्रीच्या कुशीत राहणाऱ्या प्रत्येक माणसाला तारस्वरात स्वरचित ओळी ऐकविल्या.

*'या पर्वतराजी कसल्या*
*करवतीच तापवलेल्या'*

यामुळे मराठी माणसाचे इतिहास प्रेम जागे होऊन प्रत्येकाच्या मनालाच करवतीच्या दात्यांची धार आली आणि ती दिवसादिवसांनी अधिक तेजाळत गेली. ती संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात.

या साऱ्या भारावलेल्या वातावरणासंबंधी शाहीर अमर शेख यांनी आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवले आहे ते असे, ''२१ नोव्हेंबर- प्रचंड संप. आमच्या भागातील सगळी जबाबदारी माझ्याकडे होती. गोळीबार होऊन एक तरुण बळी पडला. एक बसची चौकी जाळण्यात आली. संध्याकाळी चौपाटीवर सभा. हजर लोक तीन लाख. गाणी म्हटली. 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणत होतो व सगळी सभा कोरस म्हणून साथ देत होती हे अपूर्व होते.''

संयुक्त महाराष्ट्राच्या कृती समितीची सभा १९५३-५४ साली शिवाजी पार्कवर संध्याकाळी होत असत. अशाच एका सभेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. शाहीर अमर शेख यांच्या 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' या गाण्याने सुरुवात झाली. नंतर शंकरराव देव बोलायला उठले ते महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्र मिळवण्यासाठी आपल्याला काही तरी तडजोड करावी लागेल. ह्यात काही गमवावे लागले तरी चालेल.'' या त्यांच्या वाक्यामुळे सभेत आरडाओरडा सुरू झाला. त्याचे भाषण बंद करण्याचा लोकांचा कल दिसला. ५ मिनिटे गोंधळ झाला. लगेच माईकवर अमर शेखांनी गीत म्हणायला सुरुवात केली आणि सभा शांत झाली. अमर शेखांवर जनता प्रेम करत होती. त्यांचा पहाडी स्वर महाराष्ट्राच्या नसानसात भिनला होता.

१९५६ साल उजाडले आणि लढ्याला तीव्र धार आली. त्याच वेळी

> ***अमर शेखाचे कार्यक्रम जसे जसे सुरू झाले तसा एक झंझावातच जन्माला आला. अमर शेखाच्या रूपाने एक प्रचंड वादळच लोकजीवनात नुसते थैमान घालू लागले.***

शासनाची दडपशाही उग्र स्वरूपात जाणवू लागली. मराठी माणसे न्याय मागणी मागत आणि शासन त्यांच्यावर गोळ्या घालीत होते. १ जानेवारी १९५६ रोजी करारी व निर्धारी तरुणांचे रक्त फ्लोरा फाऊंटनवर वाहत होते. एका दिवसात ९० आंदोलक ठार करण्यात आले. अक्षरशः रणसंग्राम चालू होता. यापूर्वी १५ नोव्हेंबर १९५५ मध्ये १५ आंदोलक हुतात्मा झाले. जे शेकडो जखमी झाले त्यांची गणनाच नाही. या आंदोलनातील १ जानेवारी १९५६ हा दिवस महाराष्ट्रातील मराठी माणसाने कधीच विसरता कामा नये. पंतप्रधान नेहरूंनी आकाशवाणीवरून स्वतंत्र मुंबईची घोषणा केली. ही घोषणा म्हणजे मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करता कामा नये या षड्यंत्राचा भाग होता. नेहरूंच्या मुंबईच्या घोषणेने मराठी माणसाची मर्दानगी उठणार यात शंका नव्हती. त्यामुळे मोरारजी यांनी आधीच सर्वत्र अत्यंत कडक बंदोबस्त ठेवला होता. रिव्हॉलव्हरधारी पोलिस अधिकारी नाक्यानाक्यावर उभे होते. त्यांना स्पष्ट हुकूम होता. 'दिसता क्षणी गोळी घाला आणि ठार मारण्यासाठीच गोळी झाडा!' 'शूट ॲट साईट आणि शूट टू किल.' पाच हजार आंदोलक ठार झाले तरी चालतील.

या अटीतटीच्या प्रसंगी अमर शेख महाराष्ट्राला जे जे वंदनीय, पूजनीय आहे ते ते आपल्या शाहिरीतून मांडत होते. महाराष्ट्राच्या मातीचा, भूगोलाचा, परंपरेचा, इतिहासाचा भावबंध त्यांच्या नसानसात वाहत होता. आणि अमर शेख तारस्वरात गात होते.

*''या पर्वतराजी कसल्या?*
*कर्वतीच तापवलेल्या''*

महाराष्ट्राचा मोठेपणा अनेकांनी सांगितला; पण दोन वाक्यात अमर शेखांनी जे सांगितले तसे आजवर कोणत्याही मराठीतल्या कवीला सांगता आलेले नाही. त्यांची प्रतिभा आणि बुद्धी, मती या भारतीय

**◆ *१४ ऑगस्ट १९४७ रोजी अमर शेख यांना आकाशवाणीवर राष्ट्रगीत गाण्यासाठी बोलावले होते. बा. सी. मर्ढेकर त्यावेळी नभोवाणीवर डायरेक्टर होते. अमर शेखाचे गायन ऐकून त्यांनी अमर शेखांना अक्षरशः मिठी मारली.* ◆**

मातीवरच सश्रद्ध मनाने प्रेम करीत होती. म्हणूनच तो गाता गाता सांगत होता-

*'जन्म धरतीवरती धन्य आम्ही ते*
*पूज्य पूज्य मायभू ही गाऊनी गिते'*

आपण याच धरतीवर जन्मलो याची धन्यता वाटणारा हा कवी महाराष्ट्राच्या खेळत्या आणि उसळत्या रक्तवाहिन्यांना कधी विसरलेला नाही.

*''कोयना नि गोदा कृष्णा । भागवूनी आमची तृष्णा ।*
*उदरात मोती पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी*
*कधी उग्र रूप खंद रूपाचे। पाणी पाजी शत्रूना''*

अशी गाणी गात अमर शेखांनी महाराष्ट्र ढवळून काढला. आपल्या गीतातून अमर शेख महाराष्ट्रमहती सांगत होते. उठवत होते. पेटवत होते. आणि शांतवतही होते. या महाराष्ट्रभूवर त्यांचे अतोनात प्रेम होते. ते त्यांच्या शब्दातून व्यक्त होत होते.

*'सौंदर्य महाराष्ट्राचे । क्षणक्षणा प्रत्यया येते*
*मनी सुगंध उधळीते । दरीकपार र{झवी मनाते ।'*

या महाराष्ट्रमातीच्या प्रेमातून त्यांचा आत्मविश्वासही एकप्रकारे कणखर बनला होता. म्हणूनच ते म्हणू शकले-

*''घाला घण आमुच्या छातीवर*
*अन् पहा मराठी बाणा''*

हाच बाणा त्यांनी दिल्लीपर्यंत नेऊन पोहचवला. संयुक्त महाराष्ट्रासाठी आपल्या पहाडी स्वरात दिल्ली दणदणून सोडली.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात अमर शेख किती विलीन झाले होते याचा प्रत्यय आचार्य अत्रे यांनी घेतला होता. आचार्य अत्रे त्यांच्या काव्याबद्दल

◆ *लोकांना वेडे करण्याची ताकद त्यांच्या स्वरात होती. इतका पहाडी आणि उंच स्वर तेथील श्रोत्यांनी पहिल्यांदाच ऐकला होता.* ◆

शाहिरीबद्दल लिहितात –

''अमर शेख हे कवी आहेत हे सांगण्याची जरुरी नाही. त्यांना पाहिले की, ते कवीच असले पाहिजेत याची अगदी खात्री होते. अष्टौप्रहर त्यांच्या डोक्यात आणि डोळ्यांत काव्याची धुंदी चढलेली असते. त्यांना 'शुद्धी'वर मी कधीच पाहिले नाही. एखाद्या कारखान्याच्या धुरांड्यातून धूर अन् ठिणग्यांचा लोट जसा वर उफाळत असतो त्याप्रमाणे काव्याचा अंगार सदैव त्यांच्या शरीरातून आणि वृत्तीमधून धुमसत असतो. स्वतःच्या काव्याबद्दलही त्यांनी तेच सांगितले आहे-

*''होय, मीच आहे अंगार । आग ओकणे मजला प्यार ।*
*बाग आगिची फुलवावी । सर्व चांगले ठेवावे*
*सर्व वाईट जाळावे । आता नाही हा मरणार*
*जीवन प्यालेला अंगार । येईल काळ कराया वार*
*वारावरती करीत वार''*

अमर शेखांची एक एक ओळ म्हणजे बंदुकीची फैर आहे. तोफेच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या लाल रसरशीत गोळ्याप्रमाणे त्यांचे जळजळीत शब्द एकामागून एक बाहेर पडत असतात. मग ते गाणे मातृभूमीच्या अभिमानाचे असो, नाही तर साम्राज्यवाद्यांना दिलेल्या आव्हानाचे असो. आपल्या लढाऊ बाण्याचा त्यांना कधीच विसर पडला नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या देदीप्यमान लढ्यात अमर शेख यांचे योगदान महत्त्वाचे होते. त्यांच्यामुळे लोक उठले. जनमत पेटले. दिल्लीकडे धावले व दिल्लीश्वराचे सिंहासन हादरवून सोडले. इतकी शक्ती त्यांच्या काव्यगायनात होती. इतकी हिंमत त्यांच्या निर्भय छातीत होती. लाखो लोकांना चेतवणारी, पेटवणारी, फुलवणारी, झुलवणारी आणि बेहोश करणारी वाणी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात कामी आली. चेतवलेला जनसमुदाय आणि निकराची लढाई यामुळे दिल्लीला आपला निर्णय बदलवणे भाग पडले. मराठी माणसांनी सतत ५ वर्षे संपूर्ण देशाला स्तिमित करणारा

◆ *कलावंत म्हणून रूपेरी पडद्यावर दिसण्याची संधी पुन्हा एकदा अमर शेख यांच्या जीवनात आली. आचार्य अत्र्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर चित्रपट काढण्याचे काम हाती घेतले होते आणि महात्मा फुलेंच्या प्रमुख भूमिकेसाठी अमर शेख यांची निवड केली. ३१ जानेवारी १९५४ रोजी चित्रपटाचा मुहूर्त झाला. २४ डिसेंबर १९५४ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला खूप चांगले यश आले आणि केंद्र शासनाचे रौप्यपदकही जाहीर झाले.* ◆

जो लढा दिला तो अखेर यशस्वी झाला. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राची म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. मुंबई महाराष्ट्राची आहे या सत्याचा विजय झाला. एक अध्याय संपला. मराठी भाषकांचे मराठी अस्मितेचे महाराष्ट्र राज्य उदयास आले.

भांडवलशाहीची चीड मुळापासूनच अमर शेख यांच्या मनात होती. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने तर ती अधिक बळावली होती; परंतु पक्षाच्या चौकटीत कला बसत नाही. ती चौकट कलावंताची उलट तडफडच घडवते आहे हे पाहताच अमर शेखांनी पक्षाचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र कलापथक स्थापन केले. आपण पक्षाचा राजीनामा का दिला हे त्यांनी ५-३-६३ रोजी एका पत्रातून सांगितले आहे. ते लिहितात –

‘‘मी पक्षाचा राजीनामा दिला पण कुणाच्या खिशात जाऊन बसत नाही. हे इतर पक्षाचे व सत्तारूढ पक्षाचेही दुखणे. माझा सरकारकडून होत असलेला सत्कार नजीकच्या काळात तरी दिसणार नाही. मी कुणाची हांजी करणार नाही, मी उपाशी मरेन पण कुणाचा मिंधा होणार नाही. मी रेडिओसाठी कुणाची मनधरणी करणार नाही. हा माझा बाणा. तुम्ही हवा तर दोष म्हणा, मला माझी अमाप मराठी जनता आहे. तिच्या दरबारात मिळालेले स्थान मला भरपूर आहे. तेच मला टिकवायचे आहे. म्हणून मी जनतेबरोबर राहणार. तिच्यावरील अन्याय हा मजवरील

◆ *साहित्यिक मंडळी मराठी प्रेमातून मराठी भाषिक राज्याची मागणी करीत होता.* ◆

अन्याय समजून मी प्रतिकार करणार. तिच्या आनंदात माझी शाहिरी पूजणार.'' अमर शेख स्वाभिमानी होते. ते कुठल्याही पक्षाला कधीच विकले गेले नाहीत. त्यांचा पक्ष हाच मुळी जनतेचा पक्ष होता. तो लोककैवारी होता आणि अन्याय करणाऱ्याचा वैरी होता. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अमर शेख स्वयंतेजाने तळपून उठले.

पक्ष सोडला तरी अमर शेखांनी प्रबोधनाचे काम बंद केले नाही. आपल्या कलापथकाच्या माध्यमातून ते महाराष्ट्राला जागवत राहिले.

''माझे अमर शेख कलापथक हा एक तंबू आहे.
माझे गुणी कलाकार हे या तंबूचे भरभक्कम खांब आहेत.
मी म्हणजे त्या तंबूचे फक्त छताचे कापड आहे. छत्र आहे!
खांब कोसळून पडले तर त्यावरील हे छताचे कापड... हे छत्र
अधांतरी राहू शकणार नाही.''

''कलापथक आहे. अमर शेख आहे. कलापथकाशिवाय मी जगू
शकत नाही. कलापथक म्हणजे माझा प्राण आहे.
म्हणूनच माझ्या कलापथकाची शान मी माझ्या रक्ताच्या
कणाकणाने वाढवली आहे.

माझं कलापथक ही एक कामधेनू आहे. एखादे वेळी तिने लाथ दिली तरी ती मी सहन करतो. कारण ती मला दूध देते.

पथकाची अब्रू हे एक बहुमोल व अत्यंत नयन मनोहर असं काचपात्र आहे.

आज मी ते तुमच्या हाती मोठ्या विश्वासाने देत आहे. त्याचा नीट सांभाळ करा.

जर का त्याला तडा गेला तर ते पुन्हा सांधता यायचे नाही. म्हणून मला फार फार जपून वागावे लागेल. याची तुम्ही गंभीरपणे दखल घ्यावी हे चांगले! माझ्या पथकातील मुलींच्याकडे डोळा वर करून पाहणाऱ्याचा डोळाच काढला जाईल हे लक्षात ठेवा! त्या दृष्टीने पथकाची शिस्त फार कडक आहे. हं, मात्र पथकातील एखादी मुलगी एखाद्याच्या राजीखुशीनं

*त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. या समितीच्या पहिल्या परिषदेत महाराष्ट्र शाहीर अमर शेख यांनी १८ ऑक्टोबर १९४८ रोजी महाराष्ट्र प्रेमाने ओथंबलेले पहिले गीत म्हटले.*

हात धरू लागली तर मी तिचा हात कसा रोखणार?

अशा वेळी हातात हात मिळवून देणेच अधिक श्रेयस्कर ठरतं! आजवर माझ्या रक्ताचा कण नि कण शिंपून मी त्या डफाच्या रोपट्याला पाणी घातले. आज त्याला एक मोठ्या प्रचंड वटवृक्षाचे स्वरूप येऊ लागले आहे. त्या वृक्षाच्या छायेखाली अनेक लोक आपली साधीसुधी मीठभाकर सुखात खात आहेत. पण इतक्यात माझं समाधान होणार नाही. माझा डफ म्हणजे एक मोठा प्रचंड वटवृक्ष झाला पाहिजे.''

अमर शेख यांची मनोभूमिका वरील मनोगतातून लक्षात येते. एका व्यापक कुटुंबाचे नेतृत्व करणाऱ्यावर प्रेम, आपुलकी, पालकत्व आणि नीतिमत्तेला ते किती महत्त्व देत होते हे लक्षात येते. अमर शेख केवळ अर्थार्जनाचे साधन म्हणून कथापथक चालवत नव्हते. महाराष्ट्रभूमीवरचे प्रेम वृद्धिंगत करतानाच समाजप्रबोधन आणि गोरगरिबांच्या दुःखांना चव्हाट्यावर मांडण्यासाठी, जगाला मानवतेचा संदेश देण्यासाठी अमर शेख कलापथक चालवत होते.

आपल्या स्वरमाधुर्याने मराठी माणसांची मने एका वेगळ्या पातळीवर नेणारा हा कलावंत आपल्या कलेच्या सामर्थ्यावर तीन चतुर्थांश जग पाहून आला होता. पण महाराष्ट्र, राष्ट्रप्रेमात कधीच फरक पडला नव्हता. इतर 'भू' त्यांना कधीच आपली वाटली नाही. स्वर आणि अभिनय हे अमर शेखांच्या जीवनाचे दोन पंख होते. त्या पंखातील अमर शेखांनी अडीच तपे भरारी घेतली होती. २४-४-१९६२ला 'प्रपंच' या चित्रपटाला अवॉर्ड मिळाले. हे स्टेट अवॉर्ड होते. गोरा कुंभाराची अमर शेखांनी केलेली जी अविस्मरणीय भूमिका केली होती तिला मिळालेले हे बक्षीस होते. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे हे अवॉर्ड होते. अमर शेखांनी दिल्लीकरांना महाराष्ट्राची तळमळ स्वराच्या माध्यमातून ऐकवली होती. अमर शेख गात गातच पार्लमेंटवर गेला होता. पहाडी आवाज आणि तितकाच तोडीचा

*अटीतटीच्या प्रसंगी अमर शेख महाराष्ट्राला जे जे वंदनीय, पूजनीय आहे ते ते आपल्या शाहिरीतून मांडत होते. महाराष्ट्राच्या मातीचा, भूगोलाचा, परंपरेचा, इतिहासाचा भावबंध त्यांच्या नसानसात वाहत होता.*

अभिनय ही ओळखही या पुरस्कारामुळे अधोरेखित झाली.

अमर शेख कवी होते. शाहीर होते. आपल्या 'कलश' या काव्यसंग्रहात त्यांनी लिहिले होते –

''शाहिरा, तू ज्यांचा वारस आहेस, त्या मराठी कवीची परंपरा मोठी आहे. ती जिवात जीव असेतोवर ती पराकाष्ठेने राख. लिहीत राहा, गात राहा, विझू नकोस. विझवू नकोस. पेटव, बुजव, सजव, रिझव, हटव, हटू नकोस. विशाल मानवतावादाची कास सोडू नकोस.''

अशा ध्येयासक्त कवी, शाहीर अमर शेखांचे वर्णन करताना आचार्य अत्रे म्हणतात, ''अमर शेख हे शाहीर आहेत ही गोष्ट विसरता कामा नये. महाराष्ट्रात कविता निर्माण करणाऱ्यांच्या तीन जाती पडतील. कवी, लावणीकार आणि शाहीर. जनतेचे मनोरंजन करणे हे कवीचे नि लावणीकारांचे कार्य असते. कवी लावणीकार गुंगवतात. मालवतात नि विझवतात. शाहीर चेतवतो, पालवतो नि पेटवतो. कवी नवा विचार देतो. नवे आकार दाखवतो; नाही असे नाही, पण ऐकणाऱ्याला त्यामुळे फार झाले तर रवंथ करण्याची इच्छा होते आणि लावणीकार जास्तीत जास्त विचारांच्या विटोळ्यांना शरीरातून वळवळ करायला लावतो. पण शाहिराचे शब्द कानावर पडले की, वारुळातून फुफाट करीत बाहेर पडणाऱ्या नागाप्रमाणे किंवा करवंदीच्या जाळीतून डरकाळी फोडीत बाहेर पडणाऱ्या वाघाप्रमाणे माणसाची अवस्था होते. शाहिराचे शब्द त्याची आतडी खेचतात, त्याचे जिव्हार ठेचतात. शाहीर हा दैनंदिन जीवनाच्या संग्रामामधला सांगाती आहे. कवी हा आपल्या खोलीचे दार बंद करून अंथरुणावर उताणा पडून अन् आढ्याकडे डोळे लावून स्फूर्तीचा गोळा डोक्यावर बदकन् केव्हा पडेल यांची तासन्तास वाट पाहत असतो. कोकिळेप्रमाणे वर्षातून दोन महिनेच त्याला कंठ फुटतो. शाहीर हा कोंबड्यासारखा असतो. घराच्या पडक्या भिंताडावर, शेताच्या कुंपणावर,

◆ ***१९५१ साली अमर शेख यांचा 'अमरगीत' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ बाळासाहेब ठाकरे यांनी तयार केले होते. तर न. र. फाटक यांनी या कवितासंग्रहाला प्रस्तावना दिली होती.*** ◆

नाही तर कामगाराच्या चाळीच्या जिन्यावर बसून त्याला सकाळ, दुपार वक्तशीरपणे आरवावे लागते.''

१९५१ साली अमर शेख यांचा 'अमरगीत' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ बाळासाहेब ठाकरे यांनी तयार केले होते. तर न. र. फाटक यांनी या कवितासंग्रहाला प्रस्तावना दिली होती. अमर शेख यांच्या कवितेबाबत न. र. फाटक यांनी लिहिले होते, ''श्री. शेख हे एक मुरलेले कम्युनिस्ट आहेत या जाणिवेने त्यांची कविता वाचल्यास त्यांच्या प्रतिभेची चमक दृष्टीस भरेल. ही कविता आरामखुर्चीत बसून चहाचा घोट घेताघेता दलितांचे दैन्य समजावून घेणाऱ्यांकरिता प्रामुख्याने नाही. तिचा रोख ज्यांना दिवसातून एक वेळसुद्धा पोटभर जेवण मिळत नाही; मग तर सुखविलासाबद्दल बोलायलाच नको; अशा करोडो निरुत्तर जनतेवर आहे. या जनतेला वाली कोणी नाही म्हणून ऐक्य साधून स्वावलंबनाच्या पराक्रमाने आपला उद्धार साधावा, असे शेख यांच्या बहुतेक कवितांचे 'ध्रुवपद' आहे. जनतेत स्वोद्धाराची शक्ती आहे पण ती शक्ती ऐक्याच्या अभावी व्यक्तीव्यक्तीगणिक फुटलेली आहे. यामुळे कार्यक्षमतेच्या बाजूने ती असून नसल्यासारखीच ठरते.




बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्यातून साकारलेले अमरचित्र

> *आपण याच धरतीवर जन्मलो याची धन्यता वाटणारा हा कवी महाराष्ट्राच्या खेळत्या आणि उसळत्या रक्त वाहिन्यांना कधी विसरलेला नाही.*

श्री. शेख हे आपल्या अनेक कवितांमधून शेतकरी-कामकऱ्यांना पुनःपुन्हा गर्जून सांगत आहेत की, संघसमुदाय निर्माण करा. त्याची कास धरा. आणि दुसऱ्याच्या औदार्याकडे लाचारीच्या आशाळभूत दृष्टीने पाहत न बसता आपले न्यायसिद्ध अधिकार आपल्या मनगटाच्या बळावर विश्वासून उपभोगू लागा. तुम्हांला शासन करण्यासाठी कितीही प्रचंड सामर्थ्य एकवटून मग अंगावर आले व तुमची एकी अभंग राहिली तर ते सामर्थ्य आल्या जागी जिरून जाईल व तुम्ही विजयी व्हाल.

एका अर्थाने समाजातील शेवटच्या घटकामध्ये जाणीव जागृती करून त्यांचे उत्थान घडवून आणण्याची प्रेरणा अमर शेख यांच्या कवितेतून मिळत होती. शेवटच्या घटकाचे दुःख, दैन्य केवळ चव्हाट्यावर न मांडता त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याची उत्कट इच्छा मनात ठेवून अमर शेख कविता लिहीत होते. आपल्या समाजबांधवाच्या सुखदुःखाशी समरस होत अमर शेखांनी वेदनेला शब्दाचे रूप दिले. अमर शेख यांनी कामगार, शेतकऱ्याची बाजू उचलून धरल्यामुळे काही मंडळींनी त्यांच्यावर टीका करायला सुरुवात केली होती. या टीकेला अमर शेखांनी 'अमर गीता'च्या मनोगतातून उत्तर दिले आहे.

''कलाक्षेत्रांतल्या काही ठेकेदारांना वाटते की कामगार, शेतकऱ्यांना कला कशाशी खातात हे मुळी ठाऊकच नाही. आग, भूक, क्रांती, उठाव, लढाया एवढ्या शब्दांची खैरात आरडाओरडा करून 'ऐकत राहणं' हीच आम्हा कामगार, शेतकऱ्यांची कला, अशी भोळी समजूत या 'महान प्रज्ञावंतांची' झालेली आहे. ज्यांनी कधी ढोलकीचा ताल तसेच झिलकऱ्यांचा लागलेला षड्ज, पंचम ऐकलेला नसतो. ढोलकीवाला अथवा झिलकरी यातून कुणी जरी बेताल अथवा बंजूरपणा दाखवला तरी कलेच्या दृष्टीने अडाणी समजला जाणारा कामगार, शेतकरी घोंगडी झटकून हुईऽऽऽ करून कार्यक्रम कसा उधळून लावतो हे पाहिलेही नसते. अशा त्या सर्वगामी 'प्रज्ञावंता'विषयी मला काहीच लिहायचे नाही. पण

◆ ***अमर शेखांची एक एक ओळ म्हणजे बंदुकीची फैर आहे. तोफेच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या लाल रसरशीत गोळ्याप्रमाणे त्यांचे जळजळीत शब्द एकामागून एक बाहेर पडत असतात. मग ते गाणे मातृभूमीच्या अभिमानाचे असो, नाहीतर साम्राज्यवाद्यांना दिलेल्या आव्हानाचे असो.*** ◆

आपण प्रत्यक्ष पाहत आहात की, गुंडगिरीच्या कायद्याच्या दंडुक्यांना झुगारून देऊन तत्त्वज्ञानाने लोकविरोधी बुरखे फाडून फेकून आपली ही लोककला महाराष्ट्रात सैराट धावत निघाली आहे. कानाकोपऱ्यात तिचे ध्वनी उमटत आहेत. नवनवे लोक गायक, नवीनवी कलापथकं महाराष्ट्रीय जनतेसमोर येत आहेत.''

अमर शेखांनी आपल्या लेखणीतून तथाकथित प्रज्ञावंतांना त्यांची जागा दाखवून दिली. त्याचप्रमाणे त्यांना प्राणप्रिय असणारा कामगार, शेतकरी यांची लंगडी बाजू उचलून धरत ती सुधारण्यासाठी आपली लेखणी आणि वाणी झिजवली.

अमर शेखांच्या 'धरतीमाता' या कवितासंग्रहाचे प्रकाशन मुंबईत झाले. ते आचार्य अत्रे यांच्याच हस्ते. त्यावेळी आचार्य अत्रे व सुप्रसिद्ध समीक्षक अनंत काणेकर हे व्यासपीठावर होते. दोघेही काव्य क्षेत्रातील दर्दी आणि नावाजलेले मान्यवर होते. या प्रसंगी भाषण करताना आचार्य अत्रे म्हणाले होते, ''अमर शेख हे महाराष्ट्राचे अमर शाहीर आहेत. शाहीर आणि कवी यांच्यामध्ये फरक आहे. शाहिरी ही जनतेवर परिणाम करणारी एक कला आहे. आपली शाहिरी परंपरा फार मोठी असून ती लोकमत जागृत करण्यासाठी आहे. रशियामध्ये जो मायकोव्हस्की नावाचा कवी होऊन गेला त्याच्या काव्यामध्ये जो जोर होता तो जोर, जिवंतपणा, ती प्रतिभा मला आज अमर शेखांच्या काव्यामध्ये दिसते. जीवनामधल्या अगदी बारीक-सारीक गोष्टी टिपून घ्यायच्या आणि महाराष्ट्रामध्ये काही तरी मार्गदर्शन करायचे या भावनेचे अमर शेखांचं काव्य आहे. आमच्या महाराष्ट्राची काव्यपरंपरा अगदी स्पष्ट आहे. ती परंपरा शुद्ध स्वरूपामध्ये, निर्मळ स्वरूपामध्ये आज अमर शेखांनी

◆ *संयुक्त महाराष्ट्राच्या देदीप्यमान लढ्यात अमर शेख यांचे योगदान महत्त्वाचे होते.* ◆

चालवलेली आहे. अमर शेखांनी महाराष्ट्राची जी सेवा केली आहे ती महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांत लिहावी लागेल.''

श्री. काणेकर म्हणाले होते; ''धरतीमधून जसे फुलाफळांचे कोंब वर येतात तसे अमर शेखाच्या अंतःकरणातून काव्य बाहेर येते आणि ते काव्य जनतेतल्या एकंदर सुखदुःखाचे असते. रशियामधला मोठा लोककवी क्रांतीच्या काळामध्ये होऊन गेला. मायकोव्हस्की. त्याने आपल्या काव्यात जे वर्णन केले आहे तेच वर्णन महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी अमर शेखांच्या काव्याला बरोबर तंतोतंत लागू पडते. ते वर्णन त्याने असे केलेलं आहे, मॉस्कोच्या चौकाचे मी फलक करणार, जनतेच्या रक्ताने रंगवणार. आम्ही मुंबईच्या चौकाचे फलक केले होते. जनतेच्या रक्ताने रंगवलेली ती चित्रं अमर अशी आहेत. हे जे सर्व मायकोव्हस्कीचं प्रतीक आहे ते सर्वतोपरी अमर शेख यांच्या काव्याला लागू पडत आहे. अमर शेख कवी आहेत पण त्यांचं काव्य जिवंत जीवनाचं हे काव्य आहे. त्यामध्ये जीवनाचा ओबडधोबडपणा, जीवनाचा जिवंतपणा आणि जीवनाची रसवंता आपल्याला आढळते.''

अमर शेख यांच्या कवितेवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रचंड छाप पडलेली दिसून येते. अमर शेख यांचे बालपण खेड्यात गेले. त्या खेड्याचे संस्कार त्यांच्या कवितेत दिसतात. बालपणी त्यांनी गरिबी, दारिद्र्य यांचे चटके सोसलेले होते. हे दैन्य संपले पाहिजे अशी तळमळ त्यांच्या कवितेत होती. या तळमळीपोटी अमर शेख कविता लिहीत असत. त्यांनी आपल्या काव्य-लेखनाची प्रेरणा सांगताना म्हटले आहे, ''माझ्याकडून कोणीही लिहून घेत नाही. कुठल्या मोहानेही मी लिहू शकत नाही. माझी कविता माझ्यापुरतंच बोलायचं तर ती एक अतितीव्र वेदना आहे.

आपल्या कवितेबद्दल 'धरतीमाता' संग्रहात शाहीर अमर शेख म्हणतात, ''काव्य म्हणजे सत्याकडे जीवनाची ज्वलंत आणि अव्याहत अशी धाव असे मी समजतो. सागर सत्य आहे. जीवनप्रवाह आहे. प्रवाहाला सागराची ओढ नैसर्गिक असणार. कारण ते एकरूप आहे.

◆ *पक्षाच्या चौकटीत कला बसत नाही. ती चौकट कलावंताची उलट तडफडच घडवते आहे हे पाहताच अमर शेखांनी पक्षाचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र कलापथक स्थापन केले.* ◆

म्हणून जीवनही सत्यच आहे. हे जीवन अविरोध हक्काने आणि मानाने जगायला मिळावे म्हणून घेतली जाणारी धाव, अभिलाषा म्हणजे भावनांची स्वातंत्र्याकांक्षा हीही सत्य आहे आणि म्हणून या सत्याचा पुरस्कार करणार कवी काय किंवा शाहीर काय तो स्वकालीन प्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्माचा तो वाहक असतो. येईल त्या परिस्थितीला तोंड देऊन त्या युगातील सत्य म्हणजे युगधर्म त्याने सांगायचा असतो. आपला युगधर्म म्हणजे समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे. माझी कविता ही माझ्या समाजजीवनाचा जबाबदार अशा सामान्य माणसाच्या जीवनातच जन्मली आहे.'' एवढी रास्त व स्वच्छ भूमिका शाहीर अमर शेख यांची होती.

अमर शेख यांच्या कवितेतील वैचारिकतेचा विचार केला की प्रामुख्याने जाणवते ते हे की, त्यांच्या कवितेने जीवनाच्या परिवर्तनाचाच जणू आलेख रेखाटलेला आहे. 'कलश' आणि 'धरतीमाता'मधील कविता या विधानाची साक्ष देण्यास पुरेशा आहेत. 'धरतीमाता'त अमर शेख जो क्रांतीचा रसरसलेला विचार मांडतात तो 'कलश'मध्ये नाही. याचे कारण 'कलश'मधील कविता या स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. पण स्वातंत्र्यानंतर अपेक्षाभंग झाला आणि जे जीवनाचे भेसूर चित्र दिसू लागले त्याने अमर शेख अस्वस्थ झाले. त्याचबरोबर सर्व जीवनावर धनिकांनी जी जबरदस्त पकड बसवली त्यामुळे जीवनाचा पार तोलच गेला. अशा वेळी क्रांतिविचारांची त्यांना गरज वाटली आणि तो विचार त्यांनी शाहिरी बाण्याने मांडला. अमर शेखांच्या कवितेला काळाचा मोठा संदर्भ आहे. त्यांना ज्ञात असलेले जीवन जसे जसे बदलून गेले तसतसे त्यांनी भाष्य केले आणि हे काम करताकरता जीवनाचे मंगल स्वप्नही पाहिले. अमर शेखांचा क्रांतीचा विचार हा स्वप्नांच्या अपेक्षाभंगातून जन्माला आला आहे. तसाच तो मानव प्रेमातूनही आला आहे. समर्थ

◆ ***पक्ष सोडला तरी अमर शेखांनी प्रबोधनाचे काम बंद केले नाही. आपल्या कलापथकाच्या माध्यमातून ते महाराष्ट्राला जागवत राहिले. 'कथापथक' हा अमर शेख यांचे पंचप्राण होते.*** ◆

मानवाची त्यांची निश्चित अशी कल्पना आहे. तो सर्वार्थाने समर्थ व्हावा ही त्यांची तळमळ होती. जात, धर्म, पंथ, भेद या संकुचित कल्पनांत त्यांचा माणूस मुळीच उभा नाही. तो त्याच्याही पलीकडे जाऊन उभा राहिलेला आहे आणि म्हणून अमर शेख म्हणतात,

*''माझा देहचि धरतीमाता*
*हा कुराण ही माझी गीता*
*यातच धन-ऋण शक्ती उपजल्या*
*बुद्धी भावना रूप जाहल्या*
*शब्दांच्या या तारेमधुनी*
*जगी एक होऊन प्रकटल्या*
*प्रकाशमय हे जीवन झाले*
*गूढ उकलण्या पुढे निघाले.''*

कृतिनिष्ठा, जीवननिष्ठा, मानवनिष्ठा आणि शौर्यनिष्ठा यातून अमर शेखांच्या कवितेतील विचार बहरास आलेला आहे. काळाचे भान राखून भविष्याचा अचूक वेध घेऊन त्यांच्या कवितेने क्रांतीचा आणि शांतीचा असा दुहेरी विचार मांडला आहे. अमर शेखांच्या कवितेचे मूळ रूप आहे तेच वैचारिकतेचे. या कवितेला सतत आवर्जून काहीतरी सांगण्याचा ध्यास आहे. ती मुळात मानवपूजक असल्याने समग्र मानवतेचा विचार हा अमर शेखांच्या कवितेचा स्थायिभाव बनलेला आहे.

अमर शेखांच्यावर साम्यवादाचा प्रचंड पगडा होता. सर्व कष्टकऱ्यांचे हित त्यांच्या डोळ्यासमोर होते. त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांनी स्वतः अनुभवले होते. त्यांनी शेतकऱ्यांची दुःखे पाहिली होती. शेतमजुराच्या घरातील जन्म असल्याने त्यांच्या शोषणाची रीत ते जाणत होते. गिरणी कामगाराच्या रूपानं कामगारांचे दुःख त्यांनी अनुभवले होते. म्हणून त्यांची कविता श्रमप्रतिष्ठेची महती वर्णन करते. यासंदर्भात पुढील

◆ *आपल्या स्वरमाधुर्याने मराठी माणसांची मने एका वेगळ्या पातळीवर नेणारा हा कलावंत आपल्या कलेच्या सामर्थ्यावर तीन चतुर्थांश जग पाहून आला होता.* ◆

विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. 'बहुजन समाजाशी, कामगारवर्गाशी अमर शेख यांचे हार्दिक नाते होते. वर्गसंघर्षाचा पुकारा त्यामुळेच त्यांच्या कवितेतून ऐकू येतो. त्यांचे गद्यलेखन या उद्देशाने जन्मले असले तरी त्यांची कविता त्यांच्या अंतःकरणाचे तीव्र उद्रेक जिवंतपणे सशब्द करते. नाट्यमयता, प्रासादिकपणा आणि अभिव्यक्तीचा मुक्तप्रकट यामुळे त्यांची कविता थेट आवाहन करणारी वाटते.'

१९६५ साली अमर शेख यांच्या कवितेवर 'अमर शेखांची कविता' हा पहिला समीक्षा ग्रंथ माधव पोतदार यांनी लिहिला. या समीक्षा ग्रंथाला मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांची प्रस्तावना लाभली होती. या प्रस्तावनेत अमर शेख यांच्या काव्यगुणांची वैशिष्ट्ये नेमकेपणाने मांडली होती. ते लिहितात. ''श्री. अमर शेख यांच्या कवितेवर मोठासा ग्रंथ लिहिला गेला आहे हे प्रथम ऐकले तेव्हा ते आक्रितासारखेच वाटले. अजून हयात असलेल्या कवीविषयी इतक्या विस्ताराने कोणी सहसा लिहीत नाही. आणि तेही श्री. अमर शेखांबाबत घडावे हे विशेष! आजवर त्यांच्या कवितेवरील फारसे लेखही डोळ्यात भरले नाहीत. कवितासंग्रहांवर कधी काही अभिप्राय दिसले होते आणि साहित्याची चिंता सदैव वाहणाऱ्या नियतकालिकांनी तर त्यांचा उल्लेखही वर्ज्य मानला. पुस्तकी जमातीने, निदान तिच्यावर ताबा चालवण्याचा आव आणणाऱ्या शिष्टांनी श्री. अमर शेखांना असे वाळीत टाकावे अशी कोणती पापे त्यांनी केली होती? पहिले : हजारांनी गणावेत असे श्रोते त्यांच्या गीतांनी भारून जात. दुसरे : त्यांच्या (कालपरवापर्यंतचा) राजकीय विचार सदर शिष्टांना मंजूर नव्हता. यापैकी दुसरे पाप अर्थातच अधिक घोर. त्या विचारांचा रंग अलीकडे थोडासा बदलला असला (व चालू रंगाच्या तो जरा जवळ आला असला) तरी 'पतित एकदा पतित तो सदा'- हा कर्मठ त्याच त्यांच्या बाबतीत कडवेपणाने लावण्यात आला आहे. सर्वांबाबत तसे होत

◆ *समाजातील शेवटच्या घटकामध्ये जाणीव जागृती करून त्यांचे उत्थान घडवून आणण्याची प्रेरणा अमर शेख यांच्या कवितेतून मिळत होती. शेवटच्या घटकाचे दुःख, दैन्य केवळ चव्हाट्यावर न मांडता त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याची उत्कट इच्छा मनात ठेवून अमर शेख कविता लिहीत होते.* ◆

नाही. आजवर सोय पाहून अनेकांनी रंग बदलले. अनेकदा बदलले. कोणी रंगाच्या विसंगत छटाही अशा बेमालूम मिसळून टाकल्या की, ही का ती असा संभ्रम पडावा. पण साज जमवून घेण्याच्या व्यवहार कुशलतेने विसंगती झाकली, अशा पटाईतपणे की ही विसंगती हासुद्धा गुण वाटावा. गोडी गुलाबी हे त्या गुणाचे दुसरे नाव. किंबहुना गुलाबी छटा ही ललित साहित्याप्रमाणे राजकारणातही संभावित झाली आहे. जेवढी फिकट तेवढी अधिक संभावित! पण अमर शेखांचा रंग थोडा मंदावला तरी गडद आणि उग्र उभा राहिला तो दृष्टीसमोर नकोसा वाटला.

ही काही एकट्या अमर शेखांचीच परवड नाही. अलीकडच्या काळात तर हे पुन्हापुन्हा घडत आहे. अगदी कवितेच्या अंगणातील दाखला द्यायचा झाला तर ग. दि. माडगूळकरांचा देता येईल. त्यांच्या गीतांनी आणि गीतरामायणाने लक्षावधी श्रोत्यांना वेडे केले पण कवित्वाचे शेलेपागोटे त्यांना चढवण्याबाबत केवढा वाद! फार तर त्यांना 'यशस्वी गीतकार' म्हणू असा गाभाऱ्याचा कौल पडावा! आचार्य अत्रे अथवा पु. ल. देशपांडे हे फारच लोकप्रिय असले तरीसुद्धा त्यांची सर्वोत्कृष्ट निर्मिती लक्षात घेता आणि साकल्याने विचार करता ते चांगले साहित्यकार आहेत असे म्हणायला हरकत नाही असा सावध आणि सवलतीचा सूर तेथूनच निघला. श्री. रणजित देसाई यांच्या 'स्वामी'वर वाचकांच्या 'न भूतो न भविष्यति' अशा उड्या पडू लागताच श्री. देसाई यांचे कलात्मक दोष एकाएकी उघडे झाले!

महाराष्ट्रातील समीक्षकांनी अमर शेखांवर कसा अन्याय केला, त्यांना कसे नाकारले हे स्पष्ट शब्दात मांडल्यानंतर राजाध्यक्ष यांनी माधव

◆ *अमर शेखांनी आपल्या लेखणीतून तथाकथित प्रज्ञावंतांना त्यांची जागा दाखवून दिली. त्याचप्रमाणे त्यांना प्राणप्रिय असणारा कामगार, शेतकरी यांची लंगडी बाजू उचलून धरत ती सुधारण्यासाठी आपली लेखणी आणि वाणी झिजवली.* ◆

पोतदार यांनी अमर शेख यांच्या कवितेकडे कसे पाहिले आहे, त्यांचे वेगळेपण काय आहे हेही मांडले आहे. ते लिहितात, ‘‘या पुस्तकात आचार्य पोतदार यांनी अमर शेख हे केशवसुतांच्या परंपरेतील कसे हे तपशिलाने दाखवून दिले आहे. खुद्द अमर शेखांनीच केशवसुतांवरील कवितेत ‘हे तात कृष्ण केशवा’ असा त्यांचा धृपदाने गौरव केला आहे, त्यामागील उमाळा पूर्णपणे सच्चा आहे. वस्तुतः ज्ञानेश्वर-तुकारामांप्रमाणे केशवसुतांचेही नमनासाठी नाव घेण्याची टूम आता जुनी झाली आहे. पण ती वापरणाऱ्या कित्येक कवींचे गोत्र केशवसुतांशी मुळीच जुळणारे नाही. याची हवी तेवढी गमतीदार उदाहरणे देता येतील. विस्तार नको म्हणून ती टाळायची. पण केशवसुतांचा ‘चेला सच्चा’ हा अभिमान मिळविणारे गोविंदाग्रजदेखील गुरुमार्गापासून चालले याचा तरी उल्लेख अवश्य केला पाहिजे. आजच्या जीवनावरील मर्ढेकरांची टीका ही निराळ्या सुरातील असेल पण ती तळमळीने केलेली टीका आहे. आणि म्हणून केशवसुतांच्या परंपरेत तिचा अंतर्भाव करता येईल हा विचारही आचार्य पोतदारांनी स्वच्छपणे मांडला आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. कोण जाणे उद्या साहित्य क्षेत्रातले वारे उलटले तर कदाचित प्रचारकी (किंवा ‘सामाजिक’ किंवा मानवतावादी) काव्य लिहिणारे अशी मर्ढेकरांची तारीफ करण्याची प्रथा पडेल!

अमर शेखांच्या कवितेची जात अलीकडच्या बहुतेक कवितेहून फार निराळी आहे. वाणी हे तिचे खरे वाहन आहे. मुद्रण नव्हे. आपल्याला कविता डोळ्यांनी वाचण्याची सवय झाली आहे. ती कानांनी वाचायला हवी ही जेरर्ड मॅनली हॉपकिन्स या इंग्रजी नवकाव्याच्या प्रणेत्याची मागणी लक्षात घेण्यासारखी आहे. छपाईत शब्द जणू थिजतात. कंठातून त्याचे सारे ऐश्वर्य आणि चैतन्य प्रकट होऊ शकते. तशा कंठाचे देणे

◆ *कविश्रेष्ठ काणेकर म्हणाले होते; ‘‘धरतीमधून जसे फुलाफळांचे कोंब वर येतात तसे अमर शेखाच्या अंतःकरणातून काव्य बाहेर येते आणि ते काव्य जनतेतल्या एकंदर सुखदुःखाचे असते.’’* ◆

अमर शेखांना आहे. छापील कवितेत आपण मात्रा आणि ऱ्हस्वदीर्घ मोजतो ते अगदी जुन्या पंतोजीच्या आविर्भावात आणि मग कवितेवर शुद्धाशुद्धतेबाबत शेरे मारतो. जिवंत वाणीच्या ओघात या भाकड तपासणीला अर्थ उरत नाही. हे गद्याबाबतही खरे आहे. त्याचा आपल्याला वारंवार विसर पडतो. म्हणून आपले बरेचसे छापील गद्य इतके बोजड आणि कृत्रिम असते. मुद्रणकलेने आपल्यावर अनंत उपकार केले असतील पण तिच्यावर सदैव अवलंबून राहिल्याने भाषा पांगळी होण्याचा धोका असतो हे आपण जाणले पाहिजे याचा बोलीतील एरव्ही अकारण अशुद्ध समजल्या जाणाऱ्या शब्दांचा अमर शेखांनी कसा उपयोग केला आहे या विषयी आचार्य पोतदारांनी या पुस्तकात विवरण केले आहे. ते सर्व संमत होण्यासारखे नसले तरी या मुद्याकडे लक्ष वेधण्यास त्याचा निश्चित उपयोग होईल.’’

अमर शेखांची बहुतेक सर्वच गीते ही सादरीकरणाची आहेत. त्यांच्या गीतात नाट्यमयता आहे. मराठी कवितेत कविवर्य तांब्यांनी आपल्या कलावादी दृष्टिकोनातून आपला नाट्यगीतांचा प्रवाह सातत्याने वाहता ठेवला त्यापाठीमागे ब्राऊनिंगचा अभ्यास प्रेरणादायक ठरला असावा. अमर शेखांच्या नाट्यगीतात मात्र अशी दुसरी कोणती खास आणि वेगळी प्रेरणा असावी असे वाटत नाही. जीवनवादी दृष्टिकोनातून सहज रम्य आणि भावनोत्कट नाट्यगीते रचण्याची नवी क्रिया अमर शेखांच्या कवितेत निश्चित घडलेली आहे हे दुर्लक्षिता येण्यासारखे नाही. अमर शेखांच्या नाट्यगीतांत पहिले ठळक वैशिष्ट्य आढळते ते हे की, त्यांच्या नाट्यगीतांत वैचारिक उदात्तता पूर्णत्वाने दिसते. त्यांची कविता चिंतनातून बाहेर पडताना ती विशाल उदात्त स्वरूप घेत असल्याचे दिसते. ही उदात्तता जीवनाच्या खोलवर निष्ठेतूनच प्रकट झालेली पाहावयास सापडते. उदात्ततेने फुललेले असे अमर शेखांचे प्रत्येक नाट्यगीत

◆ *''माझी कविता माझ्यापुरतंच बोलायचं तर ती एक अतितीव्र वेदना आहे. माझी कविता याच पायावर उभी आहे आणि जोपर्यंत माझा पाया भक्कम आहे तोपर्यंत मला व माझ्या कवितेला डर नाही आणि मरणही नाही.''* ◆

असते असे म्हणायला हवे. आजच्या जीवनाचा अचूक वेध घेण्याची ताकद कवीच्या मनात असल्याने कविता कल्याणकारी बनलेली आहे. जीवनानुभूती तिच्यात गडद स्वरूपात पाहायला मिळाल्याने जीवनातील असफलता व असमाधान यांचे नाट्यगीताद्वारे दर्शन होते. पण हे केवळ दर्शन घडवण्यावर भागत नाही, तर त्याबद्दलची एक प्रकारची चीडचीड या नाट्यगीतांतून व्यक्त झालेली दिसून येते.

कित्येकदा भोवतालच्या जगात चाललेल्या कृत्यांची मोजदाद करताना कवीच्या तरल प्रतिभेला विसंगतीचा, विकृतीचा साक्षात्कार होतो. त्यांची तगमग वाढते आणि मग अशा वेळी कवी उपरोध आणि उपहास यांचा आश्रय घेतो. अमर शेखांच्या काही नाट्यगीतात या दोन्ही गोष्टी उपयोजिलेल्या दिसतात. तर विसंगतीतील मर्म हुडकण्यासाठी नव्हे, राहवत नाही म्हणून अशी रचना कवीने केलेली दिसते. नाट्यगीतांचे भावनोत्कटता हे मुळी वैशिष्ट्यच आहे. भावनोत्कटतेशिवाय नाट्यगीताला काहीही अर्थ नसतो. अमर शेख हे तळमळणारे, परकाया प्रवेश करून भावनांचा उद्रेक घडवणारे कवी असल्यामुळे त्यांच्या नाट्यगीतात भावनोत्कटता ही ओघानेच येते. त्यांच्या हृदयाचे आक्रंदन कवितेत प्रतिबिंबित झालेले दिसते ते भावनोत्कटतेमुळेच. विषयाला ओझरता स्पर्श करण्यापेक्षा त्याच्या अंतरंगाचा ठाव घेण्यासाठी जी झेप असावी लागते ती अमर शेखांच्या प्रतिभेत निश्चित असलेली जाणवते. म्हणूनच त्यांचे नाट्यगीत भावनोत्कट झालेले दिसते.

अमर शेख कधीच स्वप्नाळू नव्हते पण स्वप्नवेडे मात्र खास होते. भव्यता आणि उत्तुंगता हा त्यांच्या स्वप्नाचा विशेष होता. एखादे वेडे स्वप्न उराशी कवटाळायचे आणि त्यासाठी लागेल ती झीज सोसायची, देहदंड सोसायचा आणि लागेल ते दिव्य करायचे हा या स्वप्नवेड्या कवीला

> ◆ *कृतिनिष्ठा, जीवननिष्ठा, मानवनिष्ठा आणि शौर्यनिष्ठा यातून अमर शेखांच्या कवितेतील विचार बहरास आलेला आहे.* ◆

जात्याच छंद होता. आणि त्याचे खरे रूप जे प्रकट होई ते थोडावेळ मिळाल्यानंतरही लिहिलेल्या पत्रातून. आपल्या मित्रांना वेळात वेळ काढून एकांतात बसून ते पत्र लिहीत असत व आपली प्रत्येक स्वप्नामागची भावना निश्चित कल्पना ते बोलून दाखवीत. ही दाखवण्यामागे उद्देश एवढाच असे की, आपल्या मित्रांनी मग स्फूर्ती द्यावी व अधिक कार्यप्रवण बनवावे. अमर शेख सुंदरसे एखादे स्वप्न चितारीत. त्यामागे निश्चित अशी भूमिका असे आणि त्या स्वप्नाचा विशेष हा की त्यात 'स्व'चा चुकूनही विचार नसे. जीवनावरील अविचल निष्ठा त्या मोहमयी, मंगल अशा स्वप्नातून आपणास सातत्याने प्रतीत होत असे. एके ठिकाणी अमर शेख लिहितात–

''माझा विश्वास माझ्या दैवतावर-कलेवर व आपल्यासारख्या मुत्सद्यांच्या सद्‌भावना सदिच्छेवर. त्यामुळे मला हा मान मिळाला (राष्ट्रपतिपदक), गौरव झाला. हा आनंद माझा कसा? तुम्हीच म्हणता ना, महाराष्ट्राच्या प्रपंचाशी सर्वतोपरी एकरूप झालेल्या या श्रेष्ठ कलाकाराचा गौरव हा त्या कलाकाराचा, व्यक्तीचा गौरव कसा बरे होईल? श्रेष्ठ महाराष्ट्राचा, त्यातील गुणी रसिकांचा त्यातील तुमच्यासारख्या माझ्या मुत्सद्यांचा हा गौरव म्हणून आनंद हा आपणा सर्वांचाच नाही का?''

असा हा कलावंत महाराष्ट्रात समाजवाद यावा यासाठी धडपडत होता. जनतेला सतत जागृत करीत होता. 'रात आहे वैऱ्याची जागा राहा' म्हणून इशाऱ्यावर इशारे देत होता. आचार्य अत्रे यांनीच एका व्याख्यानात म्हटले आहे, ''आज आपल्या देशामध्ये समाजवाद आणायचा आहे. समाजवाद कसा येईल याचे मार्ग निरनिराळे आहेत. पण अमर शेखांचा आत्मा सामजवादासाठी तडफडतोय. या देशात, महाराष्ट्रात समाजवाद कसा येईल या एका जाणिवेने त्यांचे काव्य लिहिले गेले आहे... अमर शेखांनी महाराष्ट्राची जी सेवा केली आहे ती महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहावी लागेल.''

◆ *१९६५ साली अमर शेख यांच्या कवितेवर 'अमर शेखांची कविता' हा पहिला समीक्षा ग्रंथ माधव पोतदार यांनी लिहिला. या समीक्षा ग्रंथाला मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांची प्रस्तावना लाभली होती.* ◆

अमर शेखांनी महाराष्ट्राची सेवा आपल्या समर्थशाली सुरांनी, जळजळत्या शब्दांनी आणि धगधगत्या अंतःकरणाने केली आहे. ती करताना त्यांनी कशाचीच पर्वा केलेली नाही. त्यांच्यावर संकटाचे वेळोवेळी डोंगर कोसळले पण हा मृत्युंजय कधीच आपल्या ध्येयापासून विचलित होऊ शकला नाही. याचे कारण कार्यावरची त्यांची अढळ निष्ठा...

भविष्यकाळाचा वेध घेण्याची त्यावर भाष्य करण्याची जबरदस्त ताकद कवीच्या प्रतिभेत जात्याच असावी लागते. अमर शेखांच्या कवितेत ती पुरेपूर होती. त्यांची जीवननिष्ठा जशी तेजस्वी होती त्याचप्रमाणे त्यांनी त्या जीवननिष्ठेला दिलेली विज्ञाननिष्ठेची जोडही तेवढीच प्रखर आणि समर्थ अशी होती. सामान्यातील असामान्यत्व प्रकट करण्यासाठी जबरदस्त हौस अमर शेखांच्या प्रतिभेला होती. सामाजिक प्रक्षोभ चितारण्यात ती जशी कुशल होती त्याचप्रमाणे आत्मकेंद्रित झालेली प्रतिभा उसळून निघण्यातही विशेष वाकबगार होती. 'तृप्ती' या कवितेतील उत्तुंग कल्पनाच अमर शेखांच्या प्रतिभाशक्तीचा चांगला प्रत्यय आणून देतात व त्यांची विज्ञाननिष्ठाही उत्तमप्रकारे सिध्द्ध करतात.

समाजवादाचे समाजपोषण असे तत्त्वज्ञान घेऊन त्यांची भक्कम अशी बैठक देऊन आपल्या कवितांची कलात्मक मांडणी केलेली आहे. त्यामुळे ते युगमानसाचे कवी या नात्याने किती श्रेष्ठ होते हे सहजच प्रत्ययाला येते.

असे हे महाराष्ट्र शाहीर सदैव समाजात राहिले. समाजाच्या सुखदुःखाशी समरस होऊन त्यांची उकल करण्यासाठी झटले. ही उकल करण्यासाठी त्यांना शाहीर-कलेचा उपयोग झाला. शाहिरी कला, परंपरा कायम जिवंत राहावी यासाठी शाहीरनगर उभे करण्याचे अमर शेखांनी स्वप्न पाहिले. त्यासाठी नगर जिल्ह्यात बोधेगाव येथे साडेसोळा एकर

◆ *अमर शेखांची बहुतेक सर्वच गीते ही सादरीकरणाची आहेत. त्यांच्या गीतात नाट्यमयता आहे.* ◆

जमीन त्यांनी खरेदी केली. सर्व श्रेष्ठ शाहिरांनी तेथे राहून नवीन शाहीर निर्माण करावा, आपली काही विद्या नव्या कलावंतांना शिकवावी, तेथेच राहून शेती करून गुरुशिष्य परंपरेप्रमाणे सर्वांनी राहून शाहिरी परंपरा पुढे न्यावी असे सुंदर, उदात्त स्वप्न मात्र पूर्ण झाले नाही. २९ ऑगस्ट १९६९ रोजी इंदापूरला कार्यक्रमासाठी जाताना रात्री २ वाजता गाडीला मोठा अपघात झाला. आणि त्यातच महाराष्ट्राचे अमूल्य रत्न, बुलंद आवाज असलेल्या अमर शेख यांचा मृत्यू झाला.

भारतातच काय पण जगाच्या इतिहासात मृत्यू दाखवल्यावर जातीच्या कलमात 'मानवता' लिहिला गेलेला अमर शेख एकमेव माणूस असेल!

अमर शेख हेच मुळी एक उमलते स्वप्न होते. त्यात काव्य होते ते रसरशीत आणि सातत्याने फुलणारे. व्यथित मनाने जगणारे हे स्वप्न भविष्याचा शोध घेताना फार फार आशयवादी बने आणि आपल्या मनाचा उमदेपणा, हळुवारपणा स्पष्ट करी. तसे पाहिले तर या स्वप्नात केवढे तरी नाट्य होते, त्यात उत्कटता होती. भावनेचा जोश होता आणि त्याला विवेकाची सुंदरशी जोडही होती.

### ● जीवननिष्ठेचा प्रत्यय

अमर शेखांची वेदना, व्यथा आणि त्यांच्या विविधवृत्तींची तेजस्विता त्यांच्या काव्यातून स्पष्टपणे दिसते. शब्दाशब्दावर अमर शेखांचा ठसठशीत ठसा स्पष्ट करणारी अशी त्यांची कविता आहे. त्यांच्या कविता जन्माला येताच तीव्र, उत्कट अशी वेदना घेऊन आली. ती कधी पालवली, कधी मोहरली, कधी आत्मकेंद्रित बनली तर कधी बेहोशही झाली. जनसामान्यांची सेवा करताना त्यांचे जीवन तेजोमय बनवताना तिला जो बहर येई त्यानेच अमर शेखांचे जीवन सुखावत होते आणि एका धुंद विश्वात स्वैरपणे वावरत होते. पर एरव्ही हळुवार भावनांची जोपासना करणारी जनसामान्यांच्या भावनांना, व्यथांना बोलकी करणारी ही कविता अन्याय, जुलूम, यांच्यावर भाष्य करताना मात्र विजेचे रूप

◆ *जीवनवादी दृष्टिकोनातून सहज रम्य आणि भावनोत्कट नाट्यगीते रचण्याची नवी क्रिया अमर शेखांच्या कवितेत निश्चित घडलेली आहे.* ◆

धारण करी. असे माधव पोतदार म्हणतात. 'वाईट सगळे जाळावे' हा तिला लागलेला निरंतर असा ध्यास होता. आणि हीच कविता जीवननिष्ठेचा प्रत्यय उत्कटत्वाने आणून देत होती. तिने निराशेने मात्र स्वतःला कधी काळवंडू दिलेले नाही. अगदी खोल खोल अशी व्यथा अंतर्मनात बोचत असतानाही तिने आशावादित्व सिद्ध करून दिले. हे देताना तिने महाराष्ट्र सारस्वताचे एक दालन केवढे तरी समृद्ध केले आहे याची अजूनही खरी म्हणजे कल्पना यावयाची आहे. रक्ताने आणि अश्रूने लिहिलेली ही कविता अजून तरी फार थोड्यांना उमगली आहे. असे माधव पोतदार म्हणतात.

## अमर शेख यांचा सौंदर्याचा आस्वाद

अमर शेख विखुरलेल्या सौंदर्याचा आस्वाद घेणारे रसिक तर होतेच पण आपण ज्या सौंदर्याचा आस्वाद घेतो त्या सौंदर्याचा मित्रांबरोबर आस्वाद घेण्याचा छंद फार वेगळा होता. अजंठा लेण्यातील सौंदर्याने अमर शेख अक्षरशः वेडावून गेले.

## अमर शेख एक ध्येयवादी कलावंत

महाराष्ट्र शाहीर अमर शेखावर क्रूर काळाने ज्या दिवशी आपला कठोर हल्ला चढवला त्या दिवशी आचार्य अत्रे यांच्या मृत्युनंतर उभा महाराष्ट्रात पुन्हा एकदा दुःखसागरात लोटला गेला. अमर शेख यांच्या ध्येयवादावर वेडे होऊन महाराष्ट्रातल्या लहान मुलांनी व वृद्धांनी अमर शेखांवर प्रेम केले. अमर हे महाराष्ट्रातले खूप बोलणारे (बहुबोलके) असे एक स्वप्न होते. या स्वप्नात एक प्रकारची दाहकता, मादकता व प्रसन्नता होती. त्याचबरोबर या स्वप्नात एक प्रकारची ओजस्विता, एक प्रकारची धग, वैचित्रपूर्ण अशी धुंदीही होती. हा कलावंत अशा वैशिष्ट्याने सामावला होता. अमर शेख महाराष्ट्रमय बनले होते. जीवनावर अविचल

◆ *अमर शेख कधीच स्वप्नाळू नव्हते पण स्वप्नवेडे मात्र खास होते. भव्यता आणि उत्तुंगता हा त्यांच्या स्वप्नाचा विशेष होता.* ◆

श्रद्धा ठेवणारे ते होतेच पण सर्वांनीच ती ठेवली पाहिजे ही त्यांची तळमळ त्यांना अहोरात्र स्वस्थ बसू देत नव्हती. आजूबाजूचा परिसर फुलला पाहिजे, भोवतालची जीवनकमले विकसित झाली पाहिजेत. जिकडे तिकडे संगती, सौंदर्य आणि सुगंध फैलावला पाहिजे हे या वेड्या ध्येयवादी कलावंताचे स्वप्न होते आणि तेच साकार करण्याचा या कलावंताने ध्यास घेतला होता. त्यासाठीच त्यांच्या देहाला चंदनासारखे झिजावे लागले. ह्या झिजण्यात आत्मिक समाधान होते. एक प्रकारच्या पूर्ततेची जाणीव होती आणि श्रद्धेची मोहमयी किनार होती. प्रा. विंदा करंदीकरांनी एके ठिकाणी म्हटले आहे, ''बहुजन समाजाच्या सुख-दुःखाशी एकरूप झालेला, प्रत्येक जनतेच्या लढ्यामध्ये आघाडीवर असलेला आणि हे करीत असताना आपले सर्व कुटुंबच त्या कार्यामध्ये विसर्जित करणारा अमर शेखांसारखा तोलामोलाचा शाहीर महाराष्ट्रात झालेला नाही. मोठमोठे कवी व साहित्यिक अनेक आहेत. पण आपल्या देहाचीच मशाल करणारा शाहीर एकच - आमचा अमर शेख'' असा हा अलौकिक शाहीर जन्माला आला तो कलावंत म्हणून आणि मृत्युंजय ठरला तोही कलावंत म्हणूनच. या ध्येयवादी कलावंताचे महाराष्ट्रावर, मराठी मातीवर अनन्यसाधारण प्रेम होते. शिवबा, फुले, आगरकर, ज्ञानेश्वर, तुकाराम, टिळक, केशवसुत, कर्वे ही या ध्येयवेड्या कलावंताची आराध्य दैवतेच होती आणि या थोरांचे आदर्श ठेवूनच अमर शेखांनी जीवनाची काटेरी वाट तुडवण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी त्यांनी शब्द, स्वर यांना एक वेगळी अशी धार दिली. उभा महाराष्ट्र आपल्याला स्फूर्ती देतो, चेतना देतो आणि सेवेसाठी उभे करतो ही त्यांच्या मनाची मुळी धारणाच बनली होती. ते आपल्या दि. २०-८-५९च्या पत्रात लिहितात!

''मी लिहितो त्याचं एकच एक कारण माझ्या या महान महाराष्ट्रात वरवर पाहता दरिद्री पण वस्तुतः खरोखरच विचार श्रीमंत आचारसंपन्न, संस्कृतिनिष्ठा, मानवपूजक सह्याद्रीच्या, छातीची व समुद्राच्या मनाची

*कवितेसाठी*
*''हिने आपल्या भावी पिढीसाठी आपल्या शरीरातील पोलाद काढून दिले आहे नि कापूस आपल्या देहात भरून घेतला आहे. हिने रक्त भावी पिढीसाठी दिले आणि रक्तक्षयीशी मैत्री करून भावी पिढीकडे पाहून आनंद व्यक्त केला आहे.''*

असामान्य माणसं जी तुमच्यासारखी असतात. पदोपदी आढळतात. तीच मला सतत स्फूर्ती देतात. उभे करतात. मी निमित्त मात्र ठरतो.'' अमर शेखांनी आपली शाहिरी कला महाराष्ट्रभर मोठ्या डौलाने फुलवली. ''शाहिरी ही जनतेवर परिणाम करणारी एक कला आहे. आपली शाहिरी परंपरा फार मोठी असून ती लोकमत जागृत करण्यासाठी आहे.'' (आचार्य अत्रे) जागृती हा तर अमर शेखांनी आपल्या कलेचा आत्माच मानला होता. त्यासाठीच त्यांची शाहिरी सातत्याने फुलली. ती फुलवताना अमर शेखांना किती वेडे व्हावे लागले याची सहजासहजी कल्पना हे येणे शक्यच नाही. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गो. नी. दांडेकर अमर शेखांना विचारतात, ''किती धडपडता तुम्ही? कौतुक करावेसे वाटते मुख्यतः 'लोकमान्य' या नावाने नव्या बाटलीत जी अनैतिकतेची जुनीच दारू समाजापुढे मांडली जात आहे तिच्या विरुद्ध तुमचा इशारा अजोड आहे. यावरून अमर शेखांच्या कार्याची सहज कल्पना यावी. अमर शेख आपल्या दि. २७ मार्च १९६९च्या पत्रात माधव पोतदार यांना लिहितात- ''...आज पुणे जिल्हा संपणार उद्या मडगाव गोवा. ४ तारखेला म्हापसा गोवा संमेलन उरकून परस्पर विदर्भात जाणार. परत २८ एप्रिल... तोवर आहेच वावटळीतल्या पाचोळ्याची अवस्था'' अमर शेख स्वतःला 'वावटळीतला पाचोळा' म्हणवून घेत. आपण श्रेष्ठ कलावंत आहोत, ध्येयाने वेडे बनले आहोत याची जाहिरात त्यांनी कुठेच केली नाही. उलट ते नम्रतेने वावटळीतला पाचोळा संबोधित. हीच नम्रता माझ्या मते या ध्येयवादी कलावंताला सातत्याने मोठी करीत गेली.''

अमर शेख जीवन मंगल बनावे, ते अर्थपूर्ण बनावे आणि त्याला

***आपल्या मित्रांना वेळात वेळ काढून एकांतात बसून ते पत्र लिहीत असत व आपली प्रत्येक स्वप्नामागची भावना निश्चित कल्पना ते बोलून दाखवीत.***

परिपूर्णता यावी यासाठीच झटत होते. त्याबाबतचे त्यांचे तत्त्वज्ञान तर अगदी साधे पण तितकेच ते भेदक होते. त्यांनीच एके ठिकाणी आपल्या कवितेत म्हटले आहे-

*''जगणे असे तसे नचा हक्काचे अन् मानाचे पण*
*लढत राहूनी रोज मरूनिही । जगेन मी आगळेच जीवन*
*मी मेलो की सर्व संपले । नाही म्हणत मी याला जीवन*
*मी मेलो तरि व्यापून राहील । माझे जीवन अवघे त्रिभुवन''*

हीच उदात्तता अमर शेखांतील ध्येयवादी कलावंतांना विलक्षण पुढे लागून राहिली होती. त्याचे कारणही त्यांनीच आपल्या एका पत्रात सांगून टाकले आहे. ते लिहितात. (दि. ४-५-६४) ''सामान्य जनांच्या आशा-आकांक्षा. हर्ष-विषाद, आनंद सौंदर्याच्या कल्पना यापासून मी कदापिही दूर सरू शकणार नाही.'' आणि या सर्वांसाठीच अमर शेख आपला देह चंदनासारखा झिजवित राहिले. त्या देहाबाबतचीच त्यांची भूमिका पाहा ना. त्यांनीच म्हटले आहे.

*''माझा देहचि धरतीमाता*
*हा कुराण माझी गीता*
*यातच धन ऋण शक्ती उपजल्या*
*बुद्धी भावना रूप जाहल्या.''*

हिंदू-मुस्लीम ऐक्याचा या कलावंताला ध्यास लागला होता. अमर शेखांच्या आत्म्यानेच मुळी हिंदू-मुस्लिमांच्या ज्ञाताच्या कुंपणावरून दूरवर अशी झेप घेतली होती. ''महाराष्ट्र धर्माची द्वाही पंढरीची भागवती'' असे उदो-उदो चालू ठेवूनच ते विकास मम संस्कृतीचा व्हावा!

मांडवाचा वेल चढावा, असा बेलभंडार उचलला होता त्यांनीच दि. २४/५/६५च्या पत्रात म्हटले आहे. ''मुस्लीम ऐक्य हा विषय केशवसुतांनी हाताळला. हिंदू नाही मुस्लीम नाही... हे माझे जीवनच आहे.''

अमर शेख तो निःसंदिग्धपणे पारही पाडीत होते, म्हणूनच ते पदोपदी

◆ ***असा हा कलावंत महाराष्ट्रातून समाजवाद यावा यासाठी धडपडत होता. जनतेला सतत जागृत करीत होता.*** ◆

कळवळून सांगत.

*''मानवतेचे नवीन मंदिर येथे बांधा या जागेवर*
*आज इमारत जुनाट झाली. जीव अकारण मरतिल खाली*
*म्हणून आधी या पाडून टाक देऊनि धक्का...''*

पण हे सारे करताना आपला वाटा कोणता असावा हे सांगायलाही अमर शेख विसरले नाहीत. त्यांनी म्हटले आहे.

*'एक दगड तरि घडू द्या रे या माझ्या हातून*
*एक छन्निचा एक घाव तरी बसू द्या माझा त्या दगडावर'*

आणि हे मंदिर उभारायला सज्ज झालेला हा कलावंत सतत टाहो फोडून एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगत होता ती जगण्याबद्दलची. अमर शेखांच्या अंतरंगातून काव्याचे अमृत पाझर का वाहत होते. त्याची मीमांसा प्रा. काणेकर यांनी अतिशय उत्तम पद्धतीने केलेली आहे. ते म्हणतात, 'धरतीमधून फळाफुलांचे जसे कोंब वर येतात तसे अमर शेखांच्या अंतःकरणातून काव्य येत आणि ते काव्य जनतेतल्या एकंदर सुखदुःखाचे असे ते काव्य आहे.'' यावरून अमर शेख कुणाचे उद्‌गाते होते, कुणाचे प्रतिनिधी होते, कुणाचे कैवारी होते याची सहज उकल होते. प्रा. काणेकरांनीच म्हटले आहे. ''अमर शेख हे कवी आहेतच पण त्यांचं काव्य जिवंत, जीवनाचं असं ते काव्य आहे. त्यामध्ये जीवनाचा ओबडधोबडपणा आहे, जीवनाचा जिवंतपणा आहे आणि जीवनाची रसवत्ता आपल्याला आढळते.''

### अमर शेखांचा 'पाथरवट'

अमर शेख हे केशवसुत परंपरेत शोभणारे आहेत हे सिद्ध करणारी त्याची छोटी, अर्थबोध पूर्ण पण मानवतेबद्दलचे एक वेगळे तत्त्व सांगणारी अशी कविता आहे. ती म्हणजे 'पाथरवट'. जुन्या संस्कृतीची ओळख करताना प्रारंभीच सांगितले गेले की,

***त्यांची जीवननिष्ठा जशी तेजस्वी होती त्याचप्रमाणे ◆ त्यांनी त्या जीवननिष्ठेला दिलेली विज्ञाननिष्ठेची जोडही ◆ तेवढीच प्रखर आणि समर्थ अशी होती.***

*जुनाट इमला झाला सारा पाडून टाका*
*देऊन धक्का*
*आज इमारत जुनाट झाली*
*जीव आकारण मरतिल*

केशवसुतांचा क्रांतिसैनिक साकल्याचा प्रदेश आखडणाऱ्या शत्रूशी त्या काळाला साजेसे वैर धरतो. पण अमर शेखांचा पाथरवट त्याच्याही पुढे जाऊन 'मानवतेचे नवे मंदिर' उभारायला सज्ज होतो. कृतिनिष्ठा हा या पाथरवटाचा सर्वात मोठा विशेष तो आपल्या जीवननिष्ठेला कृतिनिष्ठेची जोड देऊन लोक शक्तीचा मोका साधण्याचा प्रयत्न करतो. तसे सूचित करतो आणि हे करताना तो म्हणतो-

*''पाथरवट मी नव्या युगातील*
*आहेच सोबत*
*असेन जरि मी अज्ञ रांगडा*
*एक दगड तरि द्या रे*
*या माझ्या हातून*
*एका छन्निचा एक घाव तरि*
*बसू द्या माझा त्या दगडावर*
*मानवतेचे नवीन मंदिर*
*तेथे बांधा या जागेवर...''*

युगधर्माचा कवी युगधर्माचे आदर्श प्रस्थापित झालेले दाखवतो. त्या दिशेने समाजाच्या वाटचालीची सार्थ अपेक्षा करतो आणि वास्तव जीवनाची गुंतागुंत सोडवून अचूक मार्ग दाखवतो. केशवसुतांप्रमाणे अमर शेखांनाही अशा मार्गदर्शनाची आपली प्रामाणिक, निष्ठाशील व ध्येयनिष्ठ भूमिका अनेक कवितांतून सिद्ध करून युगधर्माचा कवी ही बिरुदावली स्पष्ट केली आहे.

प्रचलित सामाजिक संस्कृतीत झालेला बदल पाहून ज्या पद्धतीची

◆ *असा हा महाराष्ट्र शाहीर सदैव समाजात राहिला. समाजाच्या सुखदुःखाशी समरस होऊन त्यांची उकल करण्यासाठी झटला. ही उकल करण्यासाठी त्यांना शाहीर-कलेचा उपयोग झाला.* ◆

विषण्णवृत्ती झाली आहे तिचे साम्य केशवसुती परंपरेशी सहज दाखवता येते. त्यातून आजची संस्कृती ही युद्धोत्तरकालीन तिच्याच जुन्यापेक्षा नव्याचीच अधिक भर. ज्या तरुणांनी राष्ट्राची उभारणी करून त्याची मान ताठ ठेवायची आणि शान राखायची तोच समाज अंतर्बाह्य पोखरलेला पाहून व्यथित होणारे मन 'नव-संस्कृति' या कवितेत दिसते. नवनिर्मितीचा ध्यास लागलेला हा 'पाथरवट' नवसंस्कृतीचे ओंगळवाणे, किळसवाणे स्वरूप पाहून 'करू मी शिक्षा कुणाकुणाला?' असे उद्‌गारतो. त्यातून केवळ तरुण समाजाची दखल घेण्याची कवीला आवश्यकता वाटते असे मात्र नाही. साऱ्या देशाच्या संस्कृतीलाच कीड लागलेली आहे. समाजरचना ठिसूळ बनली आहे. हेही युगमानसाचा हा 'पाथरवट' निर्भीडपणे मांडतो. 'सफेद संस्कृतीवाल्यांची नीती सांगून कायद्याला धूळ चारणारी ही पद्धती किती रोगट आहे हे दाखवतो तर-

*''नीतीवाला राजकारणी*
*डिप्लोमसी झटक्यात दावतो*
*गंधसुगंधी गळ्यात माळा*
*आगळा चाळा त्याचा दिसतो''*

अशी ही संस्कृती काळाला अनुसरून अशी गाणी गाते हे जरी खरे असले तरी मी भोग्य माणूस असून जर हेच माझ्या नशिबाला चिकटले तर? तर पाथरवट जळजळीत शब्दात भावना व्यक्त करतो ती पुढीलप्रमाणे-

*''एक दिवस लावीन आग या*
*क्षुद्र, असंस्कृत अशा जगाला''*

अखेर माणूस हा चैतन्यशील आहे. नवनिर्मितीचा, मंगलतेचा त्याला ध्यास हवाच. क्षुद्रता ही त्याच्या जीवनात असताही कामा नये. संकुचिततेची मर्यादा पडताच कामा नये. मानवी जीवन हे इथून तिथून

> ◆ *भारतातच काय पण जगाच्या इतिहासात मृत्यू दाखवल्यावर जातीच्या कलमात 'मानवता' लिहिला गेलेला अमर शेख एकमेव माणूस असेल!* ◆

उदात्त व भव्य हवे ते चाकोरीबद्ध असणे हे विकसनशीलतेच्या दृष्टीने विघातक. माणूस म्हणजे काय वाघासारखे निर्जीव आहे?

*''घे जन्म केवळ सा...प...प...सा...*
*सा... सा... प... प... सा...*
*गणली जाती वाद्ये निर्जीव*
*परंतु माणूस? सजीव ठरतो''*

### भविष्यकाळाचा वेध घेण्याची ताकद

भविष्यकाळाचा वेध घेण्याची, त्यावर भाष्य करण्याची जबरदस्त ताकद कवीच्या प्रतिभेत जात्याच असावी लागते. अमर शेखांच्या कवितेत ती पुरेपूर होती. त्यांची जीवननिष्ठा जशी तेजस्वी होती त्याचप्रमाणे त्यांनी त्या जीवननिष्ठेला दिलेली विज्ञाननिष्ठेची जोडही तेवढीच प्रखर आणि समर्थ अशी होती. सामान्यांतील असामान्यत्व प्रकट करण्याची जबरदस्त हौस अमर शेखांच्या प्रतिभेला होती. सामाजिक प्रक्षोभ चितारण्यात ती जशी कुशल होती त्याचप्रमाणे आत्मकेंद्रित झालेली प्रतिभा उसळून निघण्यातही विशेष वाक्‌बगार होती. 'तृप्ती' या कवितेतील उत्तुंग कल्पनाच अमर शेखांच्या प्रतिभाशक्तीचा चांगला प्रत्यय आणून देतात व त्यांची विज्ञाननिष्ठाही उत्तम प्रकारे सिद्ध करतात.

अमर शेखांनी कष्टकऱ्यांची, दलितांची, गांजलेल्यांची आणि प्राप्त परिस्थितीने गांजलेल्या मनाच्या व्यथाच प्रामुख्याने मांडल्या असल्या तरी त्यातूनही आपल्या निष्ठांचा उत्तम तऱ्हेने प्रत्यय आणून देऊन केशवसुती वळण सिद्ध करून दाखवण्यात फार मोठे औचित्य दाखवले आहे. समाजवादाचे समाजपोषक असे तत्त्वज्ञान घेऊन त्याची भक्कम अशी बैठक देऊन आपल्या कवितांची कलात्मक मांडणी केलेली आहे. त्यामुळे ते युगमानसाचे कवी या नात्याने किती श्रेष्ठ होते हे सहजच प्रत्ययाला येते.

◆ *अमर शेख यांच्या व्यथित मनाला वेदनांनी घायाळ केले आणि त्यातून 'उपेक्षित'सारखी कविता जन्माला आली.* ◆

मराठी साहित्याचे एक दालन समृद्ध करून मायबोलीची त्यांनी आयुष्यभर सेवा केली आहे.

## भावनोत्कट नाट्यगीते : आचार्य माधव रा. पोतदार यांचे विचार

अमर शेखांच्या कवितेत नाट्यगीते आढळतील असे वरवर पाहणाऱ्याला मुळीच वाटणार नाही. पण कविवर्य तांब्यांप्रमाणेच सरस, उत्कट परिणामकारक अशी नाट्यगीते अमर शेखांनी लिहिलेली आहेत. हा प्रकार त्यांनी समृद्ध करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न केलेला आहे हे जरी खरे नसले तरी हा वाङ्मय प्रकार कळत नकळत त्यांनी हाताळलेला आहे हे स्पष्ट आहे.

''नाट्यकृती दोन प्रकाराने आकाराला येते. पहिल्या प्रकारात कवी वा लेखक एखाद्या व्यक्तीच्या मनांत शिरतो व त्यांच्या भावना त्यांच्याच तोंडून वा अभिनयद्धारा वदवीत असतो. या प्रकारात एकच व्यक्ती आपल्या भावना व्यक्त करीत असते. कधी ती तिच्या सुखाची स्वप्न आपल्याशीच चितारीत असते तर कधी अंतरीच्या व्यथांना वाट मोकळी करून देते. या कृतीचे नाट्यछटेशी साम्य असते.''

अमर शेखांच्या नाट्यगीतातील विविधता लक्षणीय आणि रमणीय आहे. त्यांच्या नाट्यगीतात एकच एक अशी मध्यवर्ती भावना नाही तरी पण त्यांनी जीवनातील विविध दृश्यांची नाट्यगीतासाठी निवड केलेली आहे. त्यांच्या नाट्यगीतांत घटनांची आणि प्रसंगांची विविधता असल्याने साहजिकच अनेकविध व्यक्तीचे अंतर्गत प्रकट झालेले दिसते. केवळ आत्मलक्षी कवीला इतक्या व्यापक प्रमाणांवर परकाया प्रवेश करणे शक्य होत नाही. नाट्यगीत हे प्रत्यक्ष नाट्य नसले तरी नाट्याचा आत्मा त्यात असावा लागतो.

पहिल्या प्रकारच्या नाट्यगीतांत कवी परकाया प्रवेश करून एखाद्या व्यक्तीच्या भावना बोलक्या करतो. या प्रकारांत एकच व्यक्ती आपल्या

◆ ***''मी लिहितो त्याचं एकच एक कारण. माझ्या या महान महाराष्ट्रात वरवर पाहता दरिद्री पण वस्तुतः खरोखरच विचार श्रीमंत, आचार संपन्न, संस्कृतीची, मानवपूजक सह्याद्रीच्या छातीची व समुद्राच्या मनाची 'सामान्य' माणसे पदोपदी आढळतात.*** ◆

भावना व्यक्त करीत असते. 'माझा माग' हे अमर शेखांचे एक सुंदरसे नाट्यगीत आहे. या नाट्यगीतांत विचारांची उदात्तता चांगल्या प्रकारे दिसून येते. कोष्ट्यांच्या भावना अमर शेखांनी उदात्त स्वरूपात रंगवलेल्या आहेत. सुरुवातीसच हा कोष्टी म्हणतो–

*मी तो कोष्टी आहे न्यारा*
*माझा माग मला बहु प्यारा*
*धागा धागा जुळवुनि सारा*
*माग नाचतो माझा प्यारा*
*कितीक धागे हिरवे लाल*
*किती रेशमी अन् बिनमोल*
*कितेक सुतड्यागत दिसतील*
*चिवट टिकाऊ परि ठरतील*
*धावूने धोटा करि जरिमारा*
*नेई निभावून प्रसंगसारा*
*वस्त्र विणाया आयुष्याचे*
*धरले मनगट मी मागाचे*
*धोटा घेऊन भक्कम भारी*
*साऱ्या जुळवुनी नाजूक तारी*
*धोट्या संगे नाचति तारा*
*दे जन्मा आनंद निर्झरा*
*निर्मितीचा आनंद लाभला*
*त्यातच मी परमार्थ साधला...*

या गीतात नाट्य आहे ते उदात्त भावनाचे. नाट्यगीतांत अनुकूल अशी वातावरण निर्मिती केलेली दिसते. 'माझा माग' हे एक सुंदर भावरम्य

*जग*

◆ ***''या जगाला वगळून बोलण्यासारखं काय आहे? या जगाला वगळून विचारही करवत नाही अन् जेव्हा या सुंदर जगाकडे बघून विचार करतो, तेव्हा विचारच संपतो. मति कुंठित होते. मन या जगाच्या सौंदर्यात अडकून बसतं. सौंदर्यानं मंत्रमुग्ध होतं. अन् ह्यानंतर वाटतं फक्त एवढंच की, हेच पाहण्यासाठी सतत मिळावं, सतत जगावं, फिरत राहून पाहावं व पाहत पाहतच जगावं. बस्स.''*** ◆

असे नाट्यगीत आहे. त्यातील उदात्त विचार दर्शनाने त्याच्या मूळच्या 'प्रकृती'त अधिकच भर पडली आहे.

'उपेक्षित' हे दुसरे भावस्पर्शी नाट्यगीत. या नाट्यगीतात उपेक्षितांच्या मनोव्यथांना वाट मोकळी करून दिलेली आहे. 'उपेक्षिताला' रोजच्या जीवनात जी वेगळी अनुभूती येते तिचेच आविष्करण काहीशा गडद स्वरूपात कवीने केले आहे. अवहेलना पदरी घेताना होणाऱ्या वेदनांची आर्तता कवीने पणतीच्या रूपकाने प्रकट केलेली आहे. चंद्र, तारका सूर्य यांनाच काय तो प्रकाश देता येतो. पणती प्रकाश देऊ शकेल यावर कुणाचा विश्वासच बसत नाही, पण कसला का असेना प्रकाश आहे हे सत्य नाकरता येत नसल्याने टीकाकार छद्मीपणाने पुटपुटतात–

*प्रकाश कसला कुणी प्रसवला*
*या पणतीने! हं हं हं हं!!*
*मातीची ही पणती चिमुरडी*
*कशी हो प्रकाश देईल?*
*ते पुढे कडवटपणाने विचारतात-*
*हीच चिमुरडी घालेल म्हणता?*
*अंधाराला अशी गवसणी?*
*टिटवीने सागर गिळणे*
*इतकीच आहे खुळी कल्पना*
*तेलही खाते वातही खाते*

◆ *महाराष्ट्र शाहीर अमर शेखावर क्रूर काळाने ज्या दिवशी आपला कठोर हल्ला चढवला त्या दिवशी आचार्य अत्रे यांच्या मृत्युनंतर उभा महाराष्ट्रात पुन्हा एकदा दुःखसागरात लोटला गेला.* ◆

*कधी स्वतःची माती खाते*
*दिलीच तर काजळीच देते*
*प्रसवणार का प्रकाश पणती?*

उपेक्षित आपल्या भावना अशा उत्कटतेने प्रकट करून पणतीच्या प्रकाशात मोल नसल्याने टीकाकार कोणत्या शब्दात सांगतात आणि सत्य नाकारायचेच तर 'चमत्कार' म्हटले की पुरे अशी स्वतःची कशी समजूत करून घेतात हे हृदयद्रावक रीतीने सांगतो-

*''छे, पणतीचा प्रकाश नाही*
*चमत्कार हा असेल काही*
*'भुताटकी' असेल अथवा*
*असेल लीला परमेशाची''*

परमेश्वराची लीला असे सांगून प्रकाशाचे श्रेय दुसऱ्याला देण्याचा कद्रूपणा या ठिकाणी कवीने मार्मिकपणे उघडा केला आहे, पण उपेक्षितांच्या भावनांची उदात्तता नाट्यमय रीतीने प्रकट होते ती अशी-

*''क्षण थरथरली पणती ऐकून*
*सत्यही गेले पार गारठून*
*पणती मात्र सर्वहि खाऊन*
*जळते जाळीत उजळित आहे''*

'उपेक्षित' आपली मनोव्यथा व्यक्त करतानाच आपल्या उदात्ततेची प्रचितीही येऊ देतो. 'पणती' ही जगाच्या दृष्टीने उपेक्षित ठरते; पण ती जळती जळता उजळीत असते हे मात्र कुणीच पाहत नाही. हेच कवीला दाखवून द्यायचे आहे.

जगाच्या न्यायाची अनोखी जाणीव होताच अमर शेखांची वेदना उफाळते. स्त्रीचा 'बाजार' होतो आहे आणि समाजातील श्वापदे लचका तोडण्यास सज्ज होतात हे पाहून अमर शेख लिहितात.

◆ ***अमर हे महाराष्ट्रातले खूप बोलणारे (बहुबोलके) असे एक स्वप्न होते. या स्वप्नात एक प्रकारची दाहकता, मादकता व प्रसन्नता होती.*** ◆

*''अजब मासले माणुसकीचे*
*विपत्काली लाभतात खासे''*

या कैफियतीद्वारे अमर शेखांनी स्त्रीमनाचा संघर्ष उत्तम प्रकारे चितारला आहे. स्त्रीजीवनातले ते नाट्यच कवीला माणुसकीचा अजब न्याय दाखवून देते.

'पृथ्वीचे प्रेमगीत' हे एक भावनोत्कट असे नाट्यगीत आहे. स्वतःच्या भावनेप्रमाणे इतरांच्या भावनांची अभिव्यक्ती कुशलपणे अमर शेखांनी केली आहे. म्हणूनच पृथ्वीचे प्रेमगीतसारख्या कृती सरस आणि सुंदर उतरल्या आहेत. या गीतात कवीने विचारापेक्षा भावनेला व शब्दांना अर्थापेक्षा स्वरांत गुंफलेले आहे...

*''चांद पुनवेला गगनांत नसतो*
*माझ्या पलंगावर येऊन बसतो*
*रात सारी खुद खुद हसतो*
*येतो झोकाचा रंग त्याचा आगळाच ढंग*
*त्यांत होते मी दंग''*

आणि दंग झाल्यावर भावनांचा फुलोरा कसा फुलतो हे पृथ्वी मोठ्या गमतीदार रीतीने सांगते-

*''माझ्या दर्याला आली हो भरती*
*धरला लाटांनी पिंगा त्यावरती*
*बांध फोडाया त्या म्होर सरती*
*दुग्ध धारा वरून, वर्षा ना का अजून?*
*वरून जाई टळून उभी तहानलेली गं बाई*
*भारी मजा लुटाया दुनियेची सारी...''*

मीलनासाठी आतुर झालेल्या स्त्रीच्या भावना रूपकाच्याद्वारे कलात्मक मांडून कवीने भावनोत्कटता किती शिगेला पोहचली आहे याचे खुबीदार वर्णन केले आहे. देहाचा कण नि कण उसळून निघाला आहे हे लाटांच्या

◆ *बहुजन समाजाच्या सुख-दुःखाशी एकरूप झालेला, प्रत्येक जनतेच्या लढ्यामध्ये आघाडीवर असलेला आणि हे करीत असताना आपले सर्व कुटुंबच त्या कार्यामध्ये विसर्जित करणारा अमर शेखांसारखा तोलामोलाचा शाहीर महाराष्ट्रात झालेला नाही.* ◆

रूपकाने कवीने सांगून उत्कंठा किती लागली आहे हे 'उभि तहानेले गं बाई भारी' या शब्दाने सूचित केले आहे. सुरुवातीसच कवीने या दोन प्रेमिकांची ओळख एकाच ओळीत करून दिलेली आहे ती अशी की, ''पृथ्वीला चंद्राची ओढ लागली आहे.''

नाट्यमय प्रसंगाच्या चित्रणाला अनपेक्षितता, उत्कंठा, जागृती, चमत्कृती यांची आवश्यकता असते. नुसत्या एकसुरी भावनेच्या आविष्काराला यांची जरुरी नसते. तेथे केवळ उत्कटता आणि आत्मनिष्ठा हे गुण असले म्हणजे पुरेसे आहेत. भावगीत आणि नाट्य यामधील भेद अनेक अंगांनी दाखवावा लागतो. नाट्य हे दृश्य काव्य आहे. नाट्यगीत हे प्रत्यक्ष नाट्य नसले तरी नाट्याचा आत्मा त्यात असावा लागतो. उत्कंठा आणि चमत्कृती यांची तर नाट्यगीतांत नितांत आवश्यकता असते.

पृथ्वीची उत्कंठा क्षणक्षणाला कशी वाढत आहे. चंद्राच्या भेटीसाठी तिची तगमग कशी चालली आहे हे ओळी ओळीतून खुलवून, फुलवून कवीने दाखवले आहे. आपली चंद्रावरची गाढप्रीती व्यक्त करताना पृथ्वी सांगते-

*''रात बाराचा अंमल झाला*<br>
*चंदाराया कसा न्हाई आला*<br>
*दूर पिंगला कुठ किरकिरला*<br>
*मरणालागी गाठून राया येईल चढून नाहि राह्याचा अडून*<br>
*दडली का हो ढगाआड स्वारा?...''*

अशी शंकाही व्यक्त केली जाते. वातावरण निर्मिती जितकी सुबक असेल ती एका मूळ भावनेला उठाव मिळतो. रात्रीच्या बाराचाच अमल कवीला वातावरण निर्मितीच्या दृष्टीने सयुक्तिक वाटल्याने तसा उल्लेख केलेला आहे. मीलनाची अधीरता, आतुरता मनाला स्वस्थ बसू देत

◆ ***शिवबा, फुले, आगरकर, ज्ञानेश्वर, तुकाराम, टिळक, केशवसुत, कर्वे ही या ध्येयवेड्या कलावंतांची आराध्य दैवतेच होती आणि या थोरांचे आदर्श ठेवूनच अमर शेखांनी जीवनाची काटेरी वाट तुडवण्यास सुरुवात केली होती.*** ◆

नाही. ह्याचे हृदयंगम चित्रण खालील ओळीत केले आहे- पृथ्वी म्हणते-

*''झाले अधीर या या हो राया*
*झुरणि लागे बघा माझी काया*
*आता लपता कशाला हो वाया?*
*हात चंदेरी द्या, मला उचलून न्या सारी जिंदगानी घ्या*
*देह पडला हो घ्या चरणावरी!''*

'काहूर' हे 'पृथ्वीचे प्रेमगीत' यांच्या अगदी उलट असावेसे वाटते. पण बाह्यदर्शनी विरोध वाटला तरी वस्तुतः ते तसे नाही यांत व्यथा बोलकी केलेली आहेच पण पृथ्वीप्रमाणेच सरिताही सागराच्या मीलनास आतुरलेली आहे. उत्कंठा ही दोन्ही ठिकाणी बऱ्याचशा प्रमाणात सारखीच आहे. मात्र 'काहूर'मध्ये कारुण्याची छटा फारच गडद स्वरूपातली आहे. येथे 'स्वप्न' नाही. सत्य आहे. 'काहूर' हे नाट्यगीत मुळी कारुण्याने ओथंबलेले आहे. ह्या नाट्यगीतांत विरोधात्मक भक्तीचे कौशल्यपूर्ण वर्णन आहे. सुरुवातीसच 'उठले रे काहूर' या शब्दाद्वारे वातावरण निर्मिती केलेली आहे. ओहळ आपल्या स्वतःची ओळख करून देताना म्हणतो-

*''गंगे वाणी संथ स्फटिक मी*
*विशाल नाही काही*
*सह्याद्री उत्तुंग हिमालय*
*मला लाभला नाही''*

अशी व्यथा व्यक्त करून न्यूनत्वाची सार्थ जाणीव प्रकट केलेली आहे. ओहळ हे नदीचे, सरितेचे बाल्य स्वरूपच असते. कवीने स्त्री रूपाद्वारे अभिनयाचा अनोळखा दिमाख दाखवून दिलेला आहे...

*सागरा! कुठे तू कुठे मी?*
*कशास ही ओढ जिवा त्यागे*

◆ ***अमर शेख स्वतःला वावटळीतला पाचोळा म्हणवून घेत. आपण श्रेष्ठ कलावंत आहोत, ध्येयाने वेडे बनले आहोत याची जाहिरात त्यांनी कुठेच केली नाही. उलट ते नम्रतेने वावटळीतला पाचोळा संबोधित.*** ◆

*सागरास जोडा जखडाया*
*जवळ न माझ्या धागे-*

ही मनाला लागलेली खंत आहे. ह्यातच खरे वेगळेपण आहे, पण वेगळे पण असूनही मीलनाची अधीरता पाहिली की, मन अगदी सुन्न होऊन जाते आणि मग ह्या कवितेत व्यथेचीच कथा सांगण्याचा प्रयत्न असलेला दिसतो. मनात उठलेले 'काहूर' पापुद्र्याने पापुद्रा सोडवून दाखविण्यास मदत करते.

*''लागलो पुनः कसा कळेना*
*जीव मृगजळा मागे*
*थांग कळेना मनाचा*
*मला, नकळत होते जागे''*

असे म्हणून मीलनाची अधीरता शिगेस पोहचल्याची दाखवले आहे.

भारतीय पुत्राची माता एका डोळ्यात आसू व दुसऱ्या डोळ्यात हासू ठेवून कसा निरोप देते याचे सुंदरसे चित्रण 'वेडी आई' या नाट्यगीतात आहे. या गीतात माता व पुत्र यांचा मनोसंघर्ष मनोज्ञतेने रेखाटला आहे. सुरुवातीस आई सीमेवर जाऊ देत नाही. तेव्हा तिचा देशभक्त पुत्र परोपरीने समजूत घालतो. राष्ट्रनिष्ठा व्यक्त करणे त्याला अपरिहार्य होते. तो सांगतो.

*''कालच झाला स्वतंत्र भारत बाबा ज्यासाठी झटले*
*कारागारी नरक यातना क्षणांत बाबा सुटले*
*त्यांच्या उरल्या कार्याची सांगता कराया आई*
*झटकन हो म्हण, आज्ञा दे गे म्हणू नको नाही.''*

आणि असा मुलगा आपल्याशी म्हटल्याचे सांगून ती वेडी आई म्हणते की, मी बाळाला म्हटले –

*''नको लढाई आता*

**◆ *अमर शेख जीवन मंगल बनावे ते अर्थपूर्ण बनावे आणि त्याला परिपूर्णता यावी यासाठीच झटत होते.* ◆**

*त्यातच तुटला दुवा नाही रे आता त्राता''*

पण आईची समजूत अजूनही पटत नाही असे पाहून बाळ मोठ्या व्यथित मनाने म्हणतो–

*''मला तरी का हवी लढाई? आई गे तू सांग*
*फुलवायाची होती ना मज स्वातंत्र्याची बाग*
*बागच जाईल जळून त्यांतील पाचोळा ना तू मी*
*आग विझविण्या जाऊ दे गे क्षण हा जाइल ना मी*
*माझ्यागत सगळा पाचोळा जर सीमेवर गेला*
*आग कशी लागेल सांग उरल्या हिरव्या बागेला*
*मी सीमेवर नच गेलो तर बघ शेवट होईल*
*सुक्या बरोबर ओलेही पण जळून जाईल.''*

या बाळाच्या व्यथेतदेखील एक वेगळ्या प्रकारची उदात्तता आहे. ही व्यथा तो आईला जरी बोलून दाखवत असला तरी तो मात्र निर्धाराने चिडून उठलेला आहे. तो जराही हतबल झालेला नाही. उलट आपल्या आईला दोन धीराचेच शब्द ऐकवतो तो निर्धारपूर्वक म्हणतो-

*हा पाचोळा आई जळण्यासाठी नाही*
*संघर्ष पाचोळा हा तावून सुलाखून घेई*
*बाबांच्या वेळेला नव्हती असली शस्त्र काही*
*चालवीत रणगाडा शत्रूंच्या छातीवर आई*
*जिंकणार मी स्वातंत्र्याचा वारा प्याला वीर*
*विजयी होऊन तुझ्या कुशीची ऊब पुन्हा घेणार*

आणि हा प्रखर निर्धार व्यक्त होताच अनाहूत पण आईच्या गळ्यात मिठी पडते आणि मग आपले भाष्य करताना म्हणते–

*''नको लढाई, लादलीच तर घ्या पोराला माझ्या*
*देशकरणी देते मी एकुलता माझा राजा''*

अमर शेखांच्या नाट्यगीतातील संवादात चुरचुरीतपणा खटकेबाजपणा आढळत नाही. ते सारे भावनेने ओथंबलेले असतात. त्यांच्याद्वारेच

◆ ***आचार्य अत्रे यांनी म्हटले की, ‘‘रशियामध्ये मायकोव्हस्की नावाचा कवी होऊन गेला. त्याच्या काव्यामध्ये जो जोर होता तो जोर तो जिवंतपणा ती प्रतिमा मला अमर शेखांच्या काव्यामध्ये आढळते. जीवनामधल्या अगदी बारीकसारीक गोष्टी टिपून घ्यायच्या आणि महाराष्ट्रामध्ये काही तरी मार्गदर्शन करायचे ह्या भावनेने अमर शेखांचे काव्य जन्माला आले आहे.’’*** ◆

एकप्रकारचे चमत्कृती दिसते आणि शेवटी तेच अनपेक्षित असा धक्का देतात. वेडी आई हे एक राष्ट्रीय वृत्तीचे असे मराठी कवितेतील वेगळ्या घाटाचे पण काळाला अनुरूप असे नाट्यगीत आहे एवढेच अभिमानपूर्वक म्हणता येते.

‘यौवनगीत’ या नाट्यगीतात वैयक्तिक मनोगतांचे विश्लेषण अतिशय सूक्ष्मपणे झालेले दिसते. यात एक प्रकारचा संघर्ष कवीने उभा केलेला आहे. मानवी जीवन आणि भावना यांच्या संघर्षातून व्यथेचे अचूक विधान कवीने केलेले आहे. एक तरुण-तरुणीला ‘आगंतुक’ उत्तर पत्ररूपाने देत आहे. अशी कल्पना केलेली असल्याने काव्याची कक्षा मर्यादित झालेली आहे. तो आपल्या पत्रात सुरुवातीसच म्हणतो–

*हे पत्र मिळाले गे तू पाठविलेले*
*उमगले गुपित त्यामागे साठविलेले*
*हा नूर समजला त्या पत्राचा सारा*
*घे उत्तर त्याचे मार्ग जरासा न्यारा*

ह्या ओळीवरून पहिल्या प्रथम कल्पना येते ती अशी की, एका व्यक्तीने प्रश्न विचारला असून त्याचे उत्तर दिले जात आहे. आणि मग हा ‘जरासा न्यारा’ मार्ग आहे हे पटते. ती तरुणी पत्रांतून विचारते–

*‘‘ए प्रेमावरती लिहीत का रे नाही?*
*का प्रेमच मित्रा तुजला ठाऊक नाही?*
*तू लिहिशील प्रेमावरती जी जी काव्ये*
*आदर्श खास ती ठरतिल मजला ठावे’’*

◆ ***बेहोशीने सांगणारा हा कलावंत शाहीर***
***नगरातला हुरडा खायलाही थांबला नाही.***
***काय विधिलिखित होते ते कळण्याच्या अगोदर***
***कलेची आराधना करीत करीत सदेह गेला.***
***मृत्यूशी दोन हात करतानाही या कलावंताच्या***
***गळ्यात महाराष्ट्र प्रेमाची तान घोळत होती.*** ◆

आणि या प्रश्नांना तो तरुण मार्मिकपणे आणि सहृदयतेने उत्तर देतो. तो तिला म्हणतो–

*''हे हे राजस हो गे मी तरुणच आहे.*
*या नसानसांतुनि यौवन वाहत राहे*
*तू जाणीव करूनि दिली प्रेम काव्याची*
*का जाणीव नसते यौवनास प्रेमाची*
*बघ उसळुनि यौवन सदा यावया पाहे*
*प्रीतिही मनोमन टाहो फोडीत राहे*
*उत्तुंग प्रीतीच्या शिखरावरची जावे*
*गाणे प्रीतीचे प्राणपणाने गावे''*

असे सांगून तो तरुण लगेच स्वप्नात रममाण होतो. ते स्वप्न रंगवले आहे ते असे–

*''लुसलुशीत तिथली श्याम लहिदी वेली*
*बिलगेल मला मज वाटे ती अलबेली*
*ती यौवन सुलभा प्रीतगीत गाणारी*
*प्रितीच्या वाटेवर ती हुदडणारी...*

उत्कट भावना या गीतांत सर्वत्रच प्रकट झालेल्या आहेत काही उदाहरणे पाहू–

● *का सहनशक्तीला सीमा अमुच्या नाही*
*का यौवनावरी हक्कच अमुचा नाही?*
*जीवन जगणे हा हक्क गुन्हा ठरला गे*
*मानवी जीवना कांक्षा मराय लागे*
*हे यौवन जळते प्रीतीच्या प्रेतावरती*

◆ ***अमर शेखांच्या कवितेकडे डोळसपणे पाहिले तर उक्ती आणि वृत्ती यात जराही अंतर दिसणार नाही. युगाच्या नवधर्माशी त्यांनी राखलेले इमान कुणालाच नाकारता येणार नाही.*** ◆

*यौवन सांगती गा प्रीती आरती*
*फाशीच्या खांबाजवळ कुणी लग्नाचे*
*का बेत करिल? आश्चर्यच ते जगताचे...*

● *ते कणाकणांतुनि ये निर्मिती संगीत*
*सुख वाहे दुथडे भरूनी त्या क्षेत्रात*
*आनंद निर्मितीचा उपभोगायाला*
*रणि येई आज सुकुमार कालची बाला?*
*त्यागाच्या पायावरती पिकले रान*
*नाचते पाहिले होऊनिया बेभान*
*प्रीतीचे अनेक रंगी स्वरूप दिसले*
*जे कल्पनेत माझ्या ही होते पुसले*

युद्धखोर जे जे आहेत त्यांना गाडून टाकू ये असे तरुण आवाहन करतो. आपली चीड, आपला सात्त्विक संताप त्याने जागोजागी प्रकट केला आहे तो व्यथेच्या रूपात. यौवन जळत असताना पाहून त्याच्या मनाची जी दोलायमान अवस्था होते. तीचे उत्कट प्रतिबिंब या कवनांत पडले आहे. तो म्हणतो–

*''मी धाडस करतो करितो आज अपेक्षा*
*दे प्रीत पुरी जाहली शिक्षा*
*अपूर्णतेला गाडाया तू ये गे*
*कविताहि उभी तव स्वागत करण्या ये गे''*

पण अमर शेखांनी या गीतात रेखाटलेला तरुण हा काही निराश होणार नाही. भोवतालच्या दारुण परिस्थितीने हतबल होणार नाही. तो तरुण झुंजारवृत्तीचा आहे. म्हणूनच तो मोठ्या जोमाने आणि आत्मविश्वासाने सांगू लागतो–

*''खंबीर जीवनाचा चल पाया सांधू*

◆ ***आजची संस्कृती ही युद्धोत्तरकालीन तिच्यात जुन्यापेक्षा नव्याचीच अधिक भर. ज्या तरुणांनी राष्ट्राची उभारणी करून त्याची मान ताठ ठेवायची आणि शान राखायची तोच समाज अंतर्बाह्य पोखरलेला पाहून व्यथित होणारे मन 'नव-संस्कृति' या कवितेत दिसते.*** ◆

*आयुष्य मंदिरा या ये भक्कम बांधू*
*सोनेरी त्यावर प्रीत कळस ये चढवू*
*ये नव प्रीतीची नवीन दुनिया घडवू*
*जन सागरि ये चल आधी डुंबण्या ये गे*
*त्या प्रीतिशिखराप्रत जाऊ त्यायोगे*
*होईल तुझा नि माझा विकास जिथे*
*यौवन तेहि खुलेल विकसुनी तेथे*
*म्हणूनीच आज गाऊ या कवनी शांती*
*सोडून क्षणिक ते बुरसट प्रेम भ्रांती''...*

या नाट्यगीतात मनोविश्लेषण अतिशय बहारदाररीतीने केलेले असून चित्रदर्शनाबरोबर अभिनयाचेही सार्थ ज्ञान होत जाते. या गीतांत भावनोत्कटतेचा तर प्रत्यय येतोच शिवाय मनाचा कोपरान्‌कोपरा हुडकून काढण्याचा जणू काही चंग बांधलेला आहे असे वाटते. तांब्यांच्या गीतांत भावनोत्कटता आढळतेच पण ते फारसे काही सांगायला धजत नाहीत. अमर शेख हे बोलूनचालून जीवनवादी. ते जीवनाबद्दल परकायाप्रवेश करून भाष्य करणारच आणि तसे त्यांनी केले आहे. एक ठसठशीत आणि मनोवेधक असे हे नाट्यगीत आहे. हेच खरे.

### वैशिष्ट्ये

अमर शेखांच्या नाट्यगीतांचा अभ्यास करताना त्यातील आशयामुळे वाचकाचे मन वेधून घेतले जाते. मराठी कवितेत कविवर्य तांब्यांनी आपल्या कलावादी दृष्टिकोनातून आपला नाट्यगीताचा प्रवाह सातत्याने वाहता ठेवला त्यापाठीमागे ब्राउनिंगचा अभ्यास प्रेरणादायक ठरला

◆ *त्यांची जीवननिष्ठा जशी तेजस्वी होती त्याचप्रमाणे त्यांनी त्या जीवननिष्ठेला दिलेली विज्ञाननिष्ठेची जोडही तेवढीच प्रखर आणि समर्थ अशी होती.* ◆

असावा. अमर शेखांच्या नाट्यगीतांत मात्र अशी दुसरी कोणती खास आणि वेगळी प्रेरणा नाही... जीवनवादी दृष्टिकोनातून भावनोत्कट नाट्यगीते रचण्याची नवी क्रिया अमर शेखांच्या कवितेत निश्चितच घडलेली आहे हे दुर्लक्षिता येण्यासारखे नाही.

● अमर शेखांच्या नाट्यगीतांत पहिले ठळक वैशिष्ट्य आढळते ते हे की, त्यांच्या नाट्यगीतांत वैचारिक उदात्तता पूर्णत्वाने दिसते. त्यांची कविता चिंतनातून बाहेर पडताना ती विशाल उदात्त स्वरूप घेत असल्याचे दिसते. ही उदात्तता जीवनाच्या खोलवर निष्ठेतूनच प्रकट झालेली पाहावयास सापडते. उदात्ततेने फुललेले असे अमर शेखांचे प्रत्येक नाट्यगीत असते असे म्हणायला हवे.

● आजच्या जीवनाचा अचूक वेध घेण्याची ताकद कवीच्या मनात असल्याने कविता कल्याणकारी बनलेली आहे. जीवनानुभूती तिच्यात गडद स्वरूपात पाहायला मिळाल्याने जीवनातील असफलता, असमाधान यांचे नाट्यगीताद्वारे दर्शन होते. पण हे केवळ दर्शन घडवण्यावर भागत नाही तर त्याबद्दलची एक प्रकारची चीड या नाट्यगीतांतून व्यक्त झालेली दिसून येते.

● कित्येकदा भोवतालच्या जगात चाललेल्या कृत्यांची मोजदाद करताना कवीच्या तरल प्रतिभेला विसंगतीचा, विकृतीचा साक्षात्कार होतो. त्याची तगमग वाढते आणि मग अशा वेळी कवी उपरोध आणि उपहास यांचा आश्रय घेतो. अमर शेखांच्या काही नाट्यगीतांत या दोन्ही गोष्टी उपयोजिलेल्या दिसतात. या विसंगतीतील मर्म हुडकण्यासाठी नव्हे राहवत नाही म्हणूनच अशी रचना कवीने केलेली दिसते.

● नाट्यगीतांचे भावनोत्कटता हे मुळी वैशिष्ट्यच आहे. भावनोत्कटतेशिवाय नाट्यगीताला काहीही अर्थ नसतो. अमर शेख हे तळमळणारे परकायाप्रवेश करून भावनांचा उद्रेक घडवणारे कवी असल्याने त्याच्या नाट्यगीतांत भावनोत्कटता ही ओघानेच येते. त्यांच्या हृदयाचे आक्रंदन कवितेत प्रतिबिंबित झालेले दिसते. ते भावनोत्कटतेमुळेच.

## *जीवन*

◆ ***जीवन आहे तुझे खरोखर पाण्याचा बुडबुडा फुटेल***
***फटकन सुटेल चटकन जीव तुझा बापुडा*** ◆

विषयाला ओझरता स्पर्श करण्यापेक्षा त्याच्या अंतरंगाचा ठाव घेण्यासाठी जी झेप असावी लागते ती अमर शेखांच्या प्रतिभेत निश्चितच असलेली जाणवते म्हणूनच त्यांची नाट्यगीते भावनोत्कट झालेली दिसतात.

● अमर शेखांच्या कवितेला काही तरी सांगण्याचा, काही तरी करण्याचा ध्यास लागलेला आहे. त्यामुळे कवितेत ओज येणे अपरिहार्य बनले आहे. अमर शेखांच्या व्यक्तिमत्त्वाला ओढ लागल्यामुळे त्यांची अभिव्यक्ती आवेशपूर्ण होत जाते. ध्येयनिष्ठ कवीची कविता नेहमीच आवेशपूर्ण होते. अमर शेख आपली अभिव्यक्ती आवेशपूर्ण करतात कारण त्यांच्या कवितेचा आत्मा आहे विचार. विचार प्रभावी करताना आवेशपूर्ण रचना न आली तरच नवल.

● अमर शेखांना मातेबद्दलचा संस्कृतीचा जसा जाज्वल्य अभिमान त्याचबरोबर राष्ट्राच्या अस्मितेचाही. त्यामुळे त्यांच्या गीतात राष्ट्रीयवृत्तीचा परिणाम झालेला दिसतो. नाट्यगीतेही काही त्याला अपवाद नाहीत.

● अमर शेखांची नाट्यगीते वाचली की, पहिलाच विचार मनात डोकावतो तो हा की, अमर शेख हे स्त्रीपुरुषाचे कवी आहेत. स्त्रियांच्या भावनांना त्यांनी जसे सजीव केले आहे त्याचप्रमाणे पुरुषाच्याही भावना त्यांनी अधिक रेखीव, अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. नाट्यगीतांतून नाजूक भावनांचा मजेदार खेळ जसा रंगवलेला आहे त्याचप्रमाणे नागरिक चित्रणही संयमपूर्ण केलेले आहे.

● अमर शेखांनी नाट्यगीतातून व्यथा व्यक्त केलेल्या आहेत. त्या व्यथा मात्र कुठेही ओरखडा पडणार नाही अशाच रीतीने काळजीपूर्वक प्रकट केलेल्या आहेत. अमर शेखांच्या कित्येक व्यथा मात्र आकस्मिकरीत्या कथांचे रूप धारण करतात आणि मग कथा आणि व्यथा यांचा मनोज्ञ संगम नाट्यगीतांत होताना दिसतो.

❖❖❖

# रसिकास पत्र

*प्रिय रसिका,*

*माझं जीवन ज्यानं जवळूनही पाहिलं आहे त्यालाही हे ठाऊक आहे की, मी एक सरळ नि साधा सामान्य माणूस आहे. असं म्हणवून घेण्यात विषाद व अभिमान वाटण्यासारखं वा गर्वानं फुगण्यासारखं काहीच नाही. पण म्हणूनच मला म्हणायचं आहे ते हे की, हा सामान्य माणसाच्या हातून निर्माण झालेला कवितासंग्रह आहे; आणि तरीही महाराष्ट्रानं या कवितांचं खूपच कौतुक केलं. इतकं की, शेवटी मलाही त्याचं कोडं पडलं. वाटलं, मी एक सामान्य माणूस, माझ्या कविताही मग सामान्यच. तेव्हा माझ्या कवितांचं कौतुक आणि लाड महाराष्ट्रातल्या रसिक जनसागरानं इतकं करावं ते का?*

*विरोधी टीका आली. पण ती थोडी, अगदी थोडी आणि तीही मला मार्गदर्शक ठरणारी अशी नाही. एक टीकाकार माझ्यावर तुटून पडतात. मी जन्मानं केवळ मुसलमान आहे म्हणून तर काहींना माझी साम्यवादी पिंडप्रकृती डांचते म्हणून. मी त्यातल्या एकाला विचारलं की, तुम्ही माझ्या किती कविता वाचल्या? उत्तर काय मिळालं ठाऊक आहे? ते म्हणाले, ''तुमच्या कविता वाचायला हव्यातच कशाला? त्या ठरलेल्याच असायच्या मुळी.''*

*एकदा प्रा. बेडेकरांनी एका काव्यविषयक लेखात माझा थोडा गौरव केला. बस्स तेवढंच कारण पुरे झालं एका हिंदुत्वनिष्ठ साहित्यिकाला. माझ्यावर आणि प्रा. बेडेकरांवर ते असे काही भडकले की, बोलून सोय नाही. 'मियाँभाई काय, अमरमियाँ काय' काय हवं ते लिहून गेले.*

*नि त्याचंही कारण मला त्यानंतर उमगलं. स्वातंत्र्य मिळताक्षणी सौदेबाजीच्या राजकारणातून जातीयवादाचा डोंब उसळणार हे लक्षात येताच त्या अनुषंगानं लिहिलेल्या–*

**◆ मराठी साहित्याचे एक दालन समृद्ध करून मायबोलीची त्यांनी आयुष्यभर सेवा केली आहे. ◆**

*''हिंदी संघराज्याच्या जनआत्म्या तू घेई प्रणाम''*
*''रात्र आहे वैऱ्याची जागा रहा''*
*''गांधीजींच्या बलिदानातून हाक आली ऐका''*

*या नि यांसारख्या एकमागोमाग एक जातीयवादावर प्रहार करणाऱ्या कविता मी लिहिल्या आणि या कवितांमुळेच मला जातीयवाद्यांच्या शिव्या खाव्या लागल्या आणि याच कवितांचं जनतेकडून एवढंच नव्हे तर प्रा. न. र. फाटक, वीर वामनराव जोशी आणि म. म. द. वा. पोतदार यांच्यासारख्या महाराष्ट्रातल्या अनेक विद्वान रसिक मर्मज्ञ पंडितांकडून स्वागत झालं.*

*विशाल मानवी जीवनाकडे मी एक सामान्य सुसंस्कृत व जबाबदार माणूस म्हणूनच पाहत असल्याकारणानं सामान्य माणसांच्या आशा-आकांक्षांचं प्रतिबिंब माझ्या कवनात पडणं अपरिहार्य होतं असं मला वाटतं.*

*पण मला वाटतं तेच खरं असं समजून चालणं हे अल्प सत्य आहे, पूर्ण सत्य नाही. पूर्ण सत्य समजून घेण्यासाठी इतरांनाही काय वाटतं हे समजून घेणं जरूर आहे.*

*होय, इतरांनी, महाराष्ट्रातल्या हजारो-लाखो लोकांनी यातील बऱ्याच कविता वाचल्या, ऐकल्या, गळ्यातही रुळवून घेतल्या, पण सगळ्या कविता, एकमेकींचा हात धरून एकसमयावच्छेदेकरून या संग्रहांच्या निमित्तानेच पुढे येत आहेत. त्यातल्या काळ्या-गोऱ्या, उजव्या-डाव्या या आता दिसतील, या सर्वांमागील कवीच्या पिंडप्रकृतीचा मागोवाही रसिकजनांना व टीकाकारांना घेता येईल.*

*रसिक जनताजनार्दनाच्या व टीकाकारांच्या निकोप बुद्धिवादी भूमिकेतून कवितेवरील होणाऱ्या टीकेमुळे झाले तर माझ्यातील दोषच दूर होतील व माझ्या हातून महाराष्ट्र शारदेच्या परंपरेला पुढे नेणारीच कविता निर्माण होईल अशी मला दृढ आशा आहे.*

*आचार्य अत्रे यांनी 'कलशपूजन' केलं इतकंच नव्हे तर हा 'कलश'*

◆ ***अमर शेखांच्या नाट्यगीतातील विविधता लक्षणीय आणि रमणीय आहे. त्यांच्या नाट्यगीतात एकच एक अशी मध्यवर्ती भावना नाही तरी पण त्यांनी जीवनातील विविध दृश्यांची नाट्यगीतासाठी निवड केलेली आहे.*** ◆

*मराठी वाचकांच्या हाती ठेवण्याचं भाग्य आपल्याला लाभलं असं म्हणून स्वतःला धन्य मानून घेतलं. खरं तर हा त्यांच्या मनाचा किती तरी थोर असा मोठेपणा आहे, नाही का? मी तर त्यांच्या 'कलशपूजनाने' प्रथम क्षणभर गांगरलो, बावरलाच गेलो आणि नंतर भानावर येताच त्याचा अर्थ मला उमगला, तो असा ''शाहिरा तू ज्यांचा वारस आहे त्या मराठी कवींची परंपरा मोठी आहे, जिवात जीव असेतोवर ती पराकाष्ठेने राख. लिहीत राहा, गात रहा. विझू नकोस. विझवू नकोस. बुजव; रुजव रिझव हटव, हटू नकोस; विशाल मानवतावादाची कास सोडू नकोस.'' कलशपूजनाच्या निमित्तानं याच जबाबदारीची जाणीव त्यांनी मला करून दिलेली आहे. त्यांचे आभार मानणं शुद्ध वेडेपणा होईल व तो मी करीतही नाही. पण या कलशपूजनासाठी त्यांनी केलेलं वाचन, चर्चा, वैचारिक मंथन मी गेली दोन वर्षे पाहत होतो. अतिशय परिश्रमानं नि मोठ्या जबाबदारीनं त्यांनी हे कलशपूजन केलेलं आहे. हे आपणही ओळखालच. नाही का? मला धन्य धन्य असं वाटलं.*

*प्रिय रसिका, आता तुझी पाळी. तूच आपल्या या शाहिराकडून... शारदेची सेवा अधिकाधिक घडून येण्यासाठी त्याला मुक्तकंठाने आशीर्वाद....*

**- अमर शेख**

२६ सप्टेंबर १९५८

*('कलश' ह्या आपल्या काव्यसंग्रहात अमर शेखांनी पत्र लिहून मांडलेले मनोगत.)*

❖❖❖

# अमर शेख यांचे मनोगत

*'अमरगीत' आज जे जनतेसमोर येत आहे, ते अनेक दिव्यांतून, बाहेरच्या व आतल्या संकटांना तोंड देऊन जनतेसमोर येत आहे; पण तरीही ते पूर्णत्वाने जनतेपुढे आलेले नाही.*

*काळाच्या (सध्याच्या सरकारच्या) दाढेतून जे वाचलं ते, आठवणींनी जे आणून दिलं ते आणि माझ्या गीतांच्या चाहत्यांनी काळजाला लावून जे ठेवलं ते तेच फक्त या 'अमरगीता'च्या रूपाने बाहेर पडत आहे. म्हणून माझा हा पहिलाच गीतसंग्रह जनतेच्या हाती देताना माझा आनंद अगदी खुल्या दिलाने मला व्यक्त करावासा वाटतो. तसेच या 'अमरगीता'ला पुढे येऊ देण्यासाठी ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांना धन्यवाद देणे माझे कर्तव्य ठरते.*

*आणखीही काही गीतं मला जनतेपुढं ठेवता आली असती; पण ठाणे पोलिसांनी माझ्या हस्तलिखिताच्या तीन वह्या, ठाण्याच्या एक साहित्यिक मित्राकडून झडतीच्या नावाखाली नेल्या.*

*मी १९३० सालापासून गीतं व पोवाडे लिहीत आलो. ती सारी गीतं, पोवाडे त्यांनी नेले ते सारे साहित्य अजूनही सी. आय. डी. खात्याच्या दप्तरात पडून आहे.*

*१९५०च्या मे-जूनमध्ये मुंबई सरकारनं दडपशाहीचं समर्थन करताना एक गोष्ट जनतेला सांगितल्याचं आठवत असेलच. त्या वेळी- मुंबई सरकार म्हणाले होते, ''पहा हो! हे लोक आपल्या भजनांतूनसुद्धा समाजशंकराला तिसरा नेत्र उघडायला सांगतात. म्हणून आम्ही यांना व यांच्या वाङ्मयाला दडपून टाकीत आहोत.'' बिचारं सरकार! त्याच्या अपेक्षा जनतेनं पुऱ्या करण्याऐवजी ही भजनं, ही गीतं जतन करून ठेवली व ती मला या 'अमरगीत' संग्रहासाठी आणून दिली.*

*जनतेनं माझ्या गीतांसाठी दाखविलेला हा जिव्हाळा मी कसा विसरू*

◆ ***'माझा माग' हे अमर शेखांचे एक सुंदरसे नाट्यगीत आहे. या नाट्यगीतांत विचारांची उदात्तता चांगल्या प्रकारे दिसून येते. कोष्ट्यांच्या भावना अमर शेखांनी उदात्त स्वरूपात रंगविलेल्या आहेत.*** ◆

*शकेन? सरकारच्या या काळ्या करणीमुळं मी काही मागची चांगली गीतं या 'अमरगीत' मध्ये देऊ शकलो नसलो तरी त्याहीपेक्षा चांगली गीतं लिहून मी जनतेला द्यावी इतकं प्रेम मला जनतेनं दिलं, जिव्हाळा दाखवला. म्हणूनच ही 'अमरगीतांतील' अपूर्णता भरून काढण्याचा माझ्या थोर जनतेपुढे जाहीर निश्चय मी आज करतो आहे.*

*एवढे खरे की, माझी गाणी लिहायची सुरुवात झाली ती १९३० सालच्या राष्ट्रीय चळवळीच्या वेळी होय. अर्थात त्या वेळेपासून जी कविता मी लिहीत आलो मी माझ्या प्रत्यक्ष जीवनातून व माझ्या गावरान भाषेतूनच हे सांगणे नलगे!*

*या सर्व गाण्यांची जन्मकथा काही वेळा मोठी गंभीर यातनामय आहे, तर काही वेळा वैचित्र्यपूर्णही आहे.*

*कलावंत आपल्या कलाकृतींना प्राणाहून प्यार समजतो. त्यांना तो स्वतःच्या रक्ताची किंमत देतो. आपल्या कलेचा नाश आपल्या डोळ्यांनी तो कधी पाहत नाही. मी मात्र माझ्या गीतांचा नाश सतत पाहत आलो आहे. आजवर अशी आपली गीतं कुणाच्या सांगण्यावरून कुणी किती फाडून टाकली हे मला तरी ठाऊक नाही; पण कारण, अकारण, परिस्थितिनुरूप नाइलाजाने, तर कधी खरोखरीच चूक दाखवून दिल्यामुळे अशी माझी किती तरी गाणी काळाच्या दाढेत मला टाकावी लागली आहेत; हे सत्य माझी 'गाणी जेव्हा बोलायला लागलीत' तेव्हा उमगून येईलच. हा ज्याप्रमाणे माझ्या गाण्यांचा एक कटू इतिहास आहे तशीच त्याची दुसरी बाजू तितकीच उत्साहपूर्ण, स्फूर्तिदायक, उज्ज्वल व वैभवशाली अशी आहे हे सत्य महाराष्ट्र प्रत्यही अनुभवीत आहे. त्याविषयी निराळे लिहीत नाही. मला तसेच सर्वांना ठाऊक आहे की, ही गाणी महाराष्ट्राच्या शहरांतून, चाळीचाळींतून, खेड्यापाड्यांतून, दऱ्याकपारीतून विखुरली आहेत. हजारोंच्या ओठावर नाचत आहेत. लाखोंच्या कानावर गर्जत*

◆ *'पृथ्वीचे प्रेमगीत' हे एक भावनोत्कट असे नाट्यगीत आहे. स्वतःच्या भावनेप्रमाणे इतरांच्या भावनांची अभिव्यक्ती कुशलपणे अमर शेखांनी केली आहे.* ◆

जाऊन तिथं त्यांच्या मनावर आपलं मनाचं स्थान कोरून ठेवीत आहेत. तसेच लाखोंच्या कंठातून ललकारण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून त्यांनी आपला मोर्चा बांधला आहे. त्या अनुषंगाने मला माझ्या लोकगीत गायकांना नम्रतापूर्वक काही सूचना करायच्या आहेत.

आपल्या गाण्यांना शास्त्रीय संगीताचा पाया असलाच पाहिजे असं अट्टाहासानं सांगण्याऱ्यांपैकी मी एक आहे. पण मला हे ठाऊक आहे की, माझे लोकगीत-गायक हे तसे धनिक नाहीत. त्यांना अत्यंत अडचणीतून, हलाखीतून जीवन जगावे लागते. मग ते गाण्याचा इतका सखोल अभ्यास आज कसे करणार? हे जाणूनही एवढे मला सांगावेसे वाटते की, आपल्या गाण्यात सुरेलता आणि तालबद्धता ही असलीच पाहिजे.

कलाक्षेत्रांतल्या काही ठेकेदारांना वाटते की, कामगार, शेतकऱ्याला कला कशाशी खातात हे मुळी ठाऊकच नाही. आग, भूक, क्रांती, उठाव, लढाया एवढ्या शब्दांची खैरात आरडाओरडा करून 'ऐकत राहणं' हीच आम्हा कामगार शेतकऱ्यांची कला अशी भोळी समजूत या 'महान प्रज्ञावंताची' झालेली आहे. ज्यांनी कधी ढोलकीचा ताल तसेच झिलकऱ्याचा लागलेला षड्ज, पंचम ऐकलेला नसतो; ढोलकीवाला अथवा झिलकारी यातून कुणी जरी बेताल अथवा बेसूरपणा दाखवला तर कलेच्या दृष्टीनं अडाणी समजला जाणारा कामगार, शेतकरी घोंगडी झटकून हुईऽऽऽ करून कार्यक्रम कसा उधळून लावतो हे पाहिलंही नसतं. अशा त्या सर्वगामी 'प्रज्ञावंता'विषयी मला काहीच लिहायचं नाही. पण आपण प्रत्यक्ष पाहात आहोत की, गुंडगिरीच्या, कायद्याच्या दंडुक्यांना झुगारून देऊन तत्त्वज्ञानाचे लोकविरोधी बुरखे फाडून फेकून आपली ही लोककला महाराष्ट्रात सैराट धावत निघाली आहे. कानाकोपऱ्यात तिचे ध्वनी उमटत आहेत. नवनवे लोकगायक, नवनवी कलापथकं महाराष्ट्रीय जनतेसमोर येत आहेत.

ज्यांनी आपल्या लोककलेकडं पाहून तुच्छतेनं नाकं मुरडली, चंग बांधून

***‘पृथ्वीचे प्रेमगीत’ या नाट्यगीतांत कवीने स्वतःचे असे काही एक न सांगता पृथ्वीच्या रूपाने प्रेमिकांचे भावविश्व समृद्ध करून भावनांची उकल अतिशय नाजूक पण हळुवार रीतीने केलेली आहे.***

*विरोध केला, ठेवलेल्या वर्तमानपत्रांद्वारे बदनामी करण्याचा जीव तोडून प्रयत्न केला; त्या झाडून साऱ्या ‘महाभागांना’ या लोककलेचा आश्रय घ्यावासा वाटू लागला. आज साऱ्या मेळेवाल्यांनी, सोशालिस्टांनीच नव्हे तर अगदी कट्टर काँग्रेसवाल्यांनीसुद्धा आपल्या ‘सर्वोदयाच्या’ गाड्याला या लोककलेला जुंपले आहे. अर्थात, झाली ही गोष्ट चांगलीच झाली... कलेतून जीवनाचं प्रचंड स्वरूप व्यक्त करून; कलेद्वारे जीवनाचं जीवनकलहाचं विश्वदर्शन घडवून कलेची मूल्येही शंभर टक्के जिथल्या तिथे ठेवून, तिचं मंगल स्वरूप तसंच तेजाळ ठेवून, तिच्या कलामूल्यांना अधिक उजाळा देऊन तिला जनतेसाठी राबवलं पाहिजे. निदान आज तरी कलेपासून मिळणारा निर्भेळ आनंद लुटण्यासाठी हे केलं पाहिजे. तसे आज अनेक प्रकारचे विरोध न जुमानता होत आहेत, ही जीवनातली फार मोठी गोष्ट आहे. कलाक्षेत्रातली ही वेगवान प्रगतीच आहे.*

*पण आपण लोककलावंतांनी जरा अधिक खोलवर जाऊन विचार करायला शिकले पाहिजे. आपणाला हेही दिसून येते की, बऱ्याच वेळा या लोककलावंताच्या काही विभागांना अपयश पदरी घ्यावं लागलं. अर्थात हे स्पष्ट आहे की, त्यातली कलामूल्ये व जीवनविषयक मूल्ये ही नीट अभ्यासली न गेल्यामुळेच त्यांच्या तुटपुंजेपणामुळं हे अपयशाचं माप पदरी पडतं.*

*जेव्हा सत्ताधाऱ्यांचा राजदंड नव्हे ‘ठेवलेल्या’ गुंडाची गुंडगिरी नव्हे, तर समोरची जनताच कार्यक्रम उधळून लावते, नापसंती दर्शविते तेव्हा लोककलावंतांनी अंतर्मुख झाले पाहिजे; जनतेपासून शिकले पाहिजे. समोरची जनता हाच कलावंताचा खरा आरसा, महान गुरू, हे जर आपण लोककलावंतांनी सतत ध्यानात घेतले नाही, तिच्यापासून शिकले नाही तर सारे आटोपलेच.*

*कामगारांना, शेतकऱ्यांना, लोककलावंतांना संस्कृती ठाऊक नाही,*

◆ ***नाट्यगीतांत केवळ मनोव्यथाच असाव्यात असा काही संकेत नाही. तरुण-तरुणीच्या नाजूक भावनांनाही बोलके करता येणे शक्य होते हे वरील नाट्यगीत चांगल्या रीतीने दाखवीत आहे.*** ◆

*त्यांच्या कलेत शास्त्र नाही असं म्हणायला आपण काडीइतकाही आधार देता कामा नये. कलेत शास्त्र व जीवन ही अगदी हातात हात घालून गेली पाहिजेत. म्हणून माझं लोकगीत- गायकांना नम्र सांगणे आहे की, त्यांनी आपले स्वरज्ञान व तालज्ञान हे पक्के बनवलेच पाहिजे.*

*कलेला, सौंदर्याला नियम आहेत. ते शेतकरी, कामगार जाणतो, अमलात आणतो, हे स्वतः कृतीने दाखवून दिले पाहिजे, ते अवघड नाही.*

*जाताजाता गीतातील आशयाविषयीसुद्धा मला लोकगीत-गायकांना एक सूचना करावीशी वाटते. ती ही की, गाण्यांचा पूर्ण अर्थ पदरांत पडल्याशिवाय गाणे मुळीच म्हणू नये. गाण्यात जर अर्थबोध होत नसेल तर सरळसरळ लोकगीतकाराशी संबंध जोडून अर्थ स्पष्ट करून घ्यावा. चूक असेल तर दाखवून द्यावी व गीतांचा आशय स्वतः नीट समजून घेऊन मगच गाणाऱ्याने ते गीत अगदी स्पष्ट उच्चारात विकृत न करता सुरात, तालात गावे फक्त एवढेच.*

**- अमर शेख**

❖❖❖

# सत्य

*माझी कविताच काय, पण माझा एक शब्ददेखील बक्षिसाच्या वा तत्सम रूपेरी, सोनेरी प्रलोभनाकडे बघून अथवा भाळून लिहिला गेलेला नाही. याचा मला सदा अभिमान वाटतो.*

*प्रलोभनानं माणूस मिंधा नि लाचार बनणं अपरिहार्य आहे. त्याच्या काव्याची, कलेची धार बोथटणं सहज शक्य आहे आणि आम्हा कवींना, कलावंतांना तर लाचारी आणि मिंधेपणाइतकं लांच्छन जगात दुसरं कुठलंही नाही. मग ते प्रलोभन प्रोत्साहनाच्या वा आणखी कुठल्याही गोंडस नावानं आमच्या जीवनात येवो.*

*प्रलोभनामागेच मोहमयी अधःपतनाची दरी आहे. माणूस एकदा मोहात, लोभात, जाळ्यात सापडला रे सापडला की, मग तदंगभूत आडाखे, ठसे, निर्बंध हे आलेच. कवीला बांध हवा, जरूर हवा; पण तो चंद्र, सूर्य, निसर्गाला आहे तसा निर्मोह, निर्लोभ असावा.*

*अर्थात आजचं जग पुढारलेलं, डिप्लोमसीचं, मुत्सद्देगिरीचं. या जगात अशा दरीला, अधःपतनालासुद्धा कुठल्या तरी महान तत्त्वाची झिलई चढवून मोक्षाचं, मुक्तीचं तीर्थ बनविण्यात येतं. कलेसाठी कला, केवळ आनंद, केवळ सौंदर्याच्या झिरमिळ्या त्या अधःपतनावर सोडण्यात येतात. गूढतेची वलयं अवतीभोवती फैलावून व्यक्तीच्या दंभ– अहंकाराला प्रोत्साहन दिलं जातं आणि मग त्यामुळेच प्रलोभन, मोहाला बळी पाडणारी, बोटचेपी वृत्तीची व स्वतःचं एक वेगळं जग असल्याची शेखी मिरवणारी जमात तयार होते. तिचे अलिखित नियम, बंधनं तयार होतात. त्या जगात असणारेच फक्त कवी-साहित्यिक; त्या बाहेरचे सगळे गद्य-सामान्यजन, अतएव हेटाळणी योग्य मानव.*

*खरोखरीच सामान्य जनांपासून दूर असलेल्या या मराठी भाषिक कविजनांनी आपली स्वतःची एक जात तयार केलेली असून, त्या जमातीबाहेरचा माणूस ते शक्यतो आपल्यामध्ये घेत नाहीत. कवितेला*

**◆ ‘काहूर’मध्ये कारुण्याची छटा फारच गडद स्वरूपातली आहे. येथे ‘स्वप्न’ नाही. सत्य आहे. ‘काहूर’ हे नाट्यगीत मुळी कारुण्याने ओथंबलेले आहे. ◆**

*सामान्य जनापासून दूर ठेवण्याचा ते सतत प्रयत्न करतात. यामुळेच मराठी कवितेचे क्षेत्र अतिमर्यादित केले गेले आहे. उभ्या महाराष्ट्रातील तथाकथित अव्वल दर्जाचे एकूण एक कविजन एकत्रित करून, हवा तेवढा गाजावाजा करूनही श्रोतृवर्ग जमा केला तरी तो मुंबईसारख्या ठिकाणीही जेमतेम एक हजारापर्यंत कसा तरी जातो. त्याच महाराष्ट्राच्या या राजधानीत उर्दू कवींचा मुशायरा बारा बारा हजारांपर्यंत लोक जमून शेकडो-हजारो रुपयांची उलाढाल करू ‘शानदार’पणे पार पडतो.*

*ही लाजिरवाणी परिस्थिती उघड्या डोळ्यांनी मराठी माणसाला पाहावी लागते.*

*यावर आमच्या या बुद्रुक कवी महाशयांचे विचारही मोठे ‘अजीब’ असतात. म्हणे उर्दूचे सर्व श्रोते ढोंगी असतात. त्यांच्यात ‘वाहव्वाबाजी’ असते. ते सर्व एका विशिष्ट धर्माचे असतात.*

*या त्यांच्या बचावात आत्मप्रौढीशिवाय काय आहे? श्रोतृवर्ग हाताच्या बोटावर मोजण्यासारखा असला तर माणसाला प्रसंगी आपल्यात नसलेल्या रसिकतेचं प्रदर्शन करता येतं; पण हजारो माणसांत कोण कुणाला फुटपट्टी लावीत बसतो? आणि उर्दूचा प्रेक्षक एकाच धर्माचा असतो हेही सत्याला धरून नाही, असा माझा अनुभव आहे. कलकत्त्यात उर्दू मुशायऱ्यासाठी तिकीट काढून आठ हजारांचा जमाव आला होता, त्यात कवी नियाज हैदर यांच्या कवितेवर पाच हजार रुपयांचा चेक प्रेक्षक समूहांतून देणारा माणूस हा आमचे कवी महाराज समजतात याहून भिन्न धर्माचा होता आणि काही असलं तरी या मुशायऱ्यांतून काही धार्मिक कवनं पढली जात नाहीत. तर त्या मुशायऱ्यांतून उच्च वाङ्मयीन मूल्येच सर्वप्रथम शिरोधार्ह मानली जातात. कानपुरी हिंदीचा मुशाहिराही अशाच वैभवात पाहिला, ऐकिला, पण या गोष्टींचा आमचे कविबांधव कधी सम्यक दृष्टीने विचारच करीत नाहीत. इतकेच नव्हे, तर कुठलाही नवा विचार वा व्यक्ती ही तथाकथित उच्चभ्रू मराठी कवी*

**◆ अमर शेखांच्या नाट्यगीतातील संवादात चुरचुरीतपणा, खटकेबाजपणा आढळत नाही. ते सारे भावनेने ओथंबलेले असतात. ◆**

*मंडळी मराठी कवितेच्या दालनात दिसू देत नाही. ती तशी जवळपास फिरकू लागली रे लागली की, ती एक तर अनुल्लेखाने टाळायची, त्यांची टवाळी, कुचाळी करायची किंवा साहित्यांतर्गत मूल्य आणि साहित्यबाह्य मूल्य याविषयीचे स्वतःच निर्माण केलेले कोडे अंथरून ठेवायचे अथवा कुढ्यारड्या मानवाच्या अंतःमनातील अंतर्गत कप्प्यांतील, अव्यक्त सुप्तावस्थेतील संवेदनशील, पण सूक्ष्म असा प्रचंड संज्ञाप्रवाह, असले नाना तऱ्हेचे अर्थहीन प्रश्न उभे करून त्यांचा बाऊ करायचा; येनकेनप्रकारेण आपल्याशिवाय अन्य कोणी या काव्य क्षेत्रात शिरकू-फिरकू नये इतके घाबरवून सोडायचे, गुदमरून टाकायचे. बरे यांच्याशी चर्चा करावी तर तीही निरर्थक. यांना कुणी म्हटलं, 'अहो, तुमच्या कविता दुर्बोध वाटतात', तर उत्तर मिळते, 'मग तेच तर आमचं वैशिष्ट्य आहे.'*

*विचारलं जातं, 'आणि का हो, बोध आणि तात्पर्य सांगत बसायला काय आम्ही शाळा मास्तर आहोत?' 'अहो, तुमची कविता सामान्य जनांना आकलन होत नाही, त्यांची पातळी...'*

*भाष्यकाराच्या तोऱ्यात उत्तर येते, 'हवं तर लोकांनी आमच्या पातळीत यावं.'*

*'अहो, तुमची कविता सामान्य जनांना वाचावयाची आहे...'*

*प्रेषिताच्या डौलात उत्तर मिळते, 'अहो, आमची कविता सामान्यांसाठी नाहीच मुळी, ती समजायला आईन्स्टाईन, रसेल हवेत.'*

*'पोकळ वासा' असलेली ही घमेंडखोर वृत्ती... मला तरी याचा चांगला अनुभव आहे. मध्यंतरी तर यांनी जवळजवळ एक पीठच निर्माण केले, गिरगावातल्या एका बोळात, पण जनतेनं त्यावर इतका बहिष्कार घातला की, ते पीठ अल्पावधीत आपोआप बंद पडले.*

*तरीपण यांचे डोळे उघडले नाहीत. हे असे का घडते याचा विचार कधी या महाभागांनी केला नाही. या सर्व गोष्टींमुळे काही मराठी कवींना प्रथम पुढे येताना आपल्या अंगावर बायकी वस्त्र चढवून (स्त्रीलिंगी नाव*

◆ *वेडी आई हे एक राष्ट्रीय वृत्तीचे असे मराठी कवितेतील वेगळ्या घाटाचे पण काळाला अनुरूप असे नाट्यगीत आहे.* ◆

*घेऊन) अथवा कधीमधी वाम मार्गाचा अवलंब करून पुढे सरकावे लागले. यांच्या आशयात तरी काही नावीन्य असते का? तर तेही नाही. त्याच त्याच बुरसटलेल्या प्रेमाच्या लंपट गोष्टी पुनःपुन्हा उगाळून लोकांना अट्टाहासाने पाजणे, वैयक्तिक सुखदुःखाचे दळण रेकत बसणे हेच या उच्चभ्रूंना अगत्याचे वाटते. मानवी जीवन व त्याचे काव्य हे यापुरतेच मर्यादित करून ठेवले आहे या लोकांनी. मानवाच्या जीवन जगण्याविषयीच्या कल्पना, ती धडपड, ती जीवनाभिमुखता, मानवतावाद व्यर्थ वाटते सारे यांना. जनता जीवन यांना ते टाळतातच, इतकेच नव्हे तर जे जनजीवन हा साहित्य, कला, वाङ्मयाचा पाया, या पायाचाच हे लोक धिक्कार करतात.*

*ठाणे जिल्हा साहित्य परिषदेच्या शहापूर येथील भाषणात या उच्चभ्रू वर्गाचे म्हणवून घेणारे एक साहित्यिक श्री. पु. भा. भावे यांनी अध्यक्ष या नात्याने प्रतिपादिले होते, 'जनते, तू महामूर्ख आहेस, अज्ञानी आहेस, जनतेसाठी वाङ्मय हे घोषवाक्य फसवे आहे' याच पु. भा. भाव्यांनी 'हिंदू' साप्ताहिकात 'बेडेकरांचा लाल मसाला' लेख लिहून 'शेख मियाँना' कवी म्हणू नका असा आदेश दिला होता. एका बाजूला साऱ्या महाराष्ट्रात मी कवी म्हणून ओळखला जातो. अगदी स्वा. वीर कवी सावरकरही मला कवी म्हणूनच उल्लेखितात, तर पु. भा. भावेंसारखे साहित्यिक मिरासदार मला बाहेर फेका म्हणून सांगतात, इतकेच नव्हे तर त्यांच्यासारख्यांकडून मला जातिधर्म वाचक 'मिय्याँशेख' हे विशेषण बहाल करण्यात येऊन हिणवले जाते.*

*मुसलमानापोटी मी जन्माला आलो याचा मला कधी अभिमान, तसा विषादही वाटला नाही. मी माझ्या कृतीवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. माझ्या जीवनाचा फार मोठा काळ मी कवितेलाच वाहिला. तेव्हा माझ्या कवितेचे नीट मोजमाप होऊन मला योग्य मार्गदर्शन व न्याय मिळावा अशीच माझी प्रथमपासून अपेक्षा.*

## *कलावंत*

***कलावंताने प्रामाणिकपणा सोडू नये. क्षुद्रपणाला थारा देऊ नये पुढाऱ्याने मुत्सद्दीपणाला जागावे. क्षुद्रपणाविषयी बेफिकीर असावे पुढारी जेव्हा प्रामाणिक होईल क्षुद्रपणाला हाकून लावील. तेव्हा तो कलावंत होईल. आणि पुढारी कलावंत झाला तर राष्ट्र संपन्न, आदर्श व सुसंस्कृत बनल्याशिवाय राहणार नाही. ते काही असो, कलावंताने प्रामाणिकपणा सोडू नये. क्षुद्रपणाला थारा देऊ नये. निदान तो तरी नक्कीच मोठा होईल. उत्तम कलावंत हा उत्तम योगी असतो.***

*माझी कविता रांगडी आहे अन् ती रांगडीच असणार, कारण तिची पिंडप्रकृतीच तशी आहे. तरी पण वाटतं की, कुणी तरी तीवर बोलावं, कुणी तरी कान पिरगाळावा, कुणी तरी थोपटावं. मी या आधी 'कलश' नावाचा कवितासंग्रह जनतेहाती दिला. आचार्य अत्रेंनी प्रस्तावना कौतुकभरल्या अंतःकरणाने लिहिली. ते माझ्या कवितेचं अमर लेणं असल्याचं आजही मराठीतले मर्मज्ञ पंडित मानतात, वर्तमानपत्री टीकाकारांनी अतिशय चांगली दखल घेतली, पाठ थोपटली, प्रेमाने कानही पिरगळले. नागपूरच्या 'तरुण भारत'ने शाहीर अमर शेख यांचा 'काव्य-कलश' म्हणून गौरवून 'ध्येयवादाच्या स्फुल्लिंगांतून अंगार गीते' असे म्हणून 'कवितेत अमृतसिंचनाची प्रतीती आली' असे म्हटले. मराठी जनतेने तर अमाप प्रेमाचा वर्षाव केला; पण या उच्चभ्रू कवी, साहित्यिक मिरासदारांनी अन्याय, अवहेलनेशिवाय दुसरे काही दिले नाही. उदाहरणादाखल तीन साहित्य संमेलनांतील काव्यगायनाचे कार्यक्रम मला दाखवता येतील.*

*औरंगाबाद साहित्य संमेलनात मी एक साहित्यिक कवी म्हणून खास संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावासाठी उपस्थित होतो. उच्चभ्रू मिरासदार कवींना आमंत्रणे होती. मला नव्हते अन् मी तर हजर होतो. जमलेल्या श्रोतृवर्गाने*

◆ **अमर शेख हे बोलून चालून जीवनवादी. ते जीवनाबद्दल परकाया प्रवेश करून भाष्य करणारच आणि तसे त्यांनी केले आहे. एक ठसठशीत आणि मनोवेधक असे हे नाट्यगीत आहे. हेच खरे.** ◆

*माझ्या नावाचा आग्रह धरला. मला आमंत्रण नसल्याचे लोकांना कळले. लोकांना चीड आली. चिटणीसांनी लोकांची माफी मागून लोकांच्या इच्छेखातर मला त्या कविसंमेलनात भाग घेण्यासाठी आवाहन दिले. मी काव्यगायनात भाग घेतला व शेवटी परिषदेने खर्चही दिला, ही गोष्ट वेगळी. पुन्हा तीच गोष्ट मालवण साहित्य संमेलनाची. तेथेही मी संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावासाठीच गेलो होतो. तिथेही श्रोतृवर्गाने औरंगाबादप्रमाणेच माझ्या काव्यगायनासाठी गहजब केला व तिथेही औरंगाबादप्रमाणे संमेलन सेक्रेटरींनी माफी मागून काव्यगायनासाठी विनविले. शेवटी मीही भाग घेतला. मला वाटले, आता तरी या बड्या मंडळींकडून मजवर अन्याय होणार नाही; पण छे, सातारा साहित्य संमेलनातही अगदी तेच घडले. तोच जनतेचा आग्रह, तीच चिटणीसांची माफी. तेच तेच, अगदी तेच; पण हे सारे लोकमतापुढे नमूनच. स्वतः होऊन नाही. काय म्हणावे याला? अशा अनेक काव्यगायनाच्या कार्यक्रमात माझी कविता अग्रेसरत्वाने उजाळून निघाली. केवळ गायकीवर मी आघाडी मारली असे कुणालाही म्हणता येणार नाही. माझ्या काव्यात काव्यमूल्ये नसती तर या चोखंदळ काव्यरसिकांनी क्षणात मला भिरकावून फेकून दिले असते.*

*'लोकमित्र'कार आपल्या २-२-५९च्या अंकात म्हणतात, 'त्यामानाने कवी अमर शेख हे बापटप्रभृती तरुण कवींच्या बरोबरीचे असूनही महाराष्ट्र शारदेच्या दरबारातील काव्य विभागात कोठे तरी मागल्या रांगेतच घुटमळताहेत, त्या दरबारातील सन्माननीय आसन त्यांना अजून प्राप्त झालेले दिसत नाही.' हे वाचून माझे काही मित्र मला म्हणाले, ''अमर शेख! तुम्ही उच्च ब्राह्मण कुलोत्पन्न नाहीत हाच तुमचा खरा दोष.'' मला हे पटले नाही. मी त्यांना सांगितले, ''या लोकमित्रचे संपादक श्री. एस. एम. जोशी हे उच्च कुलोत्पन्नच आहेत ना? त्यांच्या पत्रांतीलच हे*

◆ *आजच्या जीवनाचा अचूक वेध घेण्याची ताकद कवीच्या मनात असल्याने कविता कल्याणकारी बनलेली आहे.* ◆

*विचार आहेत ना? कवी आचार्य अत्रे, कुसुमाग्रज, सोपानदेव चौधरी, ग. दि. माडगूळकर हे तरी कुठं मजप्रमाणे हीन कुळात जन्मले आहेत? ग. दि. माडगूळकरसारख्या मान्यवर कवीला जिथ केवळ 'गीतकार' म्हणून हिणविले जाते, तिथे माझ्या उच्च-नीच कुळाचा प्रश्न काय? यात एकच गोष्ट खरी आहे आणि ती सांगायची म्हणजे मराठी साहित्य वाङ्मयाच्या क्षेत्रातील (सरंजामदारी अवशेषांची) पुरोहितवर्गाची मक्तेदारी काडीइतकीही कमी झालेली नाही. म्हणूनच जीर्णशीर्ण मूल्यांची इथे जोपासना होते व नवोदित मानवतावादी, समाजनिष्ठ मूल्यांची अवहेलना होते.*

*इतकी वर्षं महाराष्ट्रासमोर मी कवी म्हणून उभा आहे. माझी न् माझ्यासारख्यांची ही स्थिती आहे. नवागतांची, इतरेजनांची काय स्थिती असेल?*

*खरं म्हणजे या काव्यक्षेत्रातही मिरासदारांनी एक मोठा कोट बांधून भक्कम जाळंच उभं करून ठेवलं आहे आपल्याभोवती. बडवेगिरीचं हे जाळं मोठं नमुनेदार आहे. स्थलाभावी ते मी सांगत नाही.*

*फार विचित्र अनुभव आहेत गाठीशी माझ्या. ही गोष्ट खरी आहे की, या तथाकथित उच्चभ्रू कवींच्या जातीपेक्षा मी वेगळा आहे; पण मीच एक वेगळा नाही. अनेक नवागतच नव्हे तर मजसारखे काही जुने कवीही वेगळे आहेत. आम्हा सर्वांचं वेगळेपण हे एकमेकांपासून पुष्कळ अंशाने भिन्न आहे; पण तरीही आम्ही सर्व वेगळे आहोत, हे खरंय.*

*माझं वेगळेपण - माझी कविता ही माझ्या समाजजीवनाला जबाबदार अशा सामान्य माणसाच्या जीवनातच जन्मली आहे. मला वाटते, प्रचंड विध्वंसक सामाजिक मनःस्थितीच्या; भयानक अशा वैचारिक गोंधळाच्या; आर्थिक आपत्तीत सापडून चक्काचूर होणाऱ्या मानवी जीवनाच्या; पण तरीही अंतर्मुख होऊन धडपडणाऱ्या अशा एका वेगळ्याच कालखंडातील वादळातील पाचोळ्यागत गिरक्या खात भिरभिरणारा मी एक कलावंत*

**अमर शेखांच्या कवितेला काही तरी सांगण्याचा, काही तरी करण्याचा मुळी ध्यासच लागलेला आहे. त्यामुळे कवितेत ओज येणे अपरिहार्य बनले आहे.**

*कवी माणूस आहे.*

*भयावह संघर्ष मजपुढून सरकतो आहे, धक्के देतो आहे. उलथापालथी होत आहेत आणि बदल होत आहेत. एकेकाळी महिन्याचे रोजे (उपवास) करून पंचगांना (पाच वेळा) अल्लाला साद घालणारा मी- समाजवादाची बुद्धिवादी सावली माझ्या नमाज, रोज्यावर पडलेली मी पाहिली. दुनिया पादाक्रांत करू पाहणारा हिटलरवाद पाहिला. दुसऱ्या महायुद्धाच्या अवघे जीवन ग्रासून टाकणाऱ्या झळा पाहिल्या, साहिल्या, श्रमजीवी वर्गाची सत्ता प्रस्थापित झालेली, विस्तारित होत असलेली पाहिली. पिळवणुकीचा पाया असलेली जगातील भांडवलशाही बाजारपेठ अस्तंगत होत असलेली पाहिली. पडेल ते काम मिळवून दुपारची भ्रांत मिटविण्यासाठी जिवाचा आटापिटा केला. त्याच माझ्या श्रमावर जगून मजवरच कुरघोडी करणारा मी पाहिला.*

*संस्थानिकांचा नेत्रदीपक विलास पाहिला. त्या विलासाच्या उपभोगात पिचत पडलेली, सडत असलेली नैतिक मूल्ये पाहिली. नफ्यासाठी उत्पादन स्वीकारणाऱ्या देशांतील व्यक्तिगत सुखाच्या एव्हरेस्टबरोबर सामाजिक दुःखाची परिसीमा माझ्याच या खंडप्राय भारतात मी पाहिली. साम्राज्यवाद्यांनी जाता-जाता पेटवलेल्या दंग्यांत रक्ताचा (मुस्लीम) भाऊ मरून पडलेला पाहिला. वर्गात एका लंगोटीनं वावरलेला जीवश्चकंठश्च (हिंदू) बंधू रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहिला. ॲटम, हैड्रोजनसारख्या विध्वंसक बाँबची उत्पत्ती पाहिली. हेलसिंकीचा प्रेमळ अंतःकरणाचा पण... जगी मानवी युद्ध नको रे... हे गर्जून सांगणारा स्वाभिमानी भंगी पाहिला. विज्ञानावर मात ठरणारी निकोलाय-पापोविच यांची मानवी जीवनातली गगनभरारी तर खुद्द मॉस्कोमधून बारकाव्यासह पाहायला मिळाली.*

*स्त्री मानव शक्ती निम्मी होती दासी*<br>
*ती हात घालते आज पहा गगनासी*

> ◆ *अमर शेखांना मातेबद्दलचा संस्कृतीचा जसा जाज्वल्य अभिमान त्याचबरोबर राष्ट्राच्या अस्मितेचाही. त्यामुळे त्यांच्या गीतात राष्ट्रीय वृत्तीचा परिणाम झालेला दिसतो.* ◆

*हे भाकीत व्यक्त करून आपल्या 'कलश' या काव्यसंग्रहामधून रंगवलेले स्वप्न वॅलेंतिनाने (कालच्या अबलेने) साकार केलेले पाहिले. कवींच्या लाडक्या चंद्रावर मानवाने रोवलेली ध्वजा पाहिली. वर्णद्वेषानं भाजून, होरपळून निघाल्यामुळे अंतराळातील पाकोळ्यागत भिरभिरणारी 'काळी माणसं' आफ्रिकेच्या जंगलात स्वतंत्र होत असलेली पाहिली. ज्ञानेश्वर, तुकयाची समर्थ वाणी ऐकली. नव्हे, त्यांच्या मानवतावादी प्रकाशातच माझे सारे बाल्य उमलले, केशवसुतांच्या तुतारीने मला उभे केले. बालकवींच्या फुलराणीने रिझवले. फुले पाहिली, विरहाकुल कमलिनी पाहिली, प्रेमाने अक्षरशः वेडा होण्याची धुंद अवस्था अनुभवली आणि त्याच अवस्थेत झालेला प्रेमभंगाचा जबरदस्त तडाखा साहिला. गाढवाइतके कष्ट उपसले आणि कीर्ती शिखरावरील तृप्तीची धुंदीही अमूप लाभली. सुख, दुःख, सौंदर्य, नरक सर्व-सर्व काही पाहिलं, साहिलं.*

*पण खरं सांगायचं म्हणजे सुखापेक्षा दुःख-दुःखच खूप पाहिलं. श्री. विंदा करंदीकर यांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे, 'असं काही पाहिलं आहे की जाने मी दुभंगलो'. अगदी असंच दुभंगण्याइतकं मी पाहिलं आणि जगातील बहुशः सगळे विचारवंत आज याच एका चिंतेत आहेत की, हे सांधायचं कसं? या विचारवंतांतून कोणीही असा राहिलेला नाही की, जो 'वरून' येणाऱ्या एखाद्या प्रेषिताची वाट पाहील. नव्हे- प्रत्येकाची तळमळ आहे, की मानवसमाजाचे शारीरिक, मानसिक उद्ध्वस्तीकरण थांबलेच पाहिजे. आपल्याला समजेल एवढा व समाजाला झेपेल एवढा कर्मयोग समाजात बाणवलाच पाहिजे, हा एक सर्जनशील विचारप्रवाह आज सर्वत्र वाहू लागला आहे; पण त्याचा एक लक्षांश, कोट्यांशही माझ्या कवनांत उमटला नाही, तरी संसारातील दुःख नाहीसं व्हावं म्हणून जिवाची कासावीस मात्र चालू असते सारखी. काय करावं म्हणजे हे सर्व नाहीसं होईल व मानवाला हवं ते मिळेल, याच प्रश्नाची*

**◆ अमर शेखांनी नाट्यगीतातून व्यथा व्यक्त केलेल्या आहेत. त्या व्यथा मात्र कुठेही ओरखडा पडणार नाही अशाच रीतीने काळजीपूर्वक प्रकट केलेल्या आहेत. ◆**

*घालमेल सतत चालू असते मनात. त्यातून सुटणारे शब्दच काव्यरूप घेत असावेत आणि मग वाटतं असं की, माझी कविता निबिड अंधकारातील, घनदाट अरण्यामागील एक साधी पाऊलवाट आहे. 'स्वकरे ज्ञानसूर्याला ओढून' करतील या पायवाटेचा राजमार्ग, लावतील साऱ्या दुःख-दैन्याला आग आणि फुलवतील या जीवनाची सुंदर बाग.*

*या सर्व गोष्टींचा ठसा माझ्या कवितेत पडणं अपरिहार्य आहे.*

*काव्य म्हणजे सत्याकडे जीवनाची ज्वलंत आणि अव्याहत अशी धाव असं मी समजतो. सागर सत्य आहे, जीवनप्रवाह आहे. प्रवाहाला सागराची ओढ नैसर्गिक असणार, कारण ते 'एकरूप' आहे. म्हणून जीवनही पण सत्यच आहे. हे जीवन अविरोध हक्काने आणि मानाने जगायला मिळावे म्हणून घेतली जाणारी धाव, अभिलाषा म्हणजेच मानवाची स्वातंत्र्याकांक्षा हेही सत्य आहे आणि म्हणूनच मी या सत्याचा पुरस्कार करणार. या स्वातंत्र्यकांक्षेत काव्य नाही असे म्हणणाऱ्या मुर्दाडांतला मी नाही.*

*कवी काय किंवा शाहीर काय, तो स्वकालीन युगप्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्माचा तो गतिशील वाहक असतो. येईल त्या परिस्थितीला तोंड देऊन त्या युगातील सत्य म्हणजे युगधर्म त्यांने सांगायचा सांगतो. आमचा युगधर्म आहे समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे.*

*एका प्रसिद्ध उर्दू कवीला मी आपलं 'काम करून गिरनीत थकलीरं माझी मालन कामानं सुकली' हे कवन ऐकवीत होतो. प्रथम तो स्तंभित, दिङ्मूढ झाला. नंतर म्हणाला.*

*''क्या कहा आपने? मजदूरको भी इष्किया जिंदगी चाहिये? क्या आज मजदूरदिल भी मोहब्बत की खुशनुमा तस्वीर देखने ललचाता है? और वह भी अपनी घरवालीकी, हककी बीबीकी प्यारी सूरत देखने के लिए तडपता है? इसपर तो हम लोगोने कभी सोचा भी नही. हमारे*

◆ ***मी एक सामान्य माणूस, माझ्या कविताही मग सामान्यच. तेव्हा माझ्या कवितांचं कौतुक आणि लाड महाराष्ट्रातल्या रसिक जनसागरानं इतकं करावं ते का?*** ◆

*दुनिया में ये चीज बिल्कुल नई है, लेकिन सही भी है. वाह वाह भई, यह बिलकुल अलगहीसी बात है''*

*अन् ही 'अलगहीसी बात' नेमकं हेच नि असंच माझं या तथाकथित उच्चभ्रू कवींपेक्षा वेगळं आहे.*

*माझ्या या निर्मितीला, तळमळीला, वेदनेला कुणी कसलाही रंग दिला तरी मला त्याचं काही वाटत नाही. पुन्हा लिहून ती केवळ दप्तरात ठेवून दिली किंवा एखाद्या देवळात, क्लबात, पार्टीत जाऊन चार दोस्तांपुढं भेळ-कॉफीबरोबर ठेवली की पुरे, असंही मला कधी वाटत नाही. तर ती हजारो लोकांपुढं ठेवून आपली व्यक्तीची भावना हजारो, लाखो लोकांच्या भावनांशी ताडून पाहावी असे मला वाटते. मी तसे करतोही, आणि तिथे प्रतिसाद पण मिळतो, कदर होते, न्याय लाभतो. हे सांगायला आनंद, अभिमान वाटतो. माझी कविता याच पायावर उभी आहे आणि जोपर्यंत माझा हा पाया भक्कम आहे तोपर्यंत मला, माझ्या कवितेला डर नाही अन् मरही नाही.*

**- अमर शेख**

दि. १-१०-६३

❖❖❖

# अमर शेख यांच्या डायरीतील काही पाने...

**१९४१**

| | |
|---|---|
| १५ जानेवारी | विसापूर जेलमधून सुटका<br>२८ जानेवारी पत्नी राबिया हिला फारकत (सोडचिठ्ठी) दिली. |
| ०३ मार्च | सावत्र आईशी खूप बोललो. टाकून बोललो- पण विचारपूर्वक बोललो. वडिलांनी भेटीची इच्छा प्रदर्शित केली पण मी भेटलो नाही. |
| १८ मार्च | गांधी आहेत तोवर वैयक्तिक सत्याग्रह आणि हा सत्याग्रह आहे तोवर शांतता आणि शांतता तोवर हे पारतंत्र्य असणारच. शांततेने मागून घेतलेले स्वातंत्र्य हे फार तर मूठभर प्रतिष्ठित वर्गाची तहानभूक भागवू शकेल; पण बहुजन समाजाचे स्वातंत्र्य-त्यांनी ते मनगटाच्या जोरावर व रक्ताचे पाट वाहवूनच मिळवायला पाहिजे. पण आजची ही गांधीजींची भूमिका पाहून काही मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय बोलघेवडे लोक निराशेचा सूर वर काढतात. या लोकांचे मला आश्चर्य वाटतं. स्वतः कृती करत असताना जर हे लोक निराश झाले तर काही वाटत नाही. पण राष्ट्रीय कार्याचा ज्यांनी एक स्क्रूसुद्धा पिळला नाही, असेच लोक निराशेचे सुस्कारे सोडीत असलेले दिसून येतात. कृती करून जे निराश होतात त्यांच्या सुस्काराऱ्यांत अर्थ तरी आहे. पण हे ढोंगी सारे... |
| १३ एप्रिल | आज मी एक पैशाचे काम केले. शेजाऱ्याला तीन घागरी पाणी पैशातच घातले. |

| | |
|---|---|
| १४ एप्रिल | भाऊसाहेब ऊर्फ वि. स. खांडेकरांना भेटलो. |
| १७ एप्रिल | जुन्या गिरणीसमोर सभा. ६००-८०० लोक सभेत पिंपरकर. माझे भाषण परिणामकारक झाले. |
| ०३ जून | भाऊसाहेब खांडेकरांना पत्र पाठवले. |
| ०६ जून | गांधींचे तत्त्वज्ञान लुळं पडू लागलं. हिंदू-मुसलमानांच्या दंग्यातून हृदयपालट तत्त्वज्ञान आणायचे ठरवले. शांतिदलाची स्थापना केली. अहमदाबाद दंग्यातून काम करायची परवानगी मिळाली. या दलात स्वयंसेविकापण होत्या आणि गुंडांनी तर त्यांचेवरच भयानक बलात्कार केले. |
| १४ जून | काल एक पारधी आपल्या मुलीला घेऊन युनियन ऑफिसमध्ये आली. 'मिशनरीबाईने' मुलीच्या डोक्याला तेल लावून बट उपटून नेली म्हणून सांगितले व आता मुलगी मरेल म्हणून रडू लागली. मग पिंपरकरांनी त्या मुलीवर मंत्र टाकला! हिंदुस्थानातील समाजवादी कार्यकर्त्यांना हे काम करावे लागत आहे! |
| २३ ऑगस्ट | कोल्हापुरास जाण्यासाठी निघालो. |
| २४ ऑगस्ट | कोल्हापुरास पोहचलो. आज मा. विनायक यांची त्यांच्या राहत्या घरी भेट. |
| २६ ऑगस्ट | गुरुवर्य भाऊसाहेब खांडेकरांची भेट |
| २७ ऑगस्ट | नवयुगकडे ट्रायल होऊन २० रुपये पगारावर राहण्याचे ठरले. |
| १५ सप्टेंबर | मा. विनायकांसमोर गाणे. |
| १७ सप्टेंबर | कोल्हापूरचे मित्रमंडळ लाभल्यापासून आनंद होतो; तितकेच दुःख पण वाटते. आनंद अशासाठी की, माझ्यासारख्याला भराभर मित्र मिळालेत ते हुशार, बुद्धिमान, वाईटही वाटते की, त्यांच्या साहित्य, वाङ्मय, काव्याचा अभ्यास, इंग्रजीचं ज्ञान, त्यावरील चर्चा- मला भाग घेता येत नाही. |

मला जर त्या क्षेत्रात थोडा वाव मिळता तर त्याच क्षेत्रात कितीतरी नावीन्य निर्माण केले असते मी.

३० सप्टेंबर — यांनी अंगठी घेतली.

०२ ऑक्टोबर — मला कुणी विचारील, 'आज काय होतंय तुमच्या स्टुडिओत?' मी चटकन म्हणेन, 'दारू!' समाजाला पाजण्यासाठी याला जर कला म्हणायचे असेल तर ती एका विशिष्ट वर्गापुरतीच बहुजन समाजाची खास नाही.

०८ ऑक्टोबर — ज्याचं रोजचं जीवन हीच लढाई आहे. तो कशाला भिणार? तो भिऊ शकतो फक्त अविचाराला.

## १९४२

१८ फेब्रुवारी — पुण्याला मी माझ्या समाजापासून दूर फेकला जातोय. मुस्लीम समाजापासून नव्हे. त्यापासून तर मी कधीच दूर फेकला गेलोय. मी दूर फेकला जातोय खालच्या समाजापासून पिळल्या जाणाऱ्या वर्गापासून न लुडबुडत आहे ढोंगी मध्यमवर्गात आणि म्हणून त्या वर्गातले सारे दुर्गुण माझ्यात जोराने प्रवेशू इच्छितात.

१४ मार्च — चालू समाजपद्धतीत माणुसकीला किंमत तर नाहीच, पण असत्याला इतका भाव आहे की, असत्याचं पितळ सोन्याच्या भावानं विकू शकतं. पण सत्याचं सोनं पितळेच्या भावातसुद्धा कोणी विचारत नाही.

२० मार्च — चिडखोरपणा आत्यंतिक प्रमाणात शिरू लागला आहे. त्याचा वेळीच नाश करणे अत्यंत जरूर आहे.

१६ एप्रिल — सिनेसृष्टी : समाजाला जीवन वाटणारं हे जग किती विचित्र आहे समाज. या नवीन वाढणाऱ्या जगाविषयी किती भ्रामक कल्पना त्याने उराशी

बाळगल्या आहेत. आपल्या मी या जगात येऊन पहिला राहिलो नाही. याचा अर्थ असा नव्हे की, मी घाणीत घोळू लागलो आहे. पण एवढे मात्र खरे माझी मानसिक उन्नती स्थगित झाली. मानसिक अवनतीला कारणीभूत. दुसरे एक कारण असू शकेल ते म्हणजे परिस्थितीचे आघात होय. पुढे चल- चल-

१९ एप्रिल — निष्क्रिय, निष्क्रिय, निष्क्रिय.

२३ एप्रिल — भाऊसाहेब खांडेकरांची भेट. बराच वेळ चांदण्यात बसलो.

२७ जुलै — मध्यमवर्गीयांचा धर्म- नेहमी बुचकळ्यात पडणे. निष्क्रियता तयारी- फक्त एक पाऊल पुढे जाण्याची.

२८ जुलै — स्वतःवर रागावून किती शिव्या देऊन जर क्रांतिसूर्य होत असते तर मग ही जिवाची आटापीट, त्रास, दुःख, तुरुंग, रक्तपात आज जगात दिसतेच ना?

१० ऑगस्ट — चीड आणण्यासारखे वर्तन सरकारकडून होऊ लागले असून काय होणार हे समजू शकत नाही. मात्र खूप चीड येते हे सारे प्रकार पाहून एस. पी. कॉलेज, ससून हॉस्पिटलवर गोळीबार, शीख तरुणांची झेंड्याबद्दल बाचाबाची झाली. त्याच्या छातीत गोळी गेल्यावरच तो झेंडा त्याच्या हातून सुटला.

२८ ऑगस्ट — चालू लढ्याला कुणालाही विरोध करता येणार नाही. लढ्याला विरोध करणे म्हणजे जनतेपासून दूर जाणे. दडपशाहीमुळे लोकांना जास्त चेव येतो आहे.

११ नोव्हेंबर — बुद्धिवाद व भावना यांचा सारखा खेळ चालला आहे. पण त्यामुळे माझी किती कुचंबणा होत आहे.

१२ नोव्हेंबर — १९४० सालअखेर जी बुद्धी कमावली तेच भांडवल अजून कायम आहे. जास्त कमावता आले नाही. कारण समाजापासून दूर.

१८ नोव्हेंबर — जागरण न् श्रम चालू आहेत आणि औषधे ढोसतो आहे. म्हणून का प्रकृती सुधारणार आहे? एक काळ होता, जागरण काय किंवा श्रम काय? पण आज प्रकृती किती विचित्र झाली आहे. थोडं काही झालं की संपलं. प्रकृतीवर ताबडतोब परिणाम होतो. तसेच मानसिक परिस्थितीचे झाले आहे.

१९ नोव्हेंबर — खूप दारू पिऊन झिंगून पडावे, शांतपणे पडावेसे वाटते. त्याशिवाय शांतता लाभणार नाही असे वाटते. आज माझ्यासमोर हे विचार येतात. कुणा कम्युनिस्टाच्या डोक्यात येत असतील का असे विचार? मी कम्युनिस्ट व्हायला लायक आहे का?

कजा आयी है, तेरे जानेके दिन हैं
मुसीबत के आँसू बहाने के दिन है ।।

हे रडगाणे कोण कम्युनिस्ट आज म्हणत आहे? आज जगातला कम्युनिस्ट कुठं आहे? न् हा भाकरीच्या तुकड्यासाठी लाचार आयुष्य कंठणारा भित्रा कम्युनिस्ट मी कुठं आहे? नालायक.

२१ नोव्हेंबर — पत्र आलं. कुठे तरी मन रमवण्याचा प्रयत्न करत असतो. पण पूर्ण समाधानाचा एक तरी क्षण मला अनुभवाला मिळाला आहे काय?

तुझ्यामधील या गोष्टी नाहीशा झाल्या तर ठीक, नाहीपेक्षा तू मरशील. यापुढे पत्रसुद्धा लिहू नकोस. फार त्रास होईल तुला. तू आणि ती दोन वेगवेगळ्या वाटेचे वाटसरू आहात. तिच्या गावी तरी आहे का ही गोष्ट.

२३ डिसेंबर — एक गोड मुलगी.

२४ डिसेंबर — बार्शीत सुंदर काम होऊ शकेल. पण काम

करण्याची पद्धती बदलली पाहिजे. त्यात बोल्शेव्हिक क्रांतिकारकपणा आला पाहिजे. ज्यांच्या अंगी सिन्सिअरिटी आहे त्यांना योग्य ट्रेनिंग मिळालं पाहिजे.

वर्ष अखेरची नोंद सारे वर्ष सिनेमासृष्टीत गेले. समाजकार्य घडू शकले नाही.

**१९४३**

४ जानेवारी ३८-३९ साल. ते स्वैर झालं. त्यासारखं आयुष्य पुन्हा कधी लाभेल? रात्रीच्या त्या गोड अंधारातून, नदीनाल्यातून, डोंगरकपारींतून भटकत राहून विश्वासपूर्ण, स्वैरपणे मुक्तकंठाने ठोकलेल्या त्या आरोळ्या, ती बेछूट, बेफामपणे भटकत म्हटलेली गाणी, साऱ्या जगाचं ऐश्वर्य साठवलं होतं. त्या आयुष्यामध्ये.

५ फेब्रुवारी तिच्यावर माझं खूप प्रेम आहे. तिला यांची कल्पनाही नसेल. तिचे कुणा तरी माझ्यापेक्षा अधिक कर्तृत्ववान तिसऱ्याच तरुणावर खूप प्रेम असेल? तिने माझ्यावरच का प्रेम करायला पाहिजे? तिने आपल्या भावना का दडपून टाकाव्या? तिचे दुसऱ्या एखाद्यावर प्रेम असेल. तुझे तरी तिच्यावर आहे ना? बस्स... तू त्यातच सुख मानले पाहिजेस.

१० फेब्रुवारी आठवण का इतकी जाणवते? आठवणीशिवाय दिवस जात नाही.

२० फेब्रुवारी ...का खत! देवी आ रही है. खुशखबर?

०७ मार्च सुरेश साळवीसारखी जर कम्युनिस्टांची प्रगती होत राहिली, तर थोड्याच दिवसात कम्युनिस्ट समजावून देणे अत्यंत जरुरीचे असेल. मध्यमवर्गीय तरुणाची समाजवादी विचारसरणीची प्रथमावस्था

रोमँटिसिझमने भारून गेलेली असते. प्रथम ती दूर झाली पाहिजे. नाहीतर तो तरुण पार्टीच्या हातून निसटून जाईल. जगायचे कशासाठी? कुणावर मला प्रेमाने रागवता येत नाही. कुणी माझे कौतुक करणारे नाही. मी कुठवर भावनांना मारू?

गैरसमज. यापुढे जास्तीतजास्त तोल सांभाळणे जरूर आहे. 'काही तरी प्रचंड केल्याशिवाय जगात व्यक्तीचे स्थान राहत नाही. ते करत असताना जगातून नाहीसं होण्याची शक्यता असते. काय पर्वा त्यांची? मग करायला लाग काही तरी.'

१५ एप्रिल ही गुंगी हवीय मला. हे फार छान केलंस तू. मी पूर्वीसुद्धा असाच गुंगीत असे. पण त्यात किती काळजी न् विचार. या गुंगीत फक्त तुझी आठवण आहे. त्यात सुख आहे की नाही माहीत नाही. एका क्रांतिकारक कम्युनिस्टांची डायरी ही! खरं आहे?

१७ एप्रिल नाही सहन होत हे. कसलं घाणेरडं हे निष्क्रिय आयुष्य? सारं नाशिवंत आहे ना?

१९ एप्रिल तुझ्याइतका त्रास माझ्या आयुष्यात कधी कुणा व्यक्तीने दिला नाही. खूप पराक्रम गाजवलास तू माझ्या आयुष्यक्षेत्रात.

२२ एप्रिल मी का जगतो हेच मला कळत नाही. हे लिहीत असतानाच इतके विचार गोंधळ घालत आहेत की हे सारे पानंच्या पानं नुसते काळेकट्ट करून टाकावेसे वाटते. आज खूप त्रास झाला मला. नको कळायला ते चांगले-वाईट, नको कळायला ते सत्य-असत्य, बुद्धिवाद. मनात येते ते लिहिता येत नाही. गोंधळ होतोय सारा.

०२ मे पुन्हा तीच गंमत! एक वर्ष कशाला? काल आणि आजच पहा ना ‘तू म्हणजे एक मृगजळ’- पण कोणत्या अर्थाने?

०४ मे कॉ. के. व्ही. एक इच्छा होती त्याची. पार्टीमेंबर व्हायची. त्याचं प्रेत सडून गेलं होतं. सिन्सिअर पार्टी हितचिंतकाची ही अवस्था? नको होती व्हायला. मी हा शब्द त्याच्या कोशात नव्हता. स्वार्थ त्याला ठाऊक नव्हता, जिवंत असे तो त्याच्याकडे कुणी पाहिले नाही. एकटा होता. जगात न् मेल्यावरसुद्धा त्याची ही अवस्था मी सुद्धा त्याच्या मृत्यूची बातमी ऐकली. काही वाटले नाही मला. तिच्याच विचारात होतो मी. पण आता गेली. के. व्ही.सारख्या डोळ्यासमोर येतो.

०५ मे फक्त तीच माझ्यावर मोहिनी घालू शकली, दुसऱ्या कुणाला ते शक्य झाले नाही. प्रेमी जिवांना मी शिव्या देत असे पूर्वी. पण प्रेम म्हणजे काय हे मला आज कळू लागले. किती त्रास असतो विरहात ते.

०६ मे पार्टीतील काही असंतुष्ट आत्मे यापुढे तिला पत्र पाठवणार नाही न् संबंध पण येऊ देणार नाही. तिच्याविषयी जे वाटतं ते वाटत राहीलच.

०८ मे मी स्वतःहून माझ्यात बदल घडवून आणत आहे. कसले समाधान मिळणार आहे न् मिळत आहे? त्या काळी सांपत्तिक स्थितीनं गांजला गेलो होतो. तरी एवढं खास वाटत होतं की आपण काहीतरी सामाजिक कार्य करत आहोत. आज समाजसेवेचे समाधान नाही. स्वतःच्या भावनेला, मनाला सुखवण्याचे समाधान नाही. माझे जग आहे सारे पण मी आहे कुणाचा? हे सारे कुणासाठी?

१० मे १५ एप्रिल रोजीची आठवण एक गुंगी होती.

आज ती एक तापदायक गोष्ट वाटते. विरह सहन करण्यात मी सारं आयुष्य घालवण्याची भाषा करत होतो. हा विरह कुठंवर सहन करणार तू? शक्य नाही वाटते; तोल सुटेल.

१५ मे — गैरसमज... यापुढे जास्तीत जास्त तोल सांभाळणे जरूर आहे. नवीन मैत्रीला यापुढे वाव नाही. माझ्या आयुष्यात सिगरेट- कुणाची पर्वा न् कुणाची काळजी... सिगरेटमध्ये थोडंसं समाधान आहे; पण पुढे पाऊल टाकू नकोस अन् तोल सुटू देऊ नकोस.

०२ जून — किती कामात गुंतून घेतो मी स्वतःला, पण मन गुंतलेलं असतं का त्यात? तिनं माझ्या भावनांना उत्तेजन दिलं हे निश्चित. अन् म्हणून मी तिच्याकडे ओढला गेलो. पण तिला आपण आज उत्तेजन दिलं नाही. असेच म्हणायचे. तिच्या समजुतीखातर मी होय म्हणेन. पण म्हणून ती स्वतः निर्दोष असणार नाही. माझ्या दृष्टीनं मी समजदार आहे. समजून-उमजून उत्तेजन देत आहे. असे मला खात्रीपूर्वक वाटते. पण इतर व्यक्तीत अन् तिच्यात काही फरक नाही तर? जाऊ दे.

१६ जून — माझ्यासारख्यांना जे अशक्य तेच मला शक्य करून दाखवायचंय जगाला, ज्या दिवशी हे होणार नाही असे वाटेल त्या दिवशी मी या जगात नसेन.

२६ जून — कम्युनिस्ट क्रांतिकारक- चांगला माणूस व यंत्र यांच्या मधली अवस्था.

०७ जुलै — आई खरोखरच एक क्रांतिकारक स्त्री झाली असती. पण मला तिचे नीट मार्गदर्शन करता आले नाही.

२८ नोव्हेंबर — फ्रॅक्शन मीटिंग.

**१९४४**

| | |
|---|---|
| १० एप्रिल | कार्पेथियन पर्वतावर वीरांनी झेंडा लावला. |
| ११ एप्रिल | ‘ओडोसा’ बालवीरांच्या हाती. ‘आसाम फ्रंट’ गंभीर परिस्थिती. नाना पेठ दल, भवानी पेठ रात्रीचे दल |
| ०८ मे | स्टुडिओतील नोकरीचा राजीनामा दिला. |
| १५ मे | पत्र! आता कसली पत्राची अपेक्षा? तू काय पदवीधर आहेस? अन्! आता तुझे हे चहाच्या कपातील सगळे मित्र झाडून झटकून दूर होतील तुझ्यापासून |
| ०३ नोव्हेंबर | टाऊन हॉलमागे अमळनेर कार्यक्रम २ तास. पाच-सात हजार लोकांचा समुदाय हजर होता. यशस्वी. |
| ०४ नोव्हेंबर | अमळनेरहून जळगावी परत- सभा. |
| ०५ नोव्हेंबर | मला माझ्या शक्तीची पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच ती जास्तीत जास्त योग्य कारणी खर्च झाली पाहिजे. |
| ०१ डिसेंबर | निश्चय - सन १९४८ किंवा १९४९ पर्यंत आपण खूप खपायचे. किसान संघटना करायची अन् ती एवढी प्रचंड करायची की ४९ साली तरी ऑ. इं. किसन सभा महाराष्ट्रात भरवली जाईल. त्या सभेत एक लाख किसान आपण जमवूया हा आजचा निर्णय.<br>कॉ. गोदूताई परुळेकर व अमर शेख |

**१९४५**

| | |
|---|---|
| ०४ जानेवारी | वापसई सभा यशस्वी केली. पण माराच्या भीतीने पळ काढला. रात्री रायत्माला मुक्काम. |
| ०७ जानेवारी | टिटवाळा येथे म. प्र. किसान सभेचं अधिवेशन भरले. |

०८ जानेवारी — कॉ. बी. टी. आर. नी माझे पार्टी कॉम्रेड्सच्या मीटिंगमध्ये केलेले अभिनंदन. पोलिट ब्युरोच्या सभासदाने इतक्या उत्साहाने केलेल्या स्वगतामुळे मला खूप आनंद झाल्यास. नवल काय?

२६ जानेवारी — आसार मैदान. कॉ. बंकिम मुखर्जी यांच्या सभेत थोडासा कार्यक्रम बंकीम मुखर्जी किती छान बोलले. मला पण तसे बोलायला आले पाहिजे. नंतर रात्री २ पर्यंत बंगाल दुष्काळ यावर रिपोर्टिंग

१८ मार्च — कवी प्रथम चांगला माणूस असतो. नंतर जीवनविषयक तत्त्ववेत्ता व नंतर कवी असतो.

१९ एप्रिल — ऑर्डिनरी माणूस पार्टीकडे कधीच येऊ शकत नाही.

२३ एप्रिल — 'रामेश्वर मंदिर' कार्यक्रम. अपेक्षेपेक्षा चांगला कार्यक्रम झाला. पण पुरा होण्याअगोदरच पोलिसांकडून बंद करण्यात आला. लोकमत प्रक्षुब्ध.

२५ एप्रिल — मळगावहून कणकवलीस परत. किती निसर्गाची रेलचेल आहे. या सबंध कोकणात! या दृष्टीने लोकांचं जीवन म्हणजे काय असायला हवे होते. आहे काय? ''निसर्गसान्निध्यात मानवी जीवनाची वाढ... कलेची वाढ...'' सगळा शाब्दिक डोलारा आहे झालं.

२६ एप्रिल — कणकवलीच्या शेजारच्या खेड्यातून प्रचारार्थ भटकलो.

०४ मे — आम्ही बर्लिन जिंकले! जिंदाबाद कॉ. स्टॅलिन! जिंदाबाद लाल फौज! 'योग्य तेच तिने केले. अन् झाले तेच योग्य.' अंबरनाथ, भुसावळ, कोकण, निपाणी, कोल्हापूर इत्यादी जवळजवळ सर्व महाराष्ट्रात कार्यक्रम.

११ जून — ''शेख, बायकांनी चोळ्या घालू नयेत यावर

| | |
|---|---|
| | पोवाडा करा ना. एक!'' वडारगल्लीची मागणी! |
| १४ जून | व्हाईसराय वेव्हेल घोषणा. |
| १५ जून | हिंदी पुढाऱ्यांची सुटका |
| १९ जून | पं. नेहरूंचे हुतात्मास्मरण. अरुणा असफअलींचा गौरव |
| ०४ जुलै | स्टडीसर्कल (कल्चरल स्क्वाड) सुरुवात ८-९ लोक हजर- भाषण |
| १२ जुलै | स्वीकारलेले कुठलेही लहानसे कार्यदेखील मनापासून करणे हा मुळी माझा मनोधर्म आहे. |
| १८ जुलै | सिमला पोवाडा तयार. तुमच्या पार्टीकॉम्रेड्समध्ये आर्टची चांगली जोपासना केली जाते. |
| १९ जुलै | अमळनेरच्या कॉम्रेड्सनी केवढी काळजी घेतली माझी! इतक्या जिव्हाळ्याची न् कर्तव्यतत्पर माणसं जी पार्टी तयार करते ती सोडून मरावं अशी कुणाला इच्छा तरी होईल काय? |
| ०९ ऑगस्ट | रशियाने जपानविरुद्ध युद्धात प्रवेश केला. मला माझा आवाज, माझी कला व माझा बुद्धिवाद यांना जपले पाहिजे. त्यांची वाढ केली पाहिजे. |
| १३ ऑक्टोबर | माझ्या कलेची कसोटी समोर बसलेली जनता हीच आहे. मी दुसरी कुठलीही कसोटी जाणत नाही. तिचा निर्णय हा अखेरचा निर्णय. बस्स. |
| १४ ऑक्टोबर | माणूस कवी होऊ नये. कवी झाला की, त्याचे विचारचक्र हे अत्यंत मोठ्या न् व्यापक प्रमाणात सुरू होते न् बऱ्याच वेळा सध्याच्या समाज-परिस्थितीत तरी निराश मनःस्थितीत राहावे लागते माणसाला. कवीला या मनःस्थितीवर विजय मिळवणे फार कठीण जाते. |
| १५ ऑक्टोबर | - संयुक्त प्रांत-मुस्लीम लीगचा ठराव. सर्व जमीन शेतकऱ्यांच्या मालकीची झाली पाहिजे.<br>- कम्युनिस्ट पार्टीची मुख्य घोषणा. |

- शेतकऱ्यांना पुरेशी जमीन.
- बेकारीवर ताबडतोब उपाययोजना
- अस्पृश्यांना राज्यकारभारात समान दर्जा द्या.
- सार्वत्रिक मताधिकार
- नफेबाजांची संपत्ती जप्त करा.
- स्वयंनिर्णय, एकजूट.

| | |
|---|---|
| २२ ऑक्टोबर | मुंबई मुक्काम, प्रॅक्टिसला सुरुवात. यथातथाच. लोक जमले नाहीत. हजर- साठे, गव्हाणकर, मधू, बापू. |
| १४ नोव्हेंबर | कॉ. सनाअल्ला व कॉ. वत्सला यांच्यावर निपाणीत गुंडांनी भ्याड हल्ला केला? |
| २७ डिसेंबर | कोपरगाव येथे सभा उधळण्याचा प्रयत्न (काँग्रेस गुंडांचा) हाणून पाडला. |
| २८ डिसेंबर | वांबोरी इथे कार्यक्रम. ग्रँड सक्सेस प्रोग्रॅम. पाच-सहा हजार लोक |
| २९ डिसेंबर | वांबोरी ते चांदा बैलगाडी प्रवास |

**१९४६**

| | |
|---|---|
| ०२ जानेवारी | ‘‘असं वाटलं, येवढ्या मानसांत उठावं अन् याचा मुका घ्यावा. गुनाचा बाळ. आता मेलो तरी सुटनार न्हायी ह्यो लाल बावटा.’’ एका केळीविक्यानं माझेवरून असं म्हणून बोटं मोडली. आणखी कुठले सुख जगात आहे? |
| १० जानेवारी | उभादांडा-कार्यक्रम सुंदर. हजर लोक १५०० |
| ११ जानेवारी | शिरोडा-पंचक्रोशी शेतकरी परिषद यशस्वी कार्यक्रम |
| १३ जानेवारी | कोचरे, ता. वेंगुर्ला येथे कार्यक्रम. ७०-७५ गुंडांवर विजय मिळवला. |
| १७ जानेवारी | कायडवीचा यशस्वी कार्यक्रम ३००० लोक. ग्वालियर हत्याकांड. बिर्लांची देशभक्ती. पाथेर, |

| | |
|---|---|
| | नगर, पुणे, कोल्हापूर, सोलापूर लष्कर येथे यशस्वी सुंदर कार्यक्रम केल्याची नोंद. |
| २५ जानेवारी | काल काँग्रेस गुंडांनी पार्टी हेडक्वार्टरवर हल्ला केला. ४० कम्युनिस्ट जखमी.<br>२५ लाखांचे नुकसान मुंबईस गोळीबार.<br>वारद चाळ कार्यक्रम छान २५०० लोक. कार्यक्रमावर दगडफेक. |
| २८ जानेवारी | बुधवार पेठ कार्यक्रम बरा. कार्यक्रम उधळण्याचा अयशस्वी असा गुंडांचा प्रयत्न. |
| २२ फेब्रुवारी | खलाशांचे बंड. सबंध मुंबईत उठाव. |
| २३ फेब्रुवारी | उठावाचे उग्र स्वरूप कॉ. कमल दोंदे गोळीबारात बळी. कॉ. कुसुम अत्यवस्थ. |
| २१ मार्च | लालबाग प्रोग्रॅमवर दगड, सोडावॉटरच्या बाटल्या फेकल्या, पण प्रोग्रॅम व्यवस्थितपणे पार पडला. |
| २३ मार्च | डिलाइल रोड प्रोग्रॅम. दगड-काचा. पण प्रोग्रॅम यशस्वी. |

**१९४७**

| | |
|---|---|
| ०१ जानेवारी | धुळ्यात माझा एकट्याचा कार्यक्रम. १२,००० ते १५,००० लोक हजर. कार्यक्रम सुंदर! |
| ०३ जानेवारी | धुळे. प्रेक्षक २५-३० हजार. प्रोग्रॅम सुंदर! |
| ०५ जानेवारी | कापडणे, प्रेक्षक ३-४ हजार. प्रोग्रॅम बरा कसचा, वाईटच झाला. |
| १५ जानेवारी | ‘‘बाबा गाताना असा दिसतो जसा आता यो गातागाताच कुण्या दुस्मनाचं नरडं फोडनार.’’<br>- एक म्हातारी कामगार बाई, धुळे. आणखीन कसले सर्टिफिकेट हवे मला? |
| १८ जानेवारी | ‘‘अमर शेखनं गाताना बाही सारली की बस्स. आपुनबी उठावं असं वाटतं.’’ |
| २३ फेब्रुवारी | सकाळी इष्टा व पुरोगामी लेखकसंघ यांच्यापुढे कार्यक्रम |

| | |
|---|---|
| | ''आमची भाषा मराठी नसली तरी तुम्ही गाताना तुमचे सगळे गाणे कळले आम्हाला.'' |
| १० एप्रिल | गणेशपेठ, हुल्या मारुती चौक. कार्यक्रम सुंदर आमच्या कार्यक्रमापासून २-३ मिनिटांच्या अंतरावर राष्ट्रीय तमाशाचा कार्यक्रम होता. त्याच्या कार्यक्रमाला प्रथम पाचशे लोक होते. नंतर राहता राहता दोनशेच लोक राहिले, की ज्यात ५०-६० व्हॉलिंटियर होते त्यांचे! पण आमच्या कार्यक्रमाला मात्र १५,००० लोक हजर होते. |
| २४ मे | फर्ग्युसन रोड कार्यक्रम. छान झाला. लोक ८०००! कार्यक्रम चालू असताना दगड फेकले पण कामगार चिडून जागचे हालले नाहीत. |
| २५ मे | कामगार मैदान. आज युनियनची वार्षिक निवडणूक झाली. कॉ. डांगेंच्या निवडणुकीची आठवण झाली. रात्रीच्या आमच्या कार्यक्रमाला तर २५,००० लोक हजर होते. कार्यक्रम सुंदर झाला. |
| २६ मे | रजिस्टर कचेरीत लग्नाला गेलो असता कॉ. कुसुमच्या बाबांनी हरकत दाखल केली व लग्न रहित झाले. |
| ०३ जून | फाळणी! फाळणी!! देशाची साम्राज्यवाद्यांनी चिरफाड केली. |
| १२ जून | ''वह उंचासा, शेर के जैसे गाता, वही ना?'' कॉ. करीम धुळेच्या आईने मला ओळखताना केलेला शब्दप्रयोग; माझ्या दृष्टीनं हे अमोल सर्टिफिकेट आहे हाच माझा ठेवा. |
| १० जुलै | कॉ. कुसुमने (ज्योतीने) माझ्या जीवनात कायदेशीर प्रवेश मिळविला. |
| १५ ऑगस्ट | चौपाटी-राष्ट्रगीत म्हटले. शिवाजी पार्क, कामगार |

मैदान, लोक ३० हजार.
स्वातंत्र्यदिन साजरा करणारी जनता मी पाहिली.

०७ सप्टेंबर — अमरावती. हाऊसफुल्ल थिएटरमध्ये कार्यक्रम. वीर वामनराव जोशी - अध्यक्ष-बोलले, ''तुम्हाला अपयश नाही, हेच हवे जनतेला, अमर शेख अभिनयात माझे गुरू शोभतील! इतकी उत्कृष्ट कला यांच्याकडे आहे. अशी हजारो पथके काढा. पुढाऱ्यांना क्रांती करायला जर एक वर्ष लागणार असेल तर हे लोक एक महिन्यात क्रांती करून दाखवतील. माझा तुम्हास हार्दिक आशीर्वाद आहे!''

२३ ऑक्टोबर — ''ॲक्शन गैरवाजवी होते. पण मला वाटतं, त्याशिवाय लोक हसणार नाहीत. बरं म्हणणार नाहीत. म्हणून तुम्ही इतकी ओव्हर ॲक्शन करीत असाल.''
''तुमचा कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत संकुचित आहे. म्हणूनच तुमच्या कलेला समाजात किंमत उरली नाही. सर्वसाधारण माणसाच्या हालचालीपासून, भावतरंगापासून तुम्ही लाखो कोस दूर आहात हाच तुमच्या भाषणाचा निष्कर्ष.''- अमर.

**१९४८**

०४ जानेवारी — कला सर्वसाधारण माणसाच्या लुप्त झालेल्या भावनांना जागृती आणते, पुलकित करते, हेलावून सोडते आणि मग त्याच्या स्वतःतच ठाण मांडून त्याला माणसाच्या चाकोरीत आणून सोडते.

३० जानेवारी — महात्मा गांधींचा खून झाला.

३१ जानेवारी — सबंध देशभर कुंद वातावरण

०१ फेब्रुवारी — देशभर प्रतिगाम्यांवर प्रक्षुब्ध जनतेने प्रचंड हल्ले चढविले.

| | |
|---|---|
| २४ फेब्रुवारी | आला दिवस दोन गोष्टी घेऊन येतोच. एक जय, दुसरा पराजय. तो दिवस विचारतो की, बोल तुला काय हवंय- जय का पराजय आणि कुठल्याही परिस्थितीत एक स्थिती पत्करावीच लागते. मग तुम्ही कुणीही असा. |
| ०१ एप्रिल | पार्टीवरील सरकारच्या हल्ल्याला मुंबईत सुरुवात |
| ०३ एप्रिल | आज ठाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी पोलिसांनी नोटीस बजावली. गायलो नाही. |
| १६ एप्रिल | दुपारी ३.५१ला प्रेरणेचा जन्म झाला. |
| १८ ऑक्टोबर | आज तर आमच्या कार्यक्रमानेच संयुक्त महाराष्ट्र परिषद गाजली.<br>- अण्णा भाऊंच्या पोवाडा, तमाशाने सबंध जनसागर हेलावला. हजर लोक ८०,००० |
| २० ऑक्टोबर | माझ्यासकट कॉ. गव्हाणकरवर भरलेल्या मे-दिन कार्यक्रम खटल्याचा निकाल लागून निर्दोष सुटलो. |

**१९४९**

| | |
|---|---|
| ०५ मे | स्त्रियांचा सेक्रेटरिएटवर मोर्चा - राजबंद्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी पोलिसांचा या मोर्चावर हल्ला. कॉ. ज्योती अमर शेख जखमी. |
| ०८ मे | लालबाग मैदानावर राजबंद्यांना पाठिंबा देण्यासाठी मोठी सभा झाली. तिथून लोकांनी मिरवणुकीने डिलाईल रोडवर जाण्याचे ठरवले. मिरवणूक चालली असता तीवर गोळीबार करण्यात आला. |
| १२ मे | कॉ. भिकू यास परवाच्या मिरवणुकीवर झालेल्या गोळीबारात गोळी लागली. तो आज वारला. |
| १३ मे | कॉ. भिकूच्या प्रेतयात्रेबरोबर जात असताना अटक * फारशा नोंदी नाहीत. |
| | ठिकठिकाणी कार्यक्रम. नवे साथीदार, नव्या |

ओळखी - कृष्णचंद्र, बलराज सहानी, प्रेमधवन यांच्याबद्दल तुरळक नोंदी, भेटीगाठीसंबंधी.

**१९५२**

इप्टाच्या ग्रुपमध्ये

०१ जानेवारी — इलेक्शन-प्रचाराला ७ नोव्हेंबरपासून सुरुवात आणि त्यात कलाक्षेत्रातही माझी जबाबदारी मी शंभर टक्के पार पाडली. दोन नवीन गीते केली. ती परिणामी ठरली. पार्टीने प्रचारासाठी लॉरी दिली. मुंबईत नाक्यानाक्यावर ती गाऊन लोकांत खूपच प्रचार केला.

०८ मार्च — कॉ. तिखानोव, कॉ. रशीद प्रभृती रशियाकडून आलेल्या कल्चरल डेलिगेशनसह एलिफंटाच्या सफरीवर गेलो. सोबत शैला होती.

१० मार्च — नवयुग कलापथकाच्या तालमीला सुरुवात.

१९ मार्च — मी जन्मानं मुसलमान म्हणून घरातले (केशवच्या) वातावरण खूपच तापले होते. आईंना मी घरात नको होतो. म्हणून बिछाना ऑफिसात टाकला.

२० मार्च — वारशिया निर्वासित कँपमध्ये निर्वासितांतर्फे स्वागत. ७०० लोक हजर होते. बरा झाला कार्यक्रम. काय आश्चर्य! जादूच्या कांडीप्रमाणे केशवच्या घरच्या माणसांत बदल झाला! अगदी कुठे ठेवू न कुठे नको असं आईंना झालं. आश्चर्य नाही तर काय?

२५ मार्च — परवाच्या दिवशी जो कार्यक्रम झाला त्याचं चित्र माझ्या डोळ्यापुढे उभं आहे. श्री. रवीशंकर रावळ हे गुर्जरभूमीचे कलामहर्षी. कार्यक्रम सुरू होणार होता. त्यांना स्टेजवर बसायला लोकांनी आग्रह केला. पण ते म्हणाले, ''मला अमर शेखांना पुढून पाहायचंय.'' ते पुढे बसले. कार्यक्रम अत्यंत

यशस्वी झाला. गुजराथी, मराठी, पंजाबी, हर भाषा बोलणारा समाज, पण टाचणीचा आवाज यावा. अगदी विचित्र मनःस्थितीत लोक कार्यक्रम संपवून उठले. श्री. रविशंकर हे वयस्कर असे ज्येष्ठ कलावंत उठले, त्यांनी कडकडून मिठी मारली. न् अगदी गदगदून म्हणाले, ''अमर, तुम्ही मरू नका. कधीसुद्धा!''

३० मार्च — पाच वाजता संध्याकाळी कलकत्त्यास जाण्यासाठी गाडीने निघालो. बरोबर अण्णा साठे, गव्हाणकर, मनू, राणे, शैला गणपत.

०१ एप्रिल — कलकत्त्यास पोहचलो. कलकत्त्यास सांस्कृतिक परिषद. शांततेसाठी. इप्टातर्फे होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेतला. आमचा रोज कार्यक्रम ठेवण्यात येत असे. तो लोकांना खूप आवडे. रोज ८००० लोक हजर असत.

०२ एप्रिल — परिषदाच्या मंडपाला आग लावण्यात आली. ती विझवण्यात आली. शेवटी परिस्थिती स्थिर करण्याच्या दृष्टीने मला स्टेजवर उभे करण्यात आले. त्यात 'नया तराना' गाण्याने एक नवीन विक्रम केला.

०१ मे — मुंबईला मे दिनाचा कार्यक्रम मैदानावर झाला. हजर लोक ९०,०००. कार्यक्रम छान. कार्यक्रम औरंगाबाद, शिंदी, परळी वैजनाथ, मोमीनाबाद. मुकुंदराय-मराठीचे आद्य-कवी यांच्या समाधीचे दर्शनार्थ.

२७ मे — हादगाव मुक्कामी जाण्यासाठी १ वाजता निघालो. नांदेडपासून १० मैलांवर अर्धापूर येथे कार बंद पडली. मालट्रकने हादगावी गेलो. उन्हाचा, पाण्याचा फार त्रास झाला. रात्री जेवणाचा त्रास झाला. अगदी थकून चूर होऊन अंथरुणावर

पडलो. नीट झोप पण लागू शकली नाही.

२७ ऑगस्ट — ७ वाजताच पाटण्यास पोहोचलो.

३१ ऑगस्ट — सकाळी १० वाजताच्या गाडीने सियालदाहून नैहत्तीस कॉ. पूर्णेंदूबरोबर पोहचलो. नैहत्तीस बंगाल प्रांतिक लोकनाट्याचे अधिवेशन सुरू होते. तेथे महाराष्ट्रातर्फे अभिवादन सादर करून एक गीत म्हटले : 'जननी जन्मभूमी'. लोक माझे गीत ऐकून दिङ्मूढ झाले. कारण गाताना माझ्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू.

तीनच्या गाडीने निघालो. कलकत्त्यास. मैदानात (मोनुमेंट) कमिटीतर्फे मीटिंग होती. मीटिंगमध्ये दहा-पंधरा हजार लोक होते. जोराचा पाऊस आला. अध्यक्षांनी मला गायला बोलावले. अत्यंत जोराच्या पावसात व खालून वाहणाऱ्या पाण्यात तरुण-तरुणी, म्हातारेकोतारे माझे गाणे संपेपर्यंत बसून होते. मला धन्य वाटल्यास नवल काय? रात्री नैहत्तीस येऊन दोन गाणी दिली. लोक आश्चर्यचकित झाले. बोलले, ''अमर तुम्ही गाणे मनापासून रडता तसे गाणे मनापासून लढताही.'' कलकत्ता-देवनाथदास आय. एस. एन. एच. मिनिस्टर म्हणाले, ''तुम्ही माणसांना पागल केले.''

०२ सप्टेंबर — ढोल अथवा तबला यांपैकी रिदमसाठी काही नव्हते. गाणी वाईट झाली पण लोकांवर त्यांचा चांगलाच परिणाम झाला. बंगालचा एक उत्तम गायक कॉ. सनतकुमार परवाच्या रात्री कार्यक्रमाच्या शेवटी पडदा पडतापडता स्टेजवर आला न् गळ्यात पडून अगदी ओक्साबोक्सी रडू लागला. गाणे अत्यंत आवडल्यामुळे त्याच्याकडून असे झाले.

| | |
|---|---|
| ०६ सप्टेंबर | रात्री ७.३०ला गुलमोडी त्यात कामगाराची मीटिंग ३,००० कामगार हजर होते. कॉ. हजारासिंग महम्मद शफी, जतीन चक्रवर्ती आदी स्थानिक हुतात्म्यांसाठी 'शहिदो ले लो मेरा सलाम' गीत म्हटले. 'लानत है सरमाया दारी', 'अपना झंडा न नीचे झुकाना', 'नया तराना' गाणी म्हटली. फार छान झाली. ''ये आदमी आओ आओ कहता है, उस वक्त स्टेजपर जाने के लिए दिल कहता है! एक शीख प्रेक्षक म्हणाला. दुसरा म्हणाला तो जादूगार आहे!'' |
| ०७ सप्टेंबर | टेल्कोच्या कामगारांनी अजून राहण्यासाठी अडविले. मी त्याची समजूत घातली. पण ते ऐकायला तयार नव्हते. ते नाखूष झाले. ''अमर शेखचा कार्यक्रम संपल्यावर तो सांगेल ते - अगदी जगाला आग लावायचे- काम जरी त्यांनी सांगितले तरी करावेसे वाटेल.'' |
| ०८ सप्टेंबर | '' 'हाय जननी' हे गीत म्हणत असताना काय तुम्ही डोळ्यात ग्लिसरीन घातले होते?''<br>''तुम्ही डोळ्यांतून वाहणारे अश्रू, कधी बघितले? स्टेजवर येताना पाहिले?''<br>''नाही. पहिल्या गीताच्या वेळी तर तुम्ही हसत होता. दुसऱ्या गीताच्या वेळी मध्याला अश्रू आले.''<br>''मग ग्लिसरीन कसे घातले असेल? अर्थाबरहुकूम अश्रू आले होते.''<br>''माझा जन्म खातेऱ्यात झाला. मी माझं जीवन गातो. फक्त एवढंच.'' |
| १५ सप्टेंबर | १०-३० 'स्पार्क' (इंग्रजी) व 'प्रकाश' (हिंदी) या साप्ताहिकांचे प्रतिनिधी मुलाखतीस येणार. ते आले, मुलाखत दिली २ तास. |

१७ सप्टेंबर — आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा दिवस. बिहार शरिफपासून नालंदा प्राचीन युनिव्हर्सिटी सात मैल. नालंदाचे ते प्राचीन वैभव. त्याचे स्मृतिअवशेष पाहून मन भरून आले. बरोबर ५ स्क्वाड कॉम्रेडबरोबर गेलो. सारं पाहत असताना नुसता मंतरलेल्या माणसाप्रमाणेच वागलो. म्युझियमसुद्धा तसेच पाहिले. त्याच मूडमध्ये. नंतर नालंदा हायस्कूलमध्ये २०० मुलांसमोर सुंदर कार्यक्रम झाला. मुलांनी फार छान स्वागत केले.

२० सप्टेंबर — पटना हॉल प्रोग्रॅम (लेडी स्टिफन्सन) हॉल भरला होता. शंभू भट्टाचारीच्या ग्रुपबरोबर प्रोग्रॅम दिला. फार सुंदर झाला. काही उच्च सरकारी अधिकारी हजर होते. परिणाम छानच झाला. अनेक प्रकारच्या पण उत्तेजनपर प्रतिक्रिया मिळाल्या. ‘‘अमर शेखचे गाणे तलवारीच्या घावासरशी शीर धडावेगळे करणारे आहे. कलेतून प्रचार होऊ नये म्हणणाऱ्यांना ही सणसणीत थप्पड असून उच्च प्रतीची कला ही जीवनाला एक सुंदर कोंदण्यात बसवू शकते.’’

‘‘पॉल रॉबिनसन्च्या कलेच्या तितकाच उच्च प्रतीचा दुसरा आविष्कार मला पाह्यला मिळाला.’’

- डॉ. सेन. जॉन कॉलेजमध्ये कार्यक्रम. १००० लोक हजर होते. काही आर. एस. एस.च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला मोडता घालण्याचा प्रयत्न केला. तो सफल झाला नाही. माईक बंद पडला. तेव्हा विरोधकांना थोडे अवसान मिळाले. त्यांनी थोडी गडबड केली.

०९ ऑक्टोबर — काल कॉलेज हॉलमध्ये (सेंट जॉन) गोंधळ करणाऱ्या विरोधकांनी राजेंद्रकडे माफी मागितली.

| | |
|---|---|
| १९ ऑक्टोबर | ज्योच्या घरून (बाबाकडून) आज पहिल्यांदा जेवायचे आमंत्रण आलं. अर्थात ते स्वीकारून मी गेलो. आनंद झाला. |

**१९५३**

| | |
|---|---|
| १६ मार्च | प्रेरणेच्या पाठीवर बेबीचा जन्म झाला. सकाळी ८.५०ला बी. डी. डी. चाळ, वरळी येथे. |
| २२ मार्च | प्रेरणेच्या पाठीवर जन्मलेल्या बेबीने या जगाचा त्याग केला. |
| २९ जून | संगीत कलावंत जे भारतातून चीनमध्ये जाणार होते, त्यांचासह चीनमध्ये जाण्यासाठी पासपोर्ट मिळावा म्हणून मुंबई सरकारकडे अर्ज केला. |
| ०९ जुलै | चीनमध्ये जाण्यासाठी लागणाऱ्या पासपोर्टला सरकारकडून नकार. |

**१९५४**

| | |
|---|---|
| ०१ जानेवारी | चिनी सांस्कृतिक शिष्टमंडळ मुंबईस आले. श्री. के. ए. अब्बासनी डिनर पार्टी दिली. त्याच्या घरी. त्या पार्टीत भाग घेतला न् काम करून गाणे म्हटले. सुंदर झाले. |
| ०३ जानेवारी | बलराज सहानींकडे जेवायला गेलो होतो. श्री. यशपाल आले होते. हिंदी-उर्दू भाषेवर चर्चा झाली. सुंदर. रात्री परतलो दिवसभर घरी राहून. |
| ३१ जानेवारी | ‘महात्मा फुले’ चित्रपटाचा मुहूर्त झाला. |
| १४ मे | लग्न झालं. न् माझ्या जीवनातलं एक प्रकरण संपलं! हे लग्न व्हावं म्हणून धडपड केली मी. मी- तिच्या एकेकाळच्या प्रियकरांनं. माझ्या दृष्टीने ही अभिमानाची गोष्ट. माझे जीवनातले मोठे प्रकरण इथेच संपावे. ही माझी इच्छा आहे. पाहू या. |
| १० सप्टेंबर | श्रीरामपूर सुंदर कार्यक्रम. तुकडोजी महाराज |

| | |
|---|---|
| | दोन फर्लांगावर त्यावेळी. अटीतटीचा सामना. त्यांना कार्यक्रम १२चे आत आटपावा लागला! आम्ही ३ वाजता आटपला. बिहार फडाला २००/- रु. मदत. हजर लोक होते. २० ते २५ हजार. |
| २७ सप्टेंबर | वडिलांची भेट. अनेक वर्षांनंतर. वडिलांना खूप दुःख झाले. आनंदले पण सौ. ज्यो त्यांना आवडली. आज आम्ही पुणे सोडले. |
| १२ ऑक्टोबर | आसामकडे जाण्यासाठी निघालो. |
| १४ ऑक्टोबर | कलकत्ता इप्टातर्फे सत्कार. |
| १६ ऑक्टोबर | विमानमार्गे जोरहाटकडे |
| २४ डिसेंबर | पहिला चित्रपट- मी काम केलेला - ‘महात्मा फुले’ रिलिज झाला. |

**१९५५**

| | |
|---|---|
| ०७ जानेवारी | आंध्र प्रांत निवडणूक-दौऱ्यासाठी लक्ष्मण साठेसह मुंबई सोडली. संपूर्ण आंध्र गाजवला. ठिकठिकाणी कार्यक्रम. नंतर हैदराबाद. |
| १४ फेब्रुवारी | वडील पुण्यास जाणाऱ्या गाडीत बसले व मी गोहत्तीकडे जाण्यास बसलो. आसाम प्रांतिक परिषद आटपून शिलाँगकडे. हॅपीहिल, बिशप कॅम्प, चेरापुंजी, खूप मित्रमंडळी. आसाम सोडताना दुःख जाणवले. |
| १२ एप्रिल | गयाकडे निघालो. |
| १७ एप्रिल | गांधी मैदानात पुन्हा कार्यक्रम. लोक हजर होते सोळा हजार. कार्यक्रम सुंदर झाला. बुद्धगयेस जाऊन आलो. मुझफ्फरपूर, छपरा, बेतिहा, हाजीपूर- यशस्वी प्रोग्रॅम. उज्जैन, इंदूर, मुंबईत गोवा विमोचन फंडासाठी प्रभात फेरी, सायंफेरी. |
| ३१ ऑक्टोबर | सकाळी ८.४५च्या सुमारास मुलाचा जन्म |
| १० नोव्हेंबर | लोकहितवादी मंडळातर्फे कार्यक्रम. सुंदर झाला. |

स्टेजवरून उतरलो तोच माझा आनंद मला सोडून गेल्याची, माझ्या नव्या बाळाने इहलोकाची यात्रा संपवल्याची तार मिळाली. आणि मग त्याच अंधारात मी नाशिकहून परतलो.

२१ नोव्हेंबर — प्रचंड संप. आमच्या भागातली सगळी जबाबदारी माझ्यावर होती. गोळीबार होऊन एक तरुण बळी पडला व एका बसची चौक जाळण्यात आली. संध्याकाळी चौपाटी सभा. हजर लोक तीन लाखांच्या वर. गाणी म्हटली, 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणत होतो. व सगळी सभा कोरस म्हणून साथ देत होती. हे अपूर्व होते.

२१ डिसेंबर — सकाळी पठाणकोट एक्सप्रेसने दिल्लीस निघालो. 'महात्मा फुले' या चित्रपटाचे रौप्यपदक श्री. अत्रे यांना राष्ट्रपती देणार होते. त्याच्या समारंभासाठी. फिजिकल लॅबोरेटरी हॉल. दिल्लीमध्ये चित्रपट विजेत्यांचा राष्ट्रपतींकडून सत्कार. पंडित जवाहरलाल नेहरू व राजेंद्रबाबूही होते.

**१९५६**

१६ जानेवारी — पहाटेच पुढाऱ्यांची धरपकड झाली. म्हणून अर्धी मुंबई बंद. कामगार मैदानावर निषेध-सभा मी गाणी म्हटली. हजर लोक २५०००. नंतर युवक सभेत शिवाजी पार्कच्या सभेला मी गेलो. श्री. न. वि. गाडगीळ यांचे भाषण श्रोत्यांनी बंद पाडले. मी 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणण्यासाठी पुढे गेलो. समोरचा तीन लाखांचा जमाव हा माझा कोरस झाला. गाणे संपताच मी विनंती केली.

''संयुक्त महाराष्ट्रवादी कुणीही असो, त्यांची जो

सभा मोडेल तो मराठी रक्ताचा नाही.'' लोकांनी मान दिला. माझ्या आयुष्यातला महान दिवस.

२० जानेवारी — आज लुटालुटीला सुमार नव्हता. माझ्या भागातही लूट व गोळीबार सुरू झाला. मी प्रथम टॅक्सी घेऊन शांततेचा प्रचार करत बी.सी.वर व तिथून शिवाजी पार्क, नंतर लालबागकडे निघालो, डॉ. एम. जी. देसाई यांची प्रचार गाडी दिसली व त्यातून मी लाऊडस्पीकरवरून प्रचाराला सुरुवात केली. भायखळ्याला नुकताच गोळीबार झाला होता. जेकब सर्कलातही गोळीबार चालू. तो थांबवून लोकांना शांततेसाठी आवाहन केले. पकडले गेलेले लोक सोडवले.

२१ जानेवारी — रात्रीपासून मला गोळी लागल्याची बातमी माझ्या भागात पसरली. आजही हरताळ चालू होता. पण लुटालुटीला एकदम आळा बसला होता.

०७ जुलै — आज जेकब सर्कलला स्त्रियांनी सत्याग्रह केला व त्याचं नेतृत्व माँनं केलं. माँनं सत्याग्रह केला, एक नवीन पायंडा घालून दिला. धन्यता वाटली मला.

२४ जुलै — दिल्ली. सत्याग्रहासाठी निघालो. अंगात ताप होताच.

२७ जुलै — माझे सगळे सत्याग्रही माझे (गायक) कलावंत, साथीदार झाले व आम्ही गात गातच दिल्ली पार्लमेंटवर गेलो. माझी गाणी दिल्लीकरांना अभूतपूर्व आकर्षण ठरली. तेवढ्यासाठी मला सर्वात शेवटी सत्याग्रह करावा लागला. संध्याकाळी साडेपाच वाजता माझ्या तुकडीला अटक झाली. जेलवर सुटका झाल्याचे कळले व तिथेच सरकारी मायक्रोफोनवरून साथी दंडवते यांनी माझे आजच्या कार्याबद्दल अभिनंदन केले व

| | |
|---|---|
| | दिल्लीत तीन दिवस राहण्यासाठी आग्रह. आजच्या कार्याने मला खरेच मनोमन धन्यता वाटली. |
| २९ जुलै | सगळ्या गावातून आम्ही गातच हिंडलो. |
| २० ऑगस्ट | अमरावतीकडे निवडणूक-प्रचारार्थ निघालो. |
| २३ ऑगस्ट | सोलापूर येथे बिनमाईकचा कार्यक्रम. आठ हजार शेतकरी, नंतर रात्री परत निघालो, तो मोटार पंक्चर झाली. पहाटेपर्यंत आडरानात पडून होतो. |
| २७ ऑगस्ट | निवडणुकीत प्रचंड अपयश घेऊन परतलो. प्रचंड मेहनत केली. या निवडणुकीत पण शेवटी अपयश आलेच. चला हेही दिवस जातील. |
| १४ सप्टेंबर | हिंगणघाट. अत्यंत सुंदर कार्यक्रम, माझ्या जीवन इतिहासातील महत्त्वाचा विजयी दिवस. काँग्रेसच्या लोकांनी मला विरोध करण्यासाठी एक वेश्या शंभर-दीडशे फुटांवरच आणून नाचवायला सुरुवात केली. माईकवरून अचकटविचकट शिव्या द्यायला सुरुवात केली. मी माझा कार्यक्रम चालूच ठेवला. माझ्यापुढे पंधरा हजार लोक होते. शेवटी माझा कार्यक्रम दीड वाजता यशस्वीपणे संपला. मी म्हणालो, ''मी जर महाराष्ट्राची परंपरा सोडली असेल, तर मी एकही शब्द उणाअधिक काढला असेल, तर हाताला लागेल तो धोंडा व चप्पल माझ्यावर भिरकवा. पण महाराष्ट्राच्या कलावंताकडून अश्लील व असभ्य वर्तन स्टेजवर घडू देऊ नका की, ज्यामुळे लोकांना व महाराष्ट्रीय संस्कृतीला काळिमा लागेल.'' झाले, लोक शांतपणे कार्यक्रम संपताच उठले व समोरच्या स्टेजकडे गेले. मला वाटलं माझी संस्कृती, परंपरा ऐकून घेऊन लोक पुन्हा वेश्येचा नाच बघायला गेले. पण एवढ्यात आरोळ्या कानावर आल्या त्यांच्या, ''रंडी का नाच बंद करो.'' शेवटी तो |

| | |
|---|---|
| | प्रोग्रॅम लोकांनी बंद पाडलाच. क्षणात धन्यता वाटली मनाला. |

**१९५७**

| | |
|---|---|
| | * या वर्षाची सुरुवात औरंगाबाद, वसई, जळगाव, अमरावती, नागपूर. सतत दौऱ्यावर. |
| २० फेब्रुवारी | वडणेर भैरव येथेच बुद्ध जमातीने भव्य मिरवणूक काढून सत्कार केला. एका जख्खड म्हातारीने ओवाळताना केलेली संयुक्त महाराष्ट्राची घोषणा अविस्मरणीयच आहे. |
| १२ मे | पिंपोडे - हा कार्यक्रम मोडण्यासाठी स्थानिक विरोधकांनी दीडशे रामोशी आणले होते. पण त्यांची छाती झाली नाही न् कार्यक्रम यशस्वी झाला. |
| | *नंतर काही विशेष नोंदी नाहीत. फक्त ठिकठिकाणी कार्यक्रम. |
| | * या वर्षाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे पैसे काही ठिकाणी लोकांनी बुडवले. |

**१९५९**

| | |
|---|---|
| | * नेहमीप्रमाणे ठिकठिकाणी कार्यक्रम. चेकोस्लावाकियाला जाण्याचे ठरले. |
| ०७ फेब्रुवारी | शैला-जयसिंगचे लग्न आपल्या हॉलमध्ये घडवून आणून कोल्हाटी जमातीच्या रूढींना धक्का दिला. |
| ०७ मे | चेकोस्लावाकियाकडे जाण्यासाठी विमानाने रात्री ११ वाजता मुंबई सोडली. |
| ०८ मे | सकाळी सूर्योदयाला दमास्कसला पोहचलो. तासभर थांबून त्याच विमानाने प्रागकडे निघालो. दुपारी ३च्या सुमारास प्रागमध्ये. घ्यायला लोक आले होतेच. |

| | |
|---|---|
| ०९ मे | आज सकाळी उठताच न्याहारी करून चेकोस्लावाक प्रजासत्ताक दिनाची परेड. लाखो लोक अतिशय शांत. 'चेक' जनतेची शांत जीवन जगण्याची उत्कटता पाहिली. त्यासाठी पुन्हा बलिदानाची तयारी पाहिली. संध्याकाळी वोटिंगसाठी सगळे प्रतिनिधी बाहेर पडले. गाणी म्हटली. सर्वांना आवडली. मला आग्रहाने खूप पाजले. |
| १० मे | पहिल्या चार्ल्सचा कैरस्टाईन किल्ला पाहिला तिथून नोवा रोबिनिया बीच पाह्यला गेलो. तिथेच हिरवळीवर लोकांपुढे नदीकाठी गाणी म्हणायला सुरुवात केली. सर्वांना आवडली. स्लॉप धरण पाहिले. |
| ११ मे | राजवाडा व जुन्या चर्चेसमधून असलेली सौंदर्यस्थळे पाहिली. म्युझियम पाहिले व अँबेसीला भेट दिली. |
| १२ मे | फिल्म स्टुडिओ पाहिला. टागोर-दिनानिमित्त अडीचशे-तीनशे लोक हजर होते. मी गाणी म्हटली. |
| १३ मे | आजपासून टी.यू.ची बैठक सुरू झाली. केवढी शिस्त ही. |
| १५ मे | प्राग रेडिओसाठी गाणी दिली. |
| १७ मे | रात्री क्लबमध्ये पार्टी झाली. मी सुंदर गाणी म्हटली... त्या सुंदर मुलीनं माझं चुंबन घेतलं. |
| १८ मे | आज गोखाल्डावला गेलो. कामगार संघटनेकडून स्वागत. |
| २६ मे | आज संध्याकाळी प्राग सोडले. इटली (रोम) मार्गे मुंबईकडे निघालो. |
| | * मंगळवेढे, बेळगाव, विजयनगर, खानापूर, बारामती, कोल्हापूर, निपाणी, नगर, मराठवाडा |

इत्यादी ठिकाणी कार्यक्रम.

* इंदूर, वालचंदनगर, जुन्नर, धुळे, खानदेश, सोलापूर, वर्धा, नाशिक इत्यादी ठिकाणी कार्यक्रम.

**१९६१**

| | |
|---|---|
| १७ जुलै | मोठ्या कष्टाने हेलसिंकीचा पासपोर्ट मिळाला. तो घेऊन पंजाब मेलने दिल्लीस निघालो. |
| २२ जुलै | पहाटे ६ वाजता अफगाण एअरलाईनने काबूलकडे रवाना. सोबत रोझा देशपांडे, हरी जाधव, विठ्ठल जाधव, शिवाजी दळवी सायंकाळी ताश्कंदला पोहचलो. मॉक्सीविरुद्ध ताश्कंद फुटबॉल मॅच पाहिली. पावणेनऊ वाजता ताश्कंदला सूर्य मावळला! |
| २३ जुलै | पायोनियर कॅँप- भेटीदाखल गेलो. मला गावे लागले. दुपारी ताश्कंद नागरिकांतर्फे स्वागत तिथेही मला गावे लागले. हेलसिकी-अझरबैजान. |
| २५ जुलै | आज मी बेभानपणे नाचलो. गायलो. प्रचंड स्वागत. वाळवंट संपेना. रात्री वोल्गा ओलांडली तो थंडावा सुरू झाला. |
| २८ जुलै | पहाटे तीन वाजता विस्वर्क स्टेशनवर धुंद खेळ खेळलो. नाच नाच नाचलो. 'मुका'घ्या, 'पळा' या खेळात भाग घेणे अपरिहार्य ठरले. सारी रात्र जागलो. चार मुलींचे मुके घेणे भाग पडले. आजची रात्र धुंदीची रात्र गेली- अगदी न पिता. |
| ३० जुलै | आमच्या येथील वास्तव्याला अर्थ नाही. काहीसुद्धा कॅँपफायरमध्ये भाग घेतला. |
| ०१ ऑगस्ट | 'तांपेरे', 'अन्नोन सोल्जर' ही नाटके पाहिली. टेक्निकली हायक्लास. |
| ०२ ऑगस्ट | रुमानियन डेलिगेट्सना भेटलो. |

| | |
|---|---|
| ०३ ऑगस्ट | हंगेरियन डेलिगेट्‌सना भेटलो. |
| ०४ ऑगस्ट | रशियन डेलिगेट्‌सना भेटलो. |
| ०५ ऑगस्ट | रात्री टेक्निकल स्कूलच्या थिएटरमध्ये नॅशनल प्रोग्रॅम झाला. अतिशय सुंदर सुरुवात माझ्या गाण्यांनी झाली व अखेर पण माझ्या गाण्यांनी झाली. |
| ०९ ऑगस्ट | मॉस्को नगरीत अभिनेत्याचं स्टेट अवॉर्ड मिळालं!! |

❖❖❖

# मी अमर बोलतोय...

**आई**

जगात आई हेच एकमेव सत्य आहे व बाप ही केवळ कल्पना आहे. जगात पैसे देऊन सर्व मिळतं पण आई मिळत नाही - आपल्या प्राणांचं मोल दिल तरीही! आणि म्हणून माझ्या दृष्टीनं जगातील सर्वश्रेष्ठ दैवत म्हणजे 'आई' हेच होय. मी मार्क्सवाद मानीत असलो तरी 'आई' हा सुद्धा केवळ एक मनुष्यप्राणी मी मानत नाही. तर ती मध्ये मला सत्याचा साक्षात्कार होतो. या जगातलं ते मी पहिलं सत्य मानतो.

*तूच दाविले विश्व मनोहर*
*हे परमेश्वर आई*
*तुझ्याविणा या जगी दुजा मज*
*गे परमेश्वर नाही*

आई म्हणजे प्राणिशास्त्राच्या दृष्टीनं प्राणीच असला तरी एक उदात्त असं मूलतत्त्व आहे.

**शाहीर**

जनमनसागरात सर्वभर संचारून नव्हे, तळाचाही ठाव घेऊन त्यात चाललेल्या भावनोद्रेकांचा आविष्कार आपल्या लेखणीच्या लालित्यपूर्ण ढंगाने, शब्दसामर्थ्याने व्यक्त करून अवघा जनमानस हेलावण्याचं कार्य करतो तोच शाहीर.

**जग**

या जगाला वगळून बोलण्यासारखं काय आहे? या जगाला वगळून विचारही करवत नाही अन् जेव्हा या सुंदर जगाकडे बघुन विचार करतो, तेव्हा विचार संपतो. मती कुंठित होते. मन या जगाच्या सौंदर्यात अडकून

बसतं. सौंदर्यानं मंत्रमुग्ध होतं. अन् ह्यानंतर वाटत फक्त एवढंच, की हेच पाहण्यासाठी सतत मिळावं, सतत जगावं, फिरत राहून पाहावं व पाहत पाहतच जगावं. बस्स.

**जीवन**

*जीवन आहे तुझे खरोखर*
*पाण्याचा बुडबुडा*
*फुटेल फटकन सुटेल चटकन*
*जीव तुझा बापुडा*

**आदर्श**

जसं मला कळायला लागलं तसा मी सतत एका गोष्टीसाठी कार्यरत राहिलो.

ती गोष्ट म्हणजे एक 'आदर्श' निर्माण करणं. अविरत धडपडत राहिलो. विचलीत झालो नाही. पण 'आदर्श' मात्र निर्माण होऊ शकलो नाही. जे होतं तेही दिवसेंदिवस खचत, नष्टप्राय होत असलेलं दिसतं आहे.

अंधारागत दिसतं आहे भोवती सारं, अशात घालतात मनाला. पण ते तरी कशासाठी? एक मन दुसऱ्या मनाला विचारतं... खरंच का?

**यश**

रंगमंचावर येताच माझ्यातील 'अमर शेख' मरून गेलेला असतो.

रंगमंचावर जो कोण असतो, तो फक्त समोरच्या प्रेक्षकांचा आत्मा माझ्या रूपानं वावरत असतो. आणि म्हणूनच माझी कलाकृती पाहताना प्रेक्षकाला वाटतं की, आपलीच स्वतःची जीवनकहाणी अमर शेखच्या रूपानं दिसत आहे. म्हणूनच तो तल्लीन होतो व स्वतःला विसरून जातो. हीच माझ्या यशाची गुरुकिल्ली म्हणता येईल.

**अखेर**

मी जगात एकदाच जन्माला आलो. आणि प्रत्येक जण एकदाच जन्माला येतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मरण आले तर ते लाखो लोकांपुढे

गाताना, तारसप्तकी स्वर लावताना यावे अशी इच्छा आहे. पण माणसांच्या सर्व इच्छा सफल होतातच असेही नाही. पण मी अभिमानाने म्हणेन; की, माझे जीवन मी अत्यंत यशस्वीरीत्या जगलो आणि जाताना पण त्या विजयाचा आनंद बरोबर घेऊन जात आहे. जग हे फार सुंदर आहे.

**माणूस**

मी लहानपणी गुरं सांभाळीत होतो. त्या वेळची माझी बुध्दी माझ्या आठवणीप्रमाणे काहीच नव्हे.

आज माझी बौद्धिक प्रगती निश्चित झाली आहे. पण तरीही चार माणसं सांभाळणं, त्यांची लहर, त्यांना वळवणं अगदी अशक्य, म्हणजेच माणूस गुरं वळवू शकतो, पण माणसांना वळवण, त्यांना माणूस म्हणून वळवणं अगदी अशक्य!

रविवार, १५ मे १९६६

**माझी कला**

माझी कला मी केवळ पोटार्थी आजपर्यंत राबविली नाही आणि यापुढेही राबवणार नाही.

**परमेश्वर**

मी परमेश्वर नावाच्या अगम्य शक्तीवर प्रेम केलं नाही. पण सश्रध्द माणूस परमेश्वरावर जेवढं प्रेम करीत नसेल तितकं, नव्हे त्यापेक्षा जास्त प्रेम मी सामान्य जनतेवर केलं. करीत आलो, करीत आहे... करीत राहणार. ही चूक का? समाजातल्या काही दुढ्ढाचार्यांना तीच माझी चूक वाटते. माझा नाईलाज आहे.

गुरुवार, १९ मे १९६६ मुंबई

**निसर्ग**

निसर्ग हा निसर्गतःच तारक आहे. उध्दारक आहे. पण तुम्हीच दुबळे असाल तर तो मारकच नव्हे तर संहारकही आहे.

वारा येताच झाडाची सर्वच पाने हलवून जातो. बिचाऱ्या फांदीला वाटतं, आपल्याला न विचारता पानं का हलावीत? अशी असते निसर्गाची लीला अगाध!

**व्यक्ती**

‘मला किंमत नाही’ असे माणसाने का म्हणावे हेच मला उमगत नाही. ती कृतिउक्तीने मिळवावी लागते. मागून मिळत नसते.

बुधवार, २७ जुलै १९६६

**अनुभव**

आजवरच्या अनुभवानं मला असं म्हणता येईल की, मी रंगमंचावर जाताच अर्धा कार्यक्रम जिंकला.

कलावंतानं प्रसन्नचित्त, उत्फुल्ल चेहऱ्यानं, आकर्षकपणं रंगभूमीवर पदार्पण करावं म्हणजे त्या कलावंताला पाहताच प्रेक्षकाला आपल्या दिवसभराच्या श्रमाशिणांचा क्षणात विसर पडावा. बस्स! अर्ध काम फत्ते! मग कार्यक्रमात क्षणाक्षणाला प्रेक्षकाला आपल्या अंतर्मनाचा आरसा दिसावा व त्याला नेत्रसुख, कर्णसुख, कल्पनासुख मिळावं. तसंच त्याच्या विचाराला थोडीशी चालना मिळेल असा उत्कट बिंदू साधावा. मग कार्यक्रम यशस्वी होतोच.

**चिंतन**

चिंतन करणे म्हणजे अनाकलनीयतेची पूजा बांधणे नव्हे. त्याच्यासाठी झुरणे, मरणे नव्हे. अनाकलनीयतेला शरण निघणे (जाणे) नव्हे. चिंतन करणे म्हणजे जीवनविषयक विचाराला चालना देणे व त्याचा नीट वेध घेण्याचा पवित्र व सतत प्रयत्न करणे म्हणजेच चिंतन होय.

शुक्रवार, ६ मे १९६६

**बदल**

बदल हा अटळ आहे, अपरिहार्य आहे. कालचे मित्र आज झाले शत्रू. आजचे मित्र उद्या होतील शत्रू, आजचे शत्रू उद्या होतील मित्र. बदल हा अटळच आहे.

शत्रू-मित्र हा वर्गीय दृष्टिकोनावरून ओळखावा लागतो. व्यक्तीवरूनच नव्हे. शत्रू-मित्र निर्माण करणं हे आपल्या संघटनात्मक वर्गीय तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, व्यक्तिगत जीवनात समाजवादी दृष्टिकोनातून व्यक्तीला दोषी ठरवायचं व व्यक्तिवादी दृष्टिकोनातून कृतिपूर्ण समाजवादाचा विचार न करता एखाद्या व्यक्तीवर शिक्के मारून तिला नामोहरम करणं

किंवा गाढव ठरवणं हा ढोंगी समाजवादाचा चुकीचा मार्ग आहे.

**समाजवाद**

समाजवाद हा व्यक्तिगत सुखदुःखातून, एखाद्या व्यक्तीच्या तक्रारीतून जोखणं हे समाजवादी मुत्सद्देगिरीचं दिवाळं वाजवण्यासारखं आहे.

समाजवाद मुत्सद्देगिरीला मानतो. ज्याला समाजवादी मुत्सद्देगिरी कळली नाही त्याला समाजवाद अमलात आणणं अशक्य आहे.

१ ऑक्टोबर १९६८, मुंबई-११

**आनंद**

कुटुंबवत्सल घरातील आनंद हा सर्वश्रेष्ठ आहे. त्या आनंदात न्हाऊन निघालेल्या माणसांचे चेहरे उगवत्या सूर्याप्रमाणे तेजस्वी नि टवटवीत दिसतात. त्या आनंदाच्या दर्शनानेच माणसांच्या अंगात दुप्पट उत्साह येतो व तो मोठ्या उमेदीने हाती घेतलेले कार्य यशस्वी करतो.

प्रयत्न करूनही 'परमेश्वर' कुणाला भेटल्याचा पुरावा सापडत नाही, अतिप्रयत्नांनी मिळतो तो फक्त 'आनंद' म्हणूनच त्याला विद्वानांनी 'आनंदब्रह्म ब्रह्म' म्हटले आहे.

आपले कार्य नीट, चिकाटीने करीत राहा. अभ्यासाची त्याला जोड द्या. आणि निकोप विद्येची, श्रद्धेची साथ द्या. तो तुम्हांला लाभेलच. परमेश्वर नाही. आनंद! म्हणून म्हणतो, त्याच्या पलीकडे (आनंदाच्या) काहीच नाही. परमेश्वरसुद्धा. असल्यास तो भ्रम आहे. कितीही डोकावून पाहा. त्याच्यापलीकडे काहीही नाही. काही जण म्हणतात, प्रयत्ने 'परमेश्वर' भेटतो. झूट आहे ते.

६-१२-६५

**दोस्तांस**

माझ्या मित्रांनो, चाहत्यांनो, दोस्तांनो नि भक्तांनो, कृपा करून आंधळेपणाने माझा जयजयकार करू नका, स्तुतिसुमने उधळू नका. भक्ती तर मुळीच करू नका.

मी काय आहे ते आधी नीट समजून घ्या, मनन करा व मग शिव्यासुद्धा द्या. मला त्या पवित्र वाटतील.

मुख्य म्हणजे वाचा, मनन करा, मग बोला, तेव्हा मात्र गप्प बसू नका.

◆ ***प्रयत्न करूनही 'परमेश्वर' कुणाला भेटल्याचा पुरावा सापडत नाही, अतिप्रयत्नांनी मिळतो तो फक्त 'आनंद' म्हणूनच त्याला विद्वानांनी 'आनंदब्रह्म ब्रह्म' म्हटले आहे.*** ◆

● माझ्यामागून येणाऱ्यांनो, माझ्या मागे या, बरोबर यायचं नसल्यास येऊ नका. पण येतच आहात तर ज्या पायवाटेनं मी आलो ती पायवाट पुसू तरी नका. स्वतःची पावलं उमटवण्याची तुमच्यात ताकद वा इच्छा असेल तर तुमच्या मार्गानं जा. पण माझी पायवाट तरी पुसू नका. पुसण्याचा प्रयत्न करू नका. कारण ती पुसली जाणार नाही.

२७ ऑक्टोबर १९६५

● सहकाऱ्यांनो, एखाद्याबद्दल भक्ती बाळगायला हरकत नाही. पण भक्तीमध्ये अंधश्रद्धा येऊ शकते. ज्ञानात फक्त शिस्त, निर्णय व निर्णयाची अंमलबजावणी यालाच महत्त्व आहे.

● मला कुणी शत्रू नाहीत, पण आमच्या कलापथकाशी शत्रुत्वानं वागणारे थोडेफार लोक आहेत. त्यांना स्वतःचे फड चालवायचे आहेत ना म्हणून ते आमच्या मार्गात काटे पसरवण्याचा खोडसाळ प्रयत्न सतत करीत असतात. पण मी कुणाचं वाईट केलेलं नाही. तेव्हा मला त्यांची भीती बाळगण्याचं काहीएक कारण नाही. मी देव मानीत नाही, पण समाजाचं ऋण जरूर मानतो.

● ख्रिस्तापेक्षा गॅलिलिओ सत्य होता. व्यास-वाल्मीकीपेक्षा चार्वाक सत्य होता.

**ध्येयवादी माणूस**

महासागराच्या मध्यावरच्या एका छोट्या निर्जन बेटावरची एकाकी व्यक्ती.

काळ मोठा कठीण आला आहे. कालपर्यंत विसंबून होतो (कम्युनिस्ट) पार्टीवर. पण आज एकाकी चालणं आहे... माझ्या मताशी कुण्या पार्टीचं जमत नाही... जनमत माझ्या मताची कदर करतं. पण जोवर जनमताला वळण लावणारी यंत्रणा नाही, संघटना नाही, तोवर सारं व्यर्थ होय.

आजच्या डाव्या यंत्रणा एकांडेपणाने वागतात व मुत्सद्देगिरीत तोकड्या पडतात. म्हणून जीवन पुढे जाणं अशक्य आहे. तर उजव्या पुरोगामी शक्तीसुद्धी प्रतिगामी शक्तींचा नाश करायला धजावत नाहीत. कृतीने त्याही नेभळट ठरतात. त्यांच्याहीपुढे समाजोद्धार व क्रांती नसून सत्तालोभच आहे. काय करावं?

२२ सप्टेंबर १९६८, नागपूर

सामान्य माणसाला बुद्धिवादाचा मार्ग मिळाला आणि त्याने त्याचे नीट पालन केले तर तो मोठा महामुनी होऊ शकेल. पण तोच मार्ग जर त्याने नीट आत्मसाद केला नसेल व बुद्धी मात्र सैल नि सैराट सोडली असेल तर तोच सामान्य माणूस अपरिहार्यपणे येणाऱ्या एका महान विकृतीमुळे जगाचा तेवढाच अधःपात करील जेवढा सरंजामशाही युगात पुरोहितवर्गाच्या मेरुमणींनं केला नाही... अगदी तेवढा!

२४ जानेवारी १९६६

माझे हात पवित्र आहेत, स्वच्छ आहेत, ते डागाळलेले नाहीत. मी कुणाचं कधी जाणूनबुजून वाईट केलेलं नाही. तेव्हा माझं सर्व काही चांगलंच होईल यात शंका नको अशी माझी मनोदेवता मला मनोमन ग्वाही देत असते. कारण जनताजनार्दनाच्या सदिच्छा सदैव माझ्या पाठीशी आहेत आणि जोवर मी माझं स्थान जनताजनार्दनाच्या चरणकमलांजवळ ठेवलं आहे तोवर माझ्या शाहिरी सिंहासनाला ध्रुवासारखं अढळपद मिळाल्याशिवाय राहणार नाही!

१८ ऑक्टोबर २९६७

पुरोहितवर्गातील तमासगिरा, ये रे लवकर जन्म घे! तू तर जन्माला नाहीस तर या अविंध तमासगिरांचा जग जयजयकार करील. तुझ्या हातांना ही तमाशाकलेची मशाल पेलवली नाही तरी चालेल. तू गाढव, मूर्ख असलास तरी चालेल. तमाशाकला, मराठी लोककला यांविषयी तू अनभिज्ञ असलास तरी चालेल, पण तू लोककलावंत, तमासगीर, शाहीर हे नाव घेऊन लवकर पुढे ये आणि आपल्या पुरोहितवर्गाची लाज राख.

आज कुठल्याही परिस्थितीत पुरोहितवर्गाच्या प्रतिनिधीशिवाय या महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रातलं पान हलू शकत नाही. पूर्णविराम येऊ शकत नाही. याच गोष्टीची जाणीव या अज्ञ जगाला द्यायची आहे. आणि हे

◆ *समाजात जोपर्यंत धर्मकारण व त्यांचे धर्म आहेत तोवर या प्रकारचे अन्याय व असमाधान राहणार. यासाठी धर्मकारणविरहित, आम समाजाधिष्ठित अर्थकारणावलंबी राजकारणच हवे, हे स्पष्ट आहे.* ◆

सारं आमच्या हातात आहे. म्हणूनच म्हणतो, पुरोहितवर्गातील तमासगिरा, ये ये बाबा, लवकर ये.

१३ जानेवारी १९६६

आणि गंमत अशी की. माझी ही शाहिरी फुलवायला या पुरोहितवर्गाच्या प्रतिनिधींनीच मोठा वाटा उचलला आहे. हे कृतज्ञतेने मान्य करणं माझं कर्तव्यच आहे.

मला गाण्याचा ओनामा शिकवणारे श्री. नारायणराव भट (बार्शी), 'राजकारणाचा हिरिरीने अभ्यास करा व थोर कलावंत व्हा - तुम्ही होणारच' हे सांगणारे कॉ. रघुनाथ कुऱ्हाडकर, इतिहासाचा मार्ग दाखवून देण्यासाठी स्थलकालाची पर्वा न करता शिक्षण देणारे प्रा. न. र. फाटक; माझ्या काव्याला लोकमान्य करावं, ते चिरकाल टिकावं म्हणून ते सर्व छापून अजरामर करणारे श्री. वा. वि. भट व माझ्या शाहिरीचा त्रिखंड डंका वाजवणारे आचार्य प्र. के. अत्रे हे सर्व पुरोहितवर्गाचे प्रतिनिधीच ना? पण ज्याचा वर्ग बदलला नाही, जग बदललेलं नाही, दृष्टी बदलली नाही आणि जो अजूनही पुरोहितशाहीची जुनी जळमटं उरी बाळगून हिंडतो त्याविषयी काय बोलावं?

असा वर्ग अजूनही पुरोहितवर्गात फारच मोठा असून साहित्य-वाङ्मयीनसांस्कृतिक पुढारीपण त्याच्याचकडे आहे.

१४ जानेवारी १९६६

काही दगड इमारतीच्या 'पाया'चे असतात. काही खास इमारतीचे असतात. काही मूर्तीचे असतात. काही रस्त्यावर टाकायच्या खडीचे असतात. तर काही फक्त नुसते मैलाचे दगड असतात.

**श्रेष्ठ धर्म**

जगत्पटलावर असा कुठला माणूस आहे का की, जो आपला धर्म हा

दुसऱ्या धर्मापेक्षा कमी प्रतीचा आहे म्हणणारा? शक्यच नाही. याचा अर्थ हाच की, त्याच्या धर्मप्रमुखाकडून जो ठरेल तोच न्याय आणि कायदा. म्हणजे भारतासारख्या खंडप्राय देशात अनेक धर्म असल्यामुळे एकाच समाजाच अनेक न्याय व अनेक कायदाकलमे असणार. म्हणजेच एकाचा न्याय तो दुसऱ्याला अन्याय ठरेल.

समाजात जोपर्यंत धर्मकारण व त्यांचे धर्म आहेत तोवर या प्रकारचे अन्याय व असमाधान राहणार. यासाठी धर्मकारणविरहित, आम समाजाधिष्ठित अर्थकारणावलंबी राजकारणच हवे, हे स्पष्ट आहे.

विशेषतः देश आर्थिक अरिष्टाच्या-महागाई, बेकारीच्या-गर्तेकडे निघाला असताना धर्मकारण म्हणजे समाजाच्या नि देशाच्या शक्तीची खच्चीच होय. एकदा राजकारणात धर्मकारण घुसले आणि समाजातला न्याय व कायदा धर्ममार्तंडांच्या हातात गेला वा एकाच समाजरचनेत वा खंडात प्रत्येक धर्माला आपल्या धर्माप्रमाणे धर्मकारण, न्याय वा कायदा करण्याचा, सांगण्याचा लोकशाही हक्क मिळाला की, तो सबंध समाज व खंड खंडित झालाच म्हणून समजावे.

म्हणूनच मानवधर्म हाच सर्वात श्रेष्ठ धर्म होय.

*('सूर एका वादळाचा' शाहीर अमर शेख या पुस्तकातील काही भाग)*

❖❖❖

# महाराष्ट्र झेंड्याचा पोवाडा

*फड फड फड फड फडके महाराष्ट्र झेंडा गगनात*
*सर्वांग भरलं त्याचं न्हाला उभा रक्तात*
*हर हर महादेव हर हर महादेव*
*हर हर महादेव हर हर महादेव*
*हर हर महादेव त्याचा शब्द आई कण्हण्यात*
*फड फड नाही त्याची तडफड घ्यारं ध्यानांत*
*एड्या कोकरावाणी कारं भटकताय रानात*
*जर का नाही जागं झालात झेंड्याला साथ दिली न्हाई घात ।*
*ठेवलेलाच रामा हे रामा रे राघुबा दाजी ।।*
*परंपरा यावी वैभवशाली अरुणाची लाली जगावर आली कोणी लपवतील?*
*अभिमानास्पद इतिहास । जगी जन्मास । घालायला खास ।*
*शिवप्रभू आलं ।। अहो आलं हो ।।१।।*

*जनतेनं प्राणयज्ञानं त्याला पोसलं*
*कृष्णावाणी जन्म घेवोनी दीनदुबळ्यास्नी अभयदान दिलं*
*दोन लाख फौज घेऊन जे मराठ्यांत आलं*
*सारा महाराष्ट्र जिंकू या हिमतीनं भलं*
*त्याचं थडगं याच मराठ्यांत यानं बांधलं*
*पुरावाच हवा तर शाहीर तुम्हां दावील ।*
*औरंगाबादेहून फक्त पंधरा मैल । कंसागत दिल्ली तख्ताला लोळविल*
*वचनाची करूनी खैरात नाही फसविलं पुढं होऊन पूर्ण स्वातंत्र्य मिळवुनी दिलं ।*
*आम्हां मराठ्यांचा महाराष्ट्र जग शिकविलं ।*
*अजब अमृत जगी शिंपिलं । राष्ट्र मेलेलं । जिवंत त्यानं केलं*
*हे मर्दा हे राघुबा दाजी ।।२।।*

*बंगालच्या समुद्राला हादरा त्याचा बैसला*
*दर्शनासाठी तिष्ठतच बसली होती सिंधुमाई अटकेला*
*कटकेहून दौडला घोडान् अटकेला गेला*
*अशी परंपरा ज्याची थोर । वक्त परि घोर आहे येणार ।*
*ऐका तुम्ही राजे । अहो राजे जी राघुबा दाजी ।।३।।*

*अटकेला झेंडा लागला । होता पाहिला । आनंद होता आला*
*आम्हा मराठ्यांना दोन बोटं स्वर्ग राहिला.*
*अटकेहून आलेन् गेले थेट रंगमहाला*
*रंगमहालात नवी बया भेटली त्याला*
*लावणीचा पाहून शिणगार । रूप तिचं न्यारं । झाला बहाद्द*
*पुरा थंडगार । सांगू काय राजे हो राघुबा दाजी ।।४।।*

*समरांत लवलवे लकलक बिजलीपरी*
*तलवारही नाचे ज्याची तांडवापरी*
*कळवात्निघरी नेत्रांच्या कट्यारीवरी*
*नाचणे समजला ह्यो मर्दुमकी खरी*
*डबक्यालाच महासागर समजू लागला*
*डराँव डराँव कळवात्निच्या घरी करू लागला*
*जसा आमचा मंत्री खुर्चीवर जाऊन बैसला*
*ढेकणागत चिकटलाय खुर्ची सोडवनाय त्याला*
*महाराष्ट्रावरती प्रसंग भयानक आला*
*मंत्रिपदाला राजीनामा मी देतो बोलला*
*मंत्रिपदाचा मोह त्याला नाही आवरता आला*
*थापा मारून महाराष्ट्राचा घात त्यानं केला*
*मशगूल पुरा घरकोंबडा घरामंदी झाला*
*लावणीनं वाट दिली मागं फंदफितुरीला*
*इष्काच्या प्याल्यामंदी महाराष्ट्र बुडविला*
*मंत्रिपदानं वाट दिली आज फंदितुरीला*
*थापांच्या प्याल्यामंदी महाराष्ट्र बुडविला ।*
*गुंग झाली स्वारी रंगमहाली । घुबडानी संधी साधली*

*करणीला फळं त्यांच्या आली । मर्कट सेना भवताली*
*महाराष्ट्र झेंडा ओढायाला आपुला खाली*
*सज्ज तोफखान्यासह झाली*
*ही झोप तुम्हाला काळझोप ठरणारी*
*ही थापेबाजी रौरवी तुम्हा नेणारी*
*भारताची गाणी गाणार । कालपावतर*
*अमर शाहीर ।।*
*विनवितो तुमा जाहीर । तोच शाहीर । यारं या यारं*
*मैदानात राजे हो । राजे जी राघुबा दाजी ।।५।।*

*मेढे कोट रक्ताचा झेंड्याभोवती उभा करा*
*रहा जिवंत नाही तर लढता लढता मरा*
*ब्रीद मराठ्याचं जर असेल दावाय पुढं सरा*
*नाही तर बांगड्या भरान् खुशाल जा घरा*
*इथं सक्ती नाही कोणाला । मर्द एकला । मराठा राहिला ।*
*शत्रूशी करील मुकाबला । येऊ द्या भला भला । लावील वाटेला*
*होय हो राजे हो राजे जी राघुबा दाजी ।।६।।*

*एक एक मराठा गढ किल्ला भासेल*
*फंद फितुरी मुळालाच सुरुंग ठासेल*
*सह्याद्री पुनर्पी खदखदून हासेल*
*दरी कपार जागतील नेत्री घालूनी तेल*
*अन् गनिमी काव्याचा हिसका मग उमगेल*
*या वेळी मराठा कोण मागं राहील*
*खुर्चीचा मोह तो पुरा सोडून देईल*
*राखेल झेंड्याला देऊन प्राणाचं मोल*
*मजबूत एकीचा हात । ठरलेली बात । शत्रूचे दात । घशांत घालणार*
*अन् आम्ही विजयी होणार । गात जाणार । मंत्र हर हर ।*
*गर्जा तुम्हीं राजे अहो राजे जी राघुबा दाजी ।।७।।*

❖❖❖

● संयुक्त महाराष्ट्राचा लढा हे महाराष्ट्राच्या जीवनातील एक रोमांचकारी असे पर्व होते. या पर्वात महत्त्वाचा होता विचार. हा लढा विचारांचा होता. मराठी अस्मितेचा होता. स्वाभिमानाचा होता. मराठी भाषेच्या अस्तित्वाचा आणि प्राणप्रिय ठरलेल्या मुंबईच्या अस्तित्वाचा होता. केंद्राने भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व सर्वत्र लागू केले होते. त्या दृष्टीने प्रत्येक प्रांताला न्याय दिला गेला होता. परंतु महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र अन्याय आला होता. त्यामागे एक प्रकारचे राजकीय षडयंत्र होते. नेहरूंनी महाराष्ट्राबाबत काहीशी विचित्र आणि अन्यायकारक ठरणारी वेगळी भूमिका घेतली होती. त्यांच्या मनात महाराष्ट्राबद्दलचा आकस निर्माण होईल अशी परिस्थिती त्यांच्या भोवतीच्या प्रभावळीने निर्माण केली होती. त्यात भर पडली होती. त्यांनी वाचलेल्या इतिहासाची. हा इतिहास इंग्रजांनी त्यांच्या सोयीनुसार लिहिला होता व त्यात महाराष्ट्राबद्दल प्रेम तर नव्हतेच पण द्वेषच तुडुंब होता. हा इतिहास पूर्णतः चुकीचा होता. पण तोच नेहरूंच्या मनात घर करून बसला होता. त्यामुळे महाराष्ट्र म्हणजे पुंडाईचा देश, बंडखोरीचा देश, दरोडेखोरीचा देश अशी काहीशी विचित्र कल्पना इंग्रजी इतिहास वाचनाने त्यांच्या मनात घर करून बसली होती. खुद्द महाराष्ट्राचे जे दैवत श्री शिवाजी महाराज त्यांच्याबद्दलच नेहरूंच्या मनात एक प्रकारची अढी होती. ते त्याच दृष्टिकोनातून शिवप्रेमी महाराष्ट्राकडे पाहत होते.

* * *

● भांडवलशाहीची चीड मुळापासूनच अमर शेख यांच्या मनात होती. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने तर ती अधिक बळावली होती; परंतु पक्षाच्या चौकटीत कला बसत नाही. ती चौकट कलावंताची उलट तडफडच घडवते आहे हे पाहताच अमर शेखांनी पक्षाचा राजीनामा दिला आणि स्वतंत्र कलापथक स्थापन केले. आपण पक्षाचा राजीनामा का दिला हे त्यांनी ५-३-६३ रोजी एका पत्रातून सांगितले आहे. ते लिहितात, ''मी पक्षाचा राजीनामा दिला पण कुणाच्या खिशात जाऊन बसत नाही. हे इतर पक्षाचे व सत्तारूढ पक्षाचेही दुखणे. माझा सरकारकडून होत असलेला सत्कार नजीकच्या काळात तरी दिसणार नाही. मी कुणाची हांजी करणार नाही, मी उपाशी मरेन पण कुणाचा मिंधा होणार नाही. मी रेडिओसाठी कुणाची मनधरणी करणार नाही. हा माझा बाणा. तुम्ही हवा तर दोष म्हणा, मला

माझी अमाप मराठी जनता आहे. तिच्या दरबारात मिळालेले स्थान मला भरपूर आहे. तेच मला टिकवायचे आहे. म्हणून मी जनतेबरोबर राहणार. तिच्यावरील अन्याय हा मजवरील अन्याय समजून मी प्रतिकार करणार. तिच्या आनंदात माझी शाहिरी पूजणार.'' अमर शेख स्वाभिमानी होते. ते कुठल्याही पक्षाला कधीच विकले गेले नाहीत. त्यांचा पक्ष हाच मुळी जनतेचा पक्ष होता. तो लोककैवारी होता आणि अन्याय करणाऱ्याचा वैरी होता. म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अमर शेख स्वयंतेजाने तळपून उठले.

✶ ✶ ✶

● अमर शेखांच्यावर साम्यवादाचा प्रचंड पगडा होता. सर्व कष्टकऱ्यांचे हित त्यांच्या डोळ्यासमोर होते. त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांनी स्वतः अनुभवले होते. त्यांनी शेतकऱ्यांची दुःखे पाहिली होती. शेतमजुराच्या घरातील जन्म असल्याने त्यांच्या शोषणाची रीत ते जाणत होते. गिरणी कामगाराच्या रूपानं कामगारांचे दुःख त्यांनी अनुभवले होते. म्हणून त्यांची कविता श्रमप्रतिष्ठेची महती वर्णन करते. यासंदर्भात पुढील विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. 'बहुजन समाजाशी, कामगार वर्गाशी अमर शेख यांचे हार्दिक नाते होते. वर्गसंघर्षाचा पुकारा त्यामुळेच त्यांच्या कवितेतून ऐकू येतो. त्यांचे गद्यलेखन या उद्देशाने जन्मले असले तरी त्यांची कविता त्यांच्या अंतःकरणाचे तीव्र उद्रेक जिवंतपणे सशब्द करते. नाट्यमयता, प्रासादिकपणा आणि अभिव्यक्तीचा मुक्तप्रकट यामुळे त्यांची कविता थेट आवाहन करणारी वाटते.'

✶ ✶ ✶

● अमर शेख कधीच स्वप्नाळू नव्हते पण स्वप्नवेडे मात्र खास होते. भव्यता आणि उत्तुंगता हा त्यांच्या स्वप्नाचा विशेष होता. एखादे वेडे स्वप्न उराशी कवटाळायचे आणि त्यासाठी लागेल ती झीज सोसायची, देहदंड सोसायचा आणि लागेल ते दिव्य करायचे हा या स्वप्नवेड्या कवीला जात्याच छंद होता. आणि त्याचे खरे रूप जे प्रकट होई ते थोडावेळ मिळाल्यानंतरही लिहिलेल्या पत्रातून. आपल्या मित्रांना वेळात वेळ काढून एकांतात बसून ते पत्र लिहीत असत व आपली प्रत्येक स्वप्नामागची भावना निश्चित कल्पना ते बोलून दाखवीत. ही दाखविण्यामागे उद्देश एवढाच असे

की, आपल्या मित्रांनी मग स्फूर्ती द्यावी व अधिक कार्यप्रवण बनवावे. अमर शेख सुंदरसे एखादे स्वप्न चितारीत. त्यामागे निश्चित अशी भूमिका असे आणि त्या स्वप्नाचा विशेष हा की त्यात 'स्व'चा चुकूनही विचार नसे. जीवनावरील अविचल निष्ठा त्या मोहमयी, मंगल अशा स्वप्नातून आपणास सातत्याने प्रतीत होत असे. एके ठिकाणी अमर शेख लिहितात, ''माझा विश्वास माझ्या दैवतावर-कलेवर व आपल्यासारख्या मुत्सद्यांच्या सद्भावना सदिच्छेवर. त्यामुळे मला हा मान मिळाला (राष्ट्रपतिपदक), गौरव झाला. हा आनंद माझा कसा? तुम्हीच म्हणता ना, महाराष्ट्राच्या प्रपंचाशी सर्वतोपरी एकरूप झालेल्या या श्रेष्ठ कलाकाराचा गौरव हा त्या कलाकाराचा, व्यक्तीचा गौरव कसा बरे होईल? श्रेष्ठ महाराष्ट्राचा, त्यातील गुणी रसिकांचा त्यातील तुमच्यासारख्या माझ्या मुत्सद्यांचा हा गौरव म्हणून आनंद हा आपणा सर्वांचाच नाही का?''

कविश्रेष्ठ अमर शेख यांनी आपल्या 'धरती-माता' या काव्यसंग्रहात जे 'सत्य'कथन केले आहे ते इतके बोलके आहे की, त्यामुळे त्यांची खरी वेदना, व्यथा, तळमळ ही जाणकारांना चांगलीच कळून आली. काहींना येऊनही त्यांनी सोयीस्करपणे डोळेझाक केली. अर्थात हे मराठी साहित्यातल्या विशिष्ट परंपरेला अनुसरून होते. याबद्दलची त्यावेळीही अमर शेखांची खात्री होऊन चुकली होती. असे असले तर जनसामान्यांच्या भावनांना, व्यथांना बोलके करताना अमर शेख यांनी शेवटपर्यंत आपला 'केशवसुती बाणा' ज्या पद्धतीने दाखवायचा त्याच पद्धतीने दाखवून 'रे तात कृष्ण केशवा ।' 'ज्ञानेशाच्या वंशाचा तू एक शोभतो दिवा' असे म्हणून गुरुपरंपरेशी सातत्याने इमान राखले. अशा या अमर शेखांनी धरतीमातेच्या निमित्ताने पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे. ते म्हणतात, ''कवी काय किंवा शाहीर काय, तो स्वकालीन युग प्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्माचा तो गतिशील वाहक असतो. येईल त्या परिस्थितीला तोंड देऊन त्या युगांतील सत्य म्हणजे युगधर्म त्याने सांगावयाचा असतो. आजचा युगधर्म आहे. समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे त्याचा मला मनापासून अभिमान आहे.'' अमर शेखांच्या कवितेकडे डोळसपणे पाहिले तर उक्ती आणि वृत्ती यात जराही अंतर दिसणार नाही. युगाच्या नवधर्माशी त्यांनी राखलेले इमान कुणालाच नाकारता येणार नाही.

✶ ✶ ✶

● अमर शेख कवी होते. शाहीर होते. त्यांच्या काव्यावर ठळकपणे दोन प्रकारचे संस्कार झाल्याचे लक्षात येते. एक होता मातीचा आणि दुसरा मराठी मानाचा. माता मुन्नेरबी ही उत्कृष्ट कवयित्री होती. मराठी संस्कृतीच्या अभिमानाने तिचे मन फुललेले होते. तिच्यावर संत वाङ्मयाचा फार मोठा प्रभाव होता. त्याचे पडसाद तिच्या कवितेतूनही उमटलेले होते. 'टाळ मृदुंगाचा आवाज । येतो माझ्या कानी । चला गं सयांनो दिंडी आली गावरानी' असे म्हणणारी ही माता, तिचे मराठी संस्कृतीचे संस्कार अमर शेख यांच्या बालमनावर झाले होते. पुढे अभ्यासातून अमर शेखावर जे संस्कार झाले ते मराठी संतांचे; संतजीवनाचे आणि संतवाङ्मयाचे. तुकोबा, ज्ञानोबा, एकनाथ, रामदास यांच्या उत्तमोत्तम काव्याचे त्यांनी बारकाईने परिशीलन केलेले होते. त्याच्या अनेक खुणा त्यांच्या कवितेतून जागोजागी दिसून येतात. आपल्या 'माझे चरित्र' या कवितेत त्यांनी म्हटलेच आहे. ''तुक्याची ही आहे गाथा, अक्षय आहे, अक्षय राहील, प्रचीती, अमरत्वाची देईल.''

✶ ✶ ✶

● शाहीर अमर शेख यांनी आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवले आहे ते असे, ''२१ नोव्हेंबर- प्रचंड संप. आमच्या भागातील सगळी जबाबदारी माझ्याकडे होती. गोळीबार होऊन एक तरुण बळी पडला. एक बसची चौकी जाळण्यात आली. संध्याकाळी चौपाटीवर सभा. हजर लोक तीन लाख. गाणी म्हटली. 'गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती' हे गीत म्हणत होतो व सगळी सभा कोरस म्हणून साथ देत होती हे अपूर्व होते.''

❖❖❖



## तांबड फुटलं

*तांबड फुटलं ऊठ सजणे*
*गाडी जुपायची एळ झाली ।।धृ।।*

*बघ देवाच्या वाटेवर कुठं कुठं*
*सैतानी सत्तेची काटंकुटं*
*पायात आता  पतुर रुतली*
*गाडी जुपायची एळ झाली ।।१।।*

*आता लाऊ आग अशा कुपाटीला*
*बसू थोडा एळ शेकोटीला*
*अशी लई झोप नाई बरं चांगली*
*गाडी जुपायची एळ झाली ।।२।।*

*अवतीभवती झालं कुणबी जागं*
*गेलं म्होरं आळशास्नि टाकुन मागं*
*नाचक्की व्हायची ग पाळी आली*
*गाडी जुपायची एळ झाली ।।३।।*

*गेलि बाई एळ चल गाडी जुंपू*
*क्रांतिगीते गात बैलं दापू*
*दुस्मान तुडवू ग टाचेखाली*
*गाडी जुपायची एळ झाली ।।४।।*

*फडफडला झंडा अन् वारा गोड गार*
*खवला पदर माझी रानी तयार*
*चला राव गाडि तुमि जुपा आपुली*
*आघाडीला जोडि माझी निघे भली ।।५।।*

* * *

## माझा देहचि धरतीमाता

*माझा देहचि धरतीमाता*
*हा कुराण ही माझी गीता*
*यातच धन, ऋण शक्ति उपजल्या*
*बुद्धि भावना रूप जाहल्या*

*शब्दांच्या या तारेमधुनी*
*जगी एक होउनी प्रकटल्या*
*प्रकाशमय हे जीवन झाले*
*गूढ उकलण्या पुढे निघाले.*

✶ ✶ ✶

## ब्रह्मा, विष्णु, महेश

*जय जय राम कृष्ण हरि - राम राम राधे कृष्ण हरी*
*राम राम राधेकृष्ण - शेतकरि भोळे कृष्ण माझे*
*भोळा राजा कुणबि हरे राम - राम राम राजा कुणबि हरे राम*
*काळ्या आईचा सखा पुत्र तू - तू तूच खरा घनश्याम -*
*ब्रह्मा होउनि तूच निर्मिले निर्मियले जग सारे*
*दरीडोंगरी फोडुनि सगळे विश्व सजविले न्या रे*
*गाळुनिया तू घाम - राजा कुणबि हरे राम -*
*विष्णु होउनि तूच पोशिले पोशिवले जग सारे*
*नुरे माळ ओसाड या इथे उभी धान्य-कोठारे*
*नामानिराळा राम - राजा कुणबि हरे राम -*
*महादेव तूच पार्वति-शंकर-रूप कधी तव महाभयंकर*
*त्रिभुवन जाळुनि भस्म लावुनी*
*पुनः तू भोळासांब - तूच तो राजा कुणबि हरे राम -*

*नाही तुला टिचभर निवारा तोच ब्रह्म तू का ?*
*नाहि तुला कुटं काही खावया विष्णु उपाशी उभा*
*नाहि तुझ्या हाति मृत्यु राहिला रे भोळ्या सांबा*
*घालु लागले नीच दैत्य या जगामध्ये थैमान*
*उठ रे राजा कुणबि हरे राम.. रामराम राजा कुणबि हरे राम*
*घे हाती या साऱ्या जमिनी घे ब्रह्माचा अवतार*
*पहिले खा तू विष्णु होउन जगुन जगाला तार*
*उघड नेत्र तो तिसरा भयंकर लालेलाल अंगार*
*ऐतखाउंचे कर निर्दालन घेइ रुद्र अवतार*
*ऊठ हे सर्वव्यापि भगवान - माझ्या राजा कुणबि हरे राम*
*गदा, चक्र अन् त्रिशूल झाली जुनी तुझी अवजारे*
*शंख डमरूचा आवाज ये ना ठेव तूर्त ते सारे*
*पद्‌म पोथिची गळली पाने नको सर्व निष्प्राण*
*घेई आता ही एकजुटीची मशाल उचल निशाण*
*माझ्या राजा कुणबि हरे राम!*

✶ ✶ ✶

## ओढ

*मी एकाकी लढतो आहे*
*एकटाच धडपडतो आहे*
*धडपड माझी माझ्यासाठी ?*
*अगदी नाही, अगदी नाही*
*विकास मम संस्कृतिचा व्हावा*
*मानव्याचा वेल चढावा*
*फुले फळे त्या यावी गोड*
*हीच अंतरी लागे ओढ.*

✶ ✶ ✶

## प्रणाम

*हिंदी संघराज्याच्या जन-आत्म्या तू घेई प्रणाम*
*पराधीन जगताच्या दुर्दम्य दोस्ता घेई प्रणाम*

*महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, कर्नाटक, तामिळनाड*
*तसेच केरळ, आसाम, ओरिसा, राजस्थान, बिहार*
*उगवतिचा पंजाब*
*मावळतीचा वंग*
*लुकलुकती रत्ने*
*उधळित नित-नव रंग*
*स्वतंत्र होतिल अधिकच खुलतिल दिपेल दुनिया*
*पाहुनि तव बलिदान - घेई घेई प्रणाम*

*कळिकाळाची मगरमिठी तू छिन्नभिन्न केली*
*दीड शतक जो मूर्च्छित मानव जाग त्यास आली*
*ठोकील आरोळी*
*हा प्रातःकाळी*
*वृद्ध, तरुण, बाळे*
*उठतिल यावेळी*
*नव्या यशाने, नव जोमाने, गातील गाणे*
*करावया बलिदान - घेई घेई प्रणाम*

*साम्राज्याला जरि यश आले चिरावया पंजाब*
*सिंध पठाणा अलग लावण्या वंग भूमिला आग*
*भगतसिंग आत्मा*
*दुभंग होईल का ?*
*स्वप्न रवींद्रांचे*
*विरून जाईल का ?*
*टाकू किमया, स्वयंनिर्णया, ऐक्य कराया*
*करू जिवाचे रान- घेई घेई प्रणाम ...*

*(शाहीर अमर शेख यांचे पोवाडे, लोकगीते व कविता,*
*लोकवाङ्मय गृह, मुंबई यातील काही अंश)*

# शाहीर अमर शेख यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह व गीतसंग्रह

- **काव्यसंग्रह**

१) कलश (१९५८)

२) धरतीमाता (१९६३)

- **गीतसंग्रह**

१) अमरगीत (१९५१)

- **नाटक**

'पहिला बळी' (१९५१)

**संदर्भ :**


* निवडक शाहीर अमर शेख - संपादक - मलिका अमर शेख
* अमर शेख व्यक्ती आणि वाङ्मय - माधव पोतदार
* पुरोगामी मराठी शाहिरी - संपादक - डॉ. बजरंग कोरडे
* संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला शाहिरांचे योगदान - माधव पोतदार
* अमर शेखांची कविता - माधव पोतदार
* शाहीर अमर-अण्णा - माधव पोतदार


**-: सौजन्य आणि आभार :-**


१) अमर शेख व्यक्ती आणि वाङ्मय : आचार्य माधव रा. पोतदार, संस्तुता प्रकाशन, महाड

२) निवडक शाहीर अमर शेख : मलिका अमर शेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३) सूर एका वादळाचा : शाहीर अमर शेख, नामदेव ढसाळ, आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई (३१ मे १९९२)

४) शाहीर अमर शेख यांचे पोवाडे, लोकगीते व कविता, लोकवाङ्मय गृह, मुंबई.


❖❖❖